# श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र. ०१/२००६.** **दिनांक ०४.०२.२००६**
**स्थळ - शिर्डी कार्यालय.** **वेळ- दुपारी २.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सभा शिर्डी येथे शनिवार दिनांक ०४ फेब्रुवारी,२००६ रोजी आयोजित करणेत आली असलेबाबत इकडील जा.नं.एस एस एस-वशी-०४-११३५-२००६, दि. २६ जानेवारी,२००६ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते. त्यानुसार सदरहू सभा शनिवार दिनांक ०४ फेब्रुवारी, २००६ रोजी दुपारी २.०० वाजता संस्थानचे शिर्डी येथील कार्यालयात मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

०१. मा. श्री. जयंत मुरलीधर ससाणे, अध्यक्ष
०२. मा. श्री शंकरराव गेणूजी कोल्हे,उपाध्यक्ष
०३. मा. श्री. राधाकृष्ण एकनाथ विखे पाटील.
०४. मा.श्री.पांडूरंग गमाजी अभंग
०५. मा. श्री. सुरेश गोरक्षनाथ वाबळे.
०६. मा.श्री. प्रकाश रामदास काळे
०७. मा.श्रीमती उर्मिला प्रदीप जाधव
०८. मा.श्री.शैलेश श्रीहरी कुटे.
०९. मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर
१०. मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर
११. मा.श्री.कैलास गोविंदराव कोते.

मा. श्री. भाऊसाहेब रा. वाकचौरे,
कार्यकारी अधिकारी.

सभेच्या सुरुवातीस श्रीसाईबाबांची प्रार्थना करणेत येऊन शासन अधिनियमातील कलम ११ (२) नुसार आवश्यक गणपूर्ती असल्याने सभेचे कामकाज मा. अध्यक्ष श्री. जयंत मुरलीधर ससाणे यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आले.

सभेस काही अपरिहार्य कारणास्तव उपस्थित राहू शकत नसलेबाबत मा.विश्वस्त श्री रमाकांन्त गणेश कर्णिक व मा.विश्वस्त श्री कृष्णचंद्र श्यामसुंदर पांडेय यांचे पत्राची तसेच मा.विश्वस्त सर्वश्री समि खतिब, डॉ.पी.एल.तिवारी, कॅप्टन सुरेश वासुदेवा व मा.श्रीमती रिम्पल लोहिया यांचे दुरध्वनी निरोपांची नोंद घेण्यात आली व समितीने त्यांना अनुपस्थित राहणेची अनुमती दिली.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं. ०१.** **व्यवस्थापन समितीचे दि.१८.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.०१.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८.१२.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या.

**०१) निर्णय क्र.७६७ मध्ये शेवटी-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवाससाठी आवश्यक असणारे २००० नग खरेदी कामी रेमंड, ओसवाल या नामांकित कंपन्यांचे रग खरेदी करण्यात यावे. त्यासाठी विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे व मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग यांनी लुधियाना येथे समक्ष जाऊन पहाणी करुन खरेदी करण्यात यावेत, असे ठरले. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००.०० (अक्षरी रुपये सहा लाख मात्र ) चे खर्चास मान्यता देण्यात आली."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे-**

"यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तनिवाससाठी आवश्यक असणारे २००० नग खरेदी कामी रेमंड, ओसवाल या नामांकित कंपन्यांचे रग खरेदी करण्यात यावे. त्यासाठी विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे,मा.श्री पांडुरंग गमाजी अभंग व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांनी लुधियाना येथे समक्ष जाऊन पहाणी करुन खरेदी करण्यात यावेत, असे ठरले. याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ६,००,०००.०० (अक्षरी रुपये सहा लाख मात्र ) चे खर्चास मान्यता देण्यात आली."

(कार्यवाही- अधिक्षक,खरेदी अधिकारी/ अधिक्षक, भक्तनिवासस्थान)

**०२) निर्णय क्र.८१३-**

"देणगी देणाऱ्या भक्तांना कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देता येतील याबाबत इतर देवस्थानला भेटी देऊन त्या ठिकाणी काय काय सुविधा आहेत याची माहिती घेणेकामी मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव,मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीने विविध देवस्थानांना भेटी देऊन आपला अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले."

**याऐवजी खालीलप्रमाणे वाचावे-**

"देणगी देणाऱ्या भक्तांना कोणत्या सुविधा उपलब्ध करुन देता येतील याबाबत इतर देवस्थानला भेटी देऊन त्या ठिकाणी काय काय सुविधा आहेत याची माहिती घेणेकामी मा.श्री.सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती

उर्मिला प्रदिप जाधव,मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.श्री.अशोक भिमाशंकर खांबेकर यांची समिती स्थापन करण्यात आली. या समितीने विविध देवस्थानांना भेटी देऊन आपला अहवाल व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले."
(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

यानंतर सदरहू इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले.

**विषय नं. ०२.** **दिनांक १२.०१.२००६ रोजी मुंबई येथे झालेल्या वैद्यकीय अधिकारी मुलाखत सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.०२.** याबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०२.२००६ रोजी होणारे वैद्यकीय उपसमितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय घेण्यात यावा असे ठरले

**विषय नं. ०३.** **दिनांक २४.०१.२००६ रोजी मुंबई येथे झालेल्या वैद्यकीय समिती सभेचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.०३.** याबाबत व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०२.२००६ रोजी होणारे वैद्यकीय उपसमितीचे सभेत चर्चा होऊन निर्णय घेण्यात यावा असे ठरले

**विषय नं.०४.** **व्यवस्थापन समितीचे दि.५.११.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेली कार्यवाही.**

**निर्णय क्र.०४.** व्यवस्थापन समितीचे दि.०५.११.२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांवर करण्यात आलेल्या कार्यवाहीच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०५.** **नोंद घेण्याचे विषय.**

**०१. (अ) जमाखर्च तक्ता नोव्हेंबर व डिसेंबर, २००५.**

**(ब) गुंतवणूक तक्त्याची नोंद घेणे.**

**(क) माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेल्या देणगीची नोंद घेणे.**

**(ड) माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंच्या अहवालाची नोंद घेणे.**

**(इ) माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाच्या तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र.०५.** **(A)**माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ मधील जमा-खर्चाचे तक्ते, माहे १३ जानेवारी,२००६ अखेरीस गुंतवणूकीची परिस्थिती दर्शविणारा तक्ता, माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ या महिन्यात दक्षिणा पेटीत जमा झालेली देणगी, माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ मध्ये श्रीसाईबाबांना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंचा अहवाल, माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ मध्ये मा.कार्यकारी अधिकारी यांनी रुपये २५,०००/- चे मर्यादेत केलेल्या खर्चाचे तक्ते ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्यांची नोंद घेण्यात आली.

**०२. माहे डिसेंबर, २००५ या महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबत.**

**निर्णय क्र. ०५. (B).** माहे डिसेंबर, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय अनुदानाबाबतचा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०३. रुग्णालयातील रुग्णांना माहे डिसेंबर, २००५ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकीय बीलातील सवलतीची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ०५. (J).** माहे डिसेंबर,२००५ मध्ये रुग्णालयातील रुग्णांना वैद्यकीय बीलांमध्ये देण्यात आलेल्या सवलतींची माहिती दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०४. माहे नोव्हेंबर-डिसेंबर २००५ मध्ये लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ०५. (D).** माहे नोव्हेंबर व डिसेंबर, २००५ मध्ये संस्थानमधील कामांसाठी कंत्राटदारांमार्फत वेळोवेळी रोजंदारीवर लावलेल्या कर्मचाऱ्यांच्या /कामगारांच्या संख्येची माहिती दर्शविणारे तक्ते, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**०५. बांधकाम प्रगती तक्त्याची नोंद घेणे.**

**निर्णय क्र. ०५. (E).** बांधकाम प्रगती अहवाल दर्शविणारा तक्ता, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.
(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**०६. पाणी तपासणी अहवाल**

**निर्णय क्र. ०५. (F).** माहे डिसेंबर, २००५ मध्ये संस्थान पाणीपुरवठा योजने अंतर्गत पुरविण्यात येणाऱ्या संस्थानचे परिसरातील पिण्याच्या पाण्याचे नमूने (सॅम्पल्स) मे. एनव्हायरो लॅब, नाशिक व आरोग्यप्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे तपासणीसाठी पाठविण्यात आले होते. त्यांचेकडून आलेले तपासणी अहवाल, ज्यांच्या प्रती सर्व मा. सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात आली.

**विषय नं.०६.** **गुंतवणूकीबाबत.**

**निर्णय क्र.०६.** माहे फेब्रुवारी,२००६मध्ये मुदत पूर्ण होणाऱ्या व इतर उपलब्ध गुंतवणूकपात्र रकमांचा तपशील पुढीलप्रमाणे-

| अ.नं. | बँकेचे नाव | मुदतपूर्तीचा दिनांक | मुदतीअंती उपलब्ध रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | सेंच्यूरियन बँक, नाशिक | १९.०१.२००६ | १४,४४,४०१.०७ |
| ०२. | सेंच्यूरियन बँक, नाशिक | १९.०१.२००६ | १४,४४,४०१.०७ |
| ०३. | प्रवरा सहकारी बँक लि.,लोणी | ३०.०१.२००६ | १०,९७,३३२.०० |
| ०४. | माहे फेब्रुवारी,२००६ अखेर दैनंदिन खर्च वजा जाता गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम रुपये | | १०,००,००,०००.०० |
| ०५. | माहे फेब्रुवारी,२००६ अखेर परकीय चलनापासून गुंतवणूकीसाठी उपलब्ध होऊ शकणारी रक्कम रुपये | | १,००,००,०००.०० |
| | | एकूण रक्कम रुपये | ११,३९,८६,१३४.१४ |

उपरोक्तप्रमाणे रुपये ११.३९ कोटी गुंतवणूकीसाठी उपलब्ध आहेत. व्यवस्थापन समितीचे दिनांक ८ मे,२००५ चे सभेतील निर्णयानुसार शिर्डी येथील आरक्षण क्र.३४ मधील जमीन खरेदीसाठी अंदाजे रक्कम रुपये ६ कोटी अपेक्षित असल्याने प्रत्यक्षात फक्त रुपये ५.३९ कोटी गुंतणूकीसाठी उपलब्ध आहेत. सदर गुंतवणूक संस्थानला सेवा देणाऱ्या व जास्तीत जास्त व्याजदर देणाऱ्या बँकांमध्ये गुंतविण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०७.** **आर्थिक अंदापत्रक सन २००६-२००७ बाबत**

**निर्णय क्र.०७.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ चे अधिसूचनेनुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे कामकाज शासननियुक्त मा.व्यवस्थापन समिती पहात आहे. अधिनियमातील कलम १७ समितीची कर्तव्ये व अधिकार मधील पोटकलम - (२)(क) नुसार वार्षिक अंदाजपत्रका विषयीची तरतूद पुढील प्रमाणे आहे :

"(समिती) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठवील."

वरील तरतुदीन्वये विषयांकीत अंदाजपत्रक २८ फेब्रुवारी, २००६ पर्यंत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविणे अपेक्षित आहे. सन २००६-०७ या अर्थिक वर्षाच्या जमा-खर्चाच्या अंदाजपत्रकामधील ठळक तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत :

**जमेचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयांत)

| अ.नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००५-०६ | अंदाजपत्रक २००६-०७ | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | टक्के |
| ०१. | प्रारंभीची शिल्लक | ५,०२,००,०००/- | २,२६,८०,०००/- | १% | - २,७५,२०,०००/- | -५५% |
| ०२. | अपेक्षित अनावर्ती जमा | ६८,१०,००,०००/- | १०२,११,००,०००/- | ५९ % | ३४,०१,००,०००/- | ५०% |
| ०३. | अपेक्षित आवर्ती जमा | ४३,०८,०५,०००/- | ४४,५३,५०,०००/- | २६% | १,४५,४५,०००/- | ३% |
| ०४. | ठेवीच्या परतफेडीव्दारे मिळणारे उत्पन्न | ३०,०१,७५,०००/- | २४,४४,७८,८००/- | १४% | - ५,५६,९६,२००/- | -१९% |
| | एकूण अपेक्षित जमा :- | १४६,२१,८०,०००/- | १७३,३६,०८,८००/- | १००% | २७,१४,२८,८००/- | १९% |

**खर्चाचे अंदाजपत्रक** (आकडे रुपयात)

| अ.नं. | तपशील | सुधारित अंदाजपत्रक २००५-०६ | अंदाजपत्रक २००६-०७ | | वाढ / घट | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | रक्कम | टक्के | रक्कम | टक्के |
| ०१. | अपेक्षित अनावर्ती खर्च | ६५,४०,००,०००/- | ८२,६९,४५,०००/- | ४८% | १७,२९,४५,०००/- | २६% |
| ०२. | अपेक्षित आवर्ती खर्च | ९,९४,१०,०००/-/- | ९,९८,२३,८००/- | ६% | ४,१३,८००/- | १% |
| ०३. | अपक्षित किरकोळ खर्च | १९,६५,०००/- | २०,६०,०००/- | १% | ९५०००/- | ५% |
| ०४. | न्यासाच्या उदीष्टांवरील अपेक्षित खर्च | ४३,८१,७५,०००/- | ५२,३६,३०,०००/- | ३०% | ८,५४,५५,०००/- | २०% |
| ०५. | व्यवस्थापन निधीतील अपेक्षित खर्च | २४,५९,५०,०००/- | २५,८४,५०,०००/- | १४% | १,२५,००,०००/- | ५% |
| ०६. | अंतिम शिल्लक | २,२६,८०,०००/- | २,२७,००,०००/- | १ % | २०,०००/- | १% |
| | **एकूण अपेक्षित खर्च :-** | **१४६,२१,८०,०००/-** | **१७३,३६,०८,८००/-** | **१००%** | **२७,१४,२८,८००/-** | **१९%** |

अधिनियम २००४ चे कलम २२ (२) मधील तरतुदीनुसार, "व्यवस्थापन निधीत रक्कम उपलब्ध असल्यास, ती विचारात घेऊन विश्वस्तव्यवस्थेच्या लगतपूर्व वर्षातील अंदाजे स्थूल वार्षिक उत्पन्नाच्या दहा टक्क्यापेक्षा अधिक नसेल इतकी, समितीकडून निश्चित करण्यात येईल एवढी रक्कम, राज्य शासनाच्या मान्यतेने, दरवर्षी या निधीमध्ये जमा करण्यात येईल. राज्य शासनास, आवश्यक वाटले तर, कोणत्याही वर्षात विश्वस्तव्यवस्था निधीतून कोणत्याही अतिरिक्त रक्कमा या निधीत जमा करण्याबद्दल कोणत्याही वेळी निर्देश देईल".

उपरोक्त तरतुदीप्रमाणे व्यवस्थापन निधीतून गतवर्षाच्या उत्पन्नाच्या १० टक्के खर्च अपेक्षित आहे. सन २००६-०७ या अंदाजपत्रकामध्ये व्यवस्थापन निधीतून होणारा संभाव्य खर्च (व्यवस्थापन समितीवरील खर्च, कर्मचा-यांचे वेतन व भत्ते {नियोजित श्री साईबाबा हॉस्पिटल कर्मचारी खर्चासह), कंत्राटी कर्मचा-यांवर होणारा खर्च व कर्मचा-यांवर होणारा इतर अनुषंगीक खर्च} भागविण्यासाठी

अधिनियमातील १० टक्के तरतूद कमी पडणार आहे. सन २००४-०५ या आर्थिक वर्षातही व्यवस्थापन निधीमधून झालेल्या जादा खर्चास मान्यता मिळणेकामी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १८ सप्टेंबर, २००५ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक ४८३ अन्वये राज्य शासनाकडे दिनांक २२ सप्टेंबर,२००५ चे पत्रान्वये प्रस्ताव दाखल केलेला आहे तसेच सदरच्या तरतुदीत सुधारणा करणेकामी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्रमांक १३४ अन्वये राज्य शासनाकडे दिनांक ०३ मार्च, २००५ चे पत्रान्वये प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. उपरोक्त दोन्ही प्रस्ताव शासनस्तरावर प्रलंबित आहेत. सन २००६-०७ या आर्थिक वर्षासाठी व्यवस्थापन निधीतून होणारा अपेक्षित खर्च झाल्यास, वाढीव तरतुदीसाठी शासनाला विनंती करावी लागेल.

मा. व्यवस्थापन समितीच्या स्थापनेनंतर विविध मुलभूत व मोठया प्रमाणात भांडवली खर्च-तथा-योजना सुरु करणे प्रस्तावित आहे. आयकर अधिनियम १९६१ चे कलम १०(२३)(सी) ५ मधील तरतुदीमध्ये तीन वर्षापुर्वी झालेल्या बदलामुळे प्रत्येक आर्थिक वर्षाच्या उत्पन्नापैकी ८५ टक्के उत्पन्न त्याच आर्थिक वर्षात खर्च करणे बंधनकारक आहे. तेवढा खर्च न झाल्यास शिल्लक राहिलेले अखर्चित उत्पन्न पुढील पाच वर्षात खर्च करणे बंधनकारक केले आहे. मागील चार वर्षातील अखर्चित उत्पन्न साधारणतः रुपये १०२ कोटी मात्र एवढे आहे. या अखर्चित उत्पन्नाचे रुपांतर वेळोवेळी गुंतवणूकांमध्ये करण्यात आले आहे. हे अखर्चित उत्पन्न चालू वर्षात वा पुढील वर्षात खर्च होणे आवश्यक असल्याने भांडवली खर्चामध्ये मोठयाप्रमाणात वाढ करणे क्रमप्राप्त झाले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकामध्ये भरीव वाढ झालेली दिसत आहे. या मोठया योजनांना आवश्यक निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून वेळोवेळी आवश्यकतेनुसार काही प्रमाणात गुंतवणूकांचे रोखीकरण करावे लागेल.

तरी सन २००६-०७ चे आर्थिक वर्षाचे प्रस्तावित मूळ अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व मा. व्यवस्थापन समितीच्या मंजूरीने राज्य शासनाकडे व मा.धर्मादाय आयुक्तांकडे माहितीसाठी पाठविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०८.** **सुधारित अंदाजपत्रक सन २००५-२००६ बाबत**

**निर्णय क्र.०८.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम, २००४ मधील तरतुदीप्रमाणे दिनांक २३ ऑगस्ट, २००४ चे अधिसूचनेनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेचे व्यवस्थापन सुरु आहे. या अधिनियमातील कलम-१७: "समितीची कर्तव्ये व अधिकार" मध्ये पोटकलम-(०२) (क) नुसार वार्षिक अंदाजपत्रकाविषयीची तरतूद पुढीलप्रमाणे आहे:

"विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक तयार करील आणि त्याची एक प्रत राज्य शासनाकडे आणि धर्मादाय आयुक्ताकडे पाठविल."

सन २००५-०६ या चालू आर्थिक वर्षासाठीचे (माहे एप्रिल, २००५ ते मार्च, २००६ या कालावधीसाठी) विश्वस्तव्यवस्थेच्या जमा-खर्चाचा अंदाज देणारे वार्षिक अंदाजपत्रक मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १३.०३.२००५ चे सभेतील निर्णय क्रमांक ९८ नुसार मंजूर करण्यात येऊन मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई व मा. धर्मादाय आयुक्त, मुंबई यांना सादर करण्यात आलेले आहे.

माहे नोव्हेंबर, २००५ अखेर प्रत्यक्ष जमा-खर्चाचे अवलोकन केले असता काही बाबींवरील जमा व खर्च मुळ तरतुदींपेक्षा अधिक होतील अशी शक्यता असल्याचे / झाल्याचे दिसून येते. यामुळे या बाबींसाठीची मुळ तरतूद माहे मार्च, २००६ अखेरपर्यंत अपुरी पडणार आहे. अंदाजपत्रकातील काही अपेक्षित वाढीव खर्चाच्या बाबींचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

**(अ) वैद्यकीय अनुदान** :-या बाबीत रुग्णांकडून येणाऱ्या अर्जाच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळे, रुग्णालय विभागाकडील मागणीनुसार सदरची तरतूद रुपये ०१ कोटीने वाढवून ७ कोटीवरुन रुपये ८ कोटी करण्यात येत आहे.

**(ब) लेखापरिक्षण फी** :-या बाबीत संस्थानने लेखापरिक्षणासाठी नियुक्त केलेले दोन लेखापरिक्षक यांच्या फीसाठी अंदाजपत्रकात रुपये २.४० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

**(क) श्री साईनाथ रुग्णालय खर्च** :- या बाबीवर संस्थान रुग्णांना देत असलेल्या वाढीव सेवेसाठी अंदाजपत्रकात रुपये ४६.५० लाख वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

**(ड) सत्संग व योग साधना** :-या बाबीवर मानवी कल्याणासाठी श्री रामदेव महाराज, हरिव्दार यांचे आयोजित केलेले योग साधना शिबीरासाठी मंजूर केलेल्या रुपये ३० लाख रकमेसाठी अंदाजपत्रकात वाढीव तरतूद करण्यात येत आहे.

उर्वरित मध्ये जाहिरात खर्च रुपये ०१ लाख, अतिथीगृह खर्च रुपये १.५०लाख, बँक चार्जेस १.५० लाख,उत्सव खर्च १५ लाख, डिजिटल प्रकाशने १० लाख इत्यादी खर्चात वाढ करण्यात आलेली आहे. इतर, जमा वा खर्चाच्या बाबींवरील मुळ तरतूदींमध्ये काही बदल अपेक्षित नसल्याने त्या

तरतुदींचा पूनर्उल्लेख करण्यात आलेला नाही. सन २००५-०६ चे जमेचे व खर्चाचे मुळ निव्वळ अंदाजपत्रक रुपये १३९,११,९०,०००/- व रुपये १४१,८७,१०,०००/- मात्रचे आहे. (Opening व Closing-Cash Balances मुळे त्यांचा ताळमेळ झाला आहे.) मूळ तरतुदींमध्ये प्रत्येकी रुपये २,०७,९०,०००/- मात्रची वाढ होऊन, जमेचे व खर्चाचे सुधारीत अंदाजपत्रक पुढीलप्रमाणे असेल.

सुधारित निव्वळ जमा - रुपये १४१,१९,८०,०००/-

सुधारित निव्वळ खर्च - रुपये १४३,९५,००,०००/-

उपरोक्त सुधारित अंदाजपत्रकास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.०९. युटीआय म्युच्यूअल फंडाच्या मास्टर व्हॅल्यू फंड,९८ मधील गुंतवणूकीबाबत.**

**निर्णय क्र.०९.** संस्थानने दि.७ फेब्रुवारी,२००५ रोजी युटीआय म्युच्यूअल फंडाच्या मास्टर व्हॅल्यू फंड स्कीममध्ये रक्कम रु.१,००,००,०००/- ची गुंतवणूक केलेली आहे. या गुंतवणूकीवर ८ फेब्रुवारी,२००५ रोजी रक्कम रु.३३,८८,६८१.८० संस्थानला लाभांश म्हणून मिळालेली असून उर्वरीत रक्कम रु.६६,११,३१८.२० मात्र एवढी निव्वळ गुंतवणूक या स्कीममध्ये सध्यापर्यंत आहे. या योजनेत ३,३८,८६८.१८० एवढे युनिट्स खरेदी करण्यात आलेले आहेत व आज दिनांक १२/०१/२००६ रोजी त्यांचेकडे दूरध्वनीवर विचारणा केल्याने त्यांचेकडून उपरोक्त शिल्लक रकमेवर मिळणाऱ्या NAVचे तपशीलवार विवरण प्राप्त झालेले आहे. या विवरणांवरुन असे दिसते की, संस्थानने ही रक्कम आजच काढून घेतल्यास आजच्या निव्वळ मालमत्ता मुल्यानुसार (NAV) म्हणजे रु. २८.०४ प्रती युनिट प्रमाणे एकूण रक्कम रु.९५,०१,८६३.७६ इतकी मिळणार आहे. या गुंतवणूकीवर संस्थानला आजअखेर २८.९१% या दराने परतावा मिळणार आहे.

युटीआय म्युच्यूअल फंडच्या मास्टर व्हॅल्यू फंड-९८ हा पूर्णतः इक्विटी ( शेअर्स ) आधारीत असून, सदर निधीची गुंतवणूक इक्विटीज म्हणजे विविध कंपन्यांच्या भागभांडवला (शेअर्स) मध्ये असल्याने गुंतवणूकीवर मिळणारे उत्पन्न हे शेअर्स बाजारातील चढ-उतारावर अवलंबून आहे. त्यामुळे शेअर बाजाराशी संबंधीत सर्व घटकांचा परिणाम या गुंतवणूकीवर होऊन मागील कालावधीप्रमाणे उत्पन्न पुढे मिळेलच, अशी हमी मिळू शकत नाही. भविष्यात या फंडाची गुंतवणूक असलेल्या शेअर्सच्या भावांमध्ये समाधानकारक वाढ न झाल्यास सदरच्या वाढीअभावी परतावा कमी राहण्याची किंवा काही प्रमाणात भांडवली तोटा होण्याची संभावना आहे. श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम-२००४, कलम २०(३) नुसार तसेच महाराष्ट्र शासन - सासवि २००५/४०६/(६३) का. सोळा, विधी व न्याय विभाग, मंत्रालय मुंबई-३२ यांचे दि.१४ नोव्हेंबर,२००५ च्या पत्रानुसार श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम२०(३) मध्ये गुंतवणूकी बाबत पुढीलप्रमाणे तरतुद आहे. (३) विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम,१९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे "सार्वजनिक रोख्यांमध्ये" गुंतवण्यात येतील. तसेच विधी व न्याय विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडील वरील संदर्भित पत्रात पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत. "श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ मधील कलम२०(३) नुसार संस्थानच्या विश्वस्तव्यवस्थेचा मालकीचा निधी, पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बँकेत किंवा बँकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात यावा किंवा जमा करण्यात यावा".

युटीआय म्युच्युअल फंडच्या मास्टर व्हॅल्यू फंड-९८ हा शेअर बाजारातील चढउतारावर अवलंबून असल्याने भविष्यात या फंडाची गुंतवणूक असलेल्या शेअर्सच्या भावांमध्ये समाधानकारक वाढ न झाल्यास संस्थानला त्यापासून तोटा होण्याची संभावना आहे. तरी सदरची गुंतवणूक प्रचलीत निव्वळ मालमत्ता मुल्यानुसार काढून घ्यावी किंवा कसे ? याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्तकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१०. सोने-चांदी वस्तू अलंकारांची टंच काढणे व खड्यांचे मुल्यांकनासाठी मान्यताप्राप्त संस्थेची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.१०.** साईभक्तांकडून देणगीरुपात स्वतंत्रपणे अथवा सोने-चांदीचे अलंकार - वस्तूसह मौल्यावान खडे प्राप्त होतात. सध्या संस्थान व्यवस्थापनाकडे माहे जानेवारी, २००० ते ऑक्टोबर, २००४ अखेर एकूण अदमासे ७.८०० कि.ग्रॅ वजनाचे खडे साठलेले आहेत. साठलेल्या खडयांचे मुल्यांकन करुन घेणेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक १४२ नुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे :

संस्थानकडे साठलेल्या खडयांचे मुल्यांकन करणेकामी समिती सदस्य मा.के.सी.पाण्डेय सो. यांचे मार्गदर्शनानुसार आयकर/अबकारी विभागाकडून मान्यता प्राप्त असलेले तज्ञ मुल्यांकनकार नेमावेत व मा.श्री. पाण्डेय सो. यांचेसह किमान दोन सदस्यांचे उपस्थितीत खडयांचे मुल्यांकन करुन घेण्यात यावे.

उपरोक्त निर्णयांनुसार, मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड या संस्थेचे संचालक श्री.कमलाकर हरीभाऊ खरोटे व श्री.वैभव हरीभाऊ खरोटे यांनी त्यांचे दिनांक नसलेल्या पत्रान्वये (इकडील कार्यालयास दि.०४ फेब्रुवारी, २००५ रोजी मिळालेल्या पत्रान्वये) मा.अध्यक्ष महोदयांना,श्री संत साईबाबा संस्थानचे अतिरीक्त व्हॅल्युअर म्हणून स्वखर्चाने विनामुल्य काम करणेस तयार आहोत, असे कळविलेले होते. मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड ही संस्था "जेम्स ॲण्ड ज्वेलरी प्रमोशन" या संस्थेची सदस्य असून, मा.मुख्य आयुक्त (आयकर), नाशिक यांचेकडून मान्यताप्राप्त आहेत. तसेच ते नाशिक जिल्हयांतील काही सहकारी बँका व पतसंस्थाकरीता सध्या अधिकृत मुल्यांकनकार म्हणून कार्यरत आहेत. या पत्रानुसार मा.अध्यक्ष सो.व मा.सदस्य श्री. वाबळे यांनी श्री.कमलाकर हरीभाऊ खरोटे व श्री.वैभव हरीभाऊ खरोटे,मनमाड यांची मुल्यांकनकार म्हणून नेमणूक करणेत यावी, असे समक्ष सुचित केलेले होते.

यानंतर याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०३ मे, २००५ रोजीचे सभेत पुनःश्च चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ( निर्णय क्रमांक १८१ ) निर्णय घेणेत आलेला आहे :

मे. खरोटे ज्वेलर्स, मनमाड यांचे नियुक्तीस मान्यता देणेत आली. तसेच सोने-चांदी वस्तू अलंकाराचा टंच पडताळणीसाठी श्रीरामपूर व कोपरगांव येथील आणखी मुल्यांकनकाराची नियुक्ती करण्यात यावी. मे.खरोटे यांनी पडताळणी केलेल्या सोने-चांदी अलंकारांपैकी १० टक्के वस्तू अलंकाराच्या टंचाची पूर्नपडताळणी करणेसाठी दुस-या मुल्यांकनकाराची सेवा घेण्यात यावी व इतर मुल्यांकनकाराचे नियुक्तीबाबत मा.अध्यक्ष व मा.उपाध्यक्ष यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे. तसेच खडयांचे (STONE) मुल्यांकन मा.सदस्य श्री के. सी.पाण्डेय व इतर स्थानिक सदस्यांचे उपस्थितीत करण्यात यावे, असे ठरले.

उपरोक्त निर्णयान्वये मा. सदस्य श्री. के.सी.पाण्डेय सो. यांचेशी चर्चा केली असता "जेम्स ॲण्ड ज्वेलरी प्रमोशन" यासंस्थेचे सदस्य असलेल्या तीन तज्ञाची नेमणूक करावी, असे सुचित केलेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २७ डिसेंबर, २००४ रोजीचे सभेत, श्री साईभक्तांकडून देणगीरुपाने प्राप्त होणारे सोने-चांदी वस्तू-अलंकारापैकी कलाकुसरीच्या वस्तूंचे मूल्यांकन करुन लिलावाव्दारे विक्री करण्यात यावी, उर्वरीत सोने-चांदी वितळवून त्यांची नाणी तयार करणेबाबत निर्णय झालेला आहे. याबाबत मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय यांचेकडे वरील कार्यपध्दतीस शासनाची स्थायी मान्यताकामी प्रस्ताव दाखल केलेला होता. याबाबत त्यांनी त्यांचे पत्र क्रमांक सासंवि२००५/४०७/(६४) का.सोळा दिनांक ११ आक्टोबर, २००५ अन्वये, वस्तू-अलंकारांचे शासनमान्यताप्राप्त परवाना धारक अधिका-यांकडून मूल्याकन केले किंवा कसे, तसेच लिलाव करावयाचे वस्तू-अलंकारांची Off-Set Value ठरविण्यात आली आहे काय याबाबत विचारणा केलेली आहे.

तरी मे.खरोटे ज्वेलर्स, मनमाड व उर्वरीत दोन नांवे तसेच मुल्यांकनाचे वेळी उपस्थित रहाणेकामी मा.सदस्य श्री.के.सी.पाण्डेय व इतर एक स्थानिक सदस्यांचे नांव निश्चित होणेस तसेच शासन मान्यताप्राप्त परवाना धारक मुल्यांकनकाराकडून वस्तू-अलंकारांची Off-Set Value ठरविणेसाठी धोरणात्मक निर्णय होणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,सोने-चांदी-वस्तू अलंकाराचे टंच काढणे व खड्यांच्या मूल्यांकनासाठी शासकीय मान्यता प्राप्त संस्थांची यादी मागविण्यात यावी ती मा.उपाध्यक्ष यांना दाखवून अंतिम निर्णय घेण्यात यावा. तसेच मुल्यांकनाचे वेळी मा.सदस्य श्री.के.सी.पाण्डेय यांचेबरोबरच श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांनीही उपस्थित रहावे असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.११.** **स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे उघडण्यात आलेल्या बचत खात्यास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.**

**निर्णय क्र.११.** भारतीय स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा शिर्डी येथे सुरु करणेकामी व्यवस्थापन समितीचे मान्यतेने संस्थानने नव्याने बांधकाम केलेल्या "साईनाथ छाया" इमारतीत भाडेतत्वावर जागा देण्यात आलेली आहे.

सदरची शाखा नव्यानेच शिर्डी येथे सुरु होत असल्याने श्री साईबाबांच्या नावाने १ नंबरचे खाते हे संस्थानचे असावे, या भावनेने स्टेट बँक ऑफ इंडिया , शाखा, कोपरगांव यांनी त्यांचे दिनांक ९ डिसेंबर, २००५ चे पत्राने शिर्डी येथील शाखेचे व्यवहार दिनांक १४ डिसेंबर २००५ रोजी सुरु करण्यात येत असून त्या तारखेस कार्यकारी अधिकारी,श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी या नांवे १ नंबरचे बचत

खाते उघडण्यात यावे अशी विनंती करण्यात आली होती.त्यानुसार लेखाशाखेकडील दिनांक १० डिसेंबर २००५ रोजीचे टिपणीअन्वये मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा शिर्डी येथे संस्थाननचे नांवे नवीन बचत खाते (खाते नंबर ३००२६६५७६७८) उघडण्यात आलेले आहे.

संस्थान कर्मचाऱ्यांचा भविष्यनिर्वाहनिधी, व्यवसाय कर, आयकर तसेच प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकाऱ्यांचा भविष्यनिर्वाह निधी वगैरे शासनाला दरमहा भरणा स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा, कोपरगांव येथील संस्थानचे बचत खात्यातून करण्यात येतो. भविष्यात सदरची सुविधा शिर्डी शाखेत उपलब्ध होऊ शकेल. तसेच सदरची शाखा पुर्णतः संगणकीय असल्यामुळे देशातील कुठल्याही शहरातील शाखेशी त्वरीत व्यवहार करणे सुलभ होईल. त्यामूळे सदरचे बचत खाते असणे आवश्यक आहे.

तरी स्टेट बँक ऑफ इंडिया, शाखा शिर्डी येथे संस्थानचे नांवे बचत खाते उघडण्यात आले असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१२.** **श्री.एन.साईबाबा, सिकंदराबाद यांच्या विनामूल्य लेखाविषयक सेवा घेणे बाबत.**

**निर्णय क्र.१२.** श्री.एन साईबाबा, चार्टर्ड अकौटंट, सिकंदराबाद (आंध्र प्रदेश) यांनी त्यांचे दिनाक ९ ऑगष्ट, २००५ रोजीचे पत्रान्वये, ते श्रीसाईबाबांचा भक्त असून गेल्या १८ वर्षांपासून चार्टर्ड अकौटंट म्हणून सेवा पुरवित आहे. ते संस्थानला चार्टर्ड अकौटंट म्हणून त्यासंबंधात असलेल्या कामासाठी विनामूल्य सेवा पुरवू इच्छितात ते त्यांच्या ज्ञानाचा उपयोग संस्थानला करुन देऊ इच्छितात व त्यासाठी एका वर्षात १ महिना (एका वेळेस ७ दिवस) शिर्डी येथे समक्ष येऊन या सेवा देऊ इच्छितात त्यांना सेवा करण्याची संधी दिल्यास, आपला आभारी राहीन अशी विनंती केली आहे.

उपरोक्तप्रमाणे पत्रास अनुसरुन श्री.एन.साईबाबा,सिकंदराबाद यांचेशी प्रशासकीय स्तरावर समक्ष चर्चा करण्यात आलेली आहे. या चर्चेदरम्यान श्री.एन.साईबाबा,सिकंदराबाद यांनी आंध्रप्रदेश या संपूर्ण राज्यातील श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) या नावांशी साधर्म्य असलेल्या सर्व विविध ट्रस्टविषयी संपूर्ण आर्थिक व सांख्यिकीय माहिती संकलीत करुन ती श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना द्यावी, असे ठरविण्यात आले आहे.

सध्या आंध्रप्रदेश या राज्यात श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) या नावांशी साधर्म्य असलेल्या अनेक लहान मोठ्या संस्था कार्यरत असून, दिवसेंदिवस त्यामध्ये वाढ होत आहे. सदरील संस्था भक्तांची दिशाभूल करुन मोठा निधी गोळा करीत असलेबाबत वृत्तपत्रांमधून तसेच भक्तांकडूनही पत्राद्वारे कळविले जात आहे.

श्री.एन.साईबाबा यांची विनामोबदला अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून नियुक्ती केल्यास आंध्रप्रदेश या संपूर्ण राज्यात उपरोक्तप्रमाणे संस्थानच्या नावांशी साधर्म्य असलेल्या सर्व संबंधित संस्थांची आर्थिक व सांख्यिकीय अशी सखोल माहिती संकलीत करता येईल. कार्यरत असणाऱ्या सर्व संस्थांची नावे व पत्ते, संस्था नोंदणीकृत आहेत काय, संस्था चालविण्यासाठी निधी गोळा करण्याची पद्धती, गोळा केलेला निधी व त्याचा विनियोग यासंबंधीत संपूर्ण माहिती वगैरे मिळविता येईल. सदरील कामकाज श्री.एन.साईबाबा, सिकंदराबाद विनामूल्य करणार असल्याने संस्थानवर याबाबत कुठलाही आर्थिक बोजा पडणार नाही. ते या कामासाठी शिर्डी येथे येतील त्यावेळेस फक्त संस्थानमार्फत त्यांची निवासाची व भोजनाची व्यवस्था मोफत करावी लागणार आहे.

तरी श्री.एन.साईबाबा, चार्टर्ड अकौटंट, सिकंदराबाद यांची सन २००५-०६ या आर्थिक वर्षासाठी विनामोबदला अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून सेवा घेण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.एन.साईबाबा यांची विनामोबदला अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून नेमणूक करण्यात येऊ नये. तथापि, आंध्रप्रदेश या संपूर्ण राज्यातील संस्थानच्या नावाशी साधर्म्य असलेल्या सर्व संबंधित संस्थांची आर्थिक व सांख्येकिय माहिती, कार्यरत असलेल्या सर्व संस्थांची नावे व पत्ते, संस्थान नोंदणीकृत आहे काय, संस्था चालविणेसाठी निधी गोळा करण्याची पद्धत, गोळा केलेला निधी व त्याचा विनीयोग या संबंधी माहिती घेणेकामी त्यांची विनामुल्य तत्वावर नियुक्ती करण्यात यावी, असें ठरलें.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१३.** **मुल्यवर्धित करासाठी सल्लागार नियुक्तीबाबत.**

**निर्णय क्र.१३.** महाराष्ट्रात मुल्यवर्धीत कर ( VAT ) अधिनियम, २००२ ची अंमलबजावणी १ एप्रिल,२००५ पासून करण्यात आलेली आहे. या कायदयामध्ये ट्रस्टचाही समावेश करण्यात आला आहे व संस्थानला मुल्यवर्धीत कराच्या तरतूदी लागू होत आहेत अशा आशयाचे दिनांक ११.०९.२००५चे पत्र संस्थानचे विनामूल्य काम पाहणारे स्थानिक कर सल्लागार श्री ए.एल.कुलकर्णी कोपरगांव यांचेकडून प्राप्त झाले आहे. वर्क्स कॉट्रॅक्टवर मुल्यवर्धीत कर कपातीच्या अटी बंधनकारक असल्यामुळें संस्थानने व्हॅट कपात नोंदणी क्रमांक ४२३१०९/टी/००४०/दिनांक २६ ऑक्टोबर,२००५ रोजी संस्थानचे कर सल्लागार श्री ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव यांचे सल्ल्यानुसार घेऊन त्याबाबतच्या कायदेशीर पुर्तता करण्याचे काम चालु केलेले आहे व संस्थानच्या इतर व्यवहारांवर ( प्रसाद-भोजन विक्री कुपन, लाडू-

प्रसाद विक्री, चहा-कॉफी-दूध विक्री व देणगी स्वरुपात आलेल्या वस्त्रे/वस्तुंची विक्री/लिलाव ) व्हॅट लागू होईल किंवा नाही या बाबत कलम ५६(१) (अ) नुसार कमीशनर ऑफ सेल्स टॅक्स, मुंबई यांचेकडे डीडीक्यू ( Determation of Desputed Question ) करुन याबाबत खुलासा करुन घेण्यात यावा अन्यथा साधारणतः दरमहा ७ ते ८ लाख रुपये कर भरावा लागेल असे त्यांनी कळविलेले आहे.

संस्थानमधील इतर व्यवहार हे भक्तांना सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून केले जातात. यामध्ये - नफा मिळविला जात नाही किंवा तो उद्देशही नाही. तेव्हा महाराष्ट्र मुल्यवर्धीत करातून भोजनप्रसाद विक्रीवर करातून सूट मिळावी या आशयाचे निवेदन राज्याचे अर्थ व नियोजन मंत्री मा.श्री.जयंत पाटील यांना दि.१५ ऑक्टोबर,२००५ रोजी मा. श्री. अध्यक्ष महोदय यांच्या हस्ते दिलेले आहे. त्या अनुषंगाने मुंबई विक्रीकर कार्यालयाने पत्रव्यवहार चालू केलेला आहे.

यापुर्वी अस्तित्वात असलेल्या विक्री कर कायदयातून संस्थानला भोजनप्रसादाच्या विक्रीवर विक्री करातून सूट देण्यात आली होती, त्यासाठी सन १९९१-९२ मध्ये ही सवलत मिळून देण्यासाठी श्री.पी.सी.जोशी, अॅड.हायकोर्ट, मुंबई यांना रु.२०,०००/- फी अदा करण्यात आली होती. अशाचप्रकारचा डीडीक्यू/ अॅडव्हास रुलींग कमीशनर ऑफ सेल्सटॅक्स, मुंबई यांचेकडे करावा लागेल. त्यासाठी आता रु.५०,०००/- इतकी फी त्यांनी कळविलेली आहे.

करांची तीव्रता व जाचक अटी लक्षात घेता आकारलेली फी देण्यास काही हरकत नाही व या केस मध्ये मा. अर्थमंत्र्यांचे सहाय्य मिळाल्यास मुल्यवर्धीत कर संस्थानच्या व्यवहारांवर माफ होऊ शकेल असे श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव यांनी त्यांचे दिनांक ०१.०१.२००६ चे पत्रान्वये कळविलेले आहे. तरी कमीशनर ऑफ सेल्सटॅक्स, मुंबई यांचेकडे डीडीक्यू/अॅडव्हास रुलींग करण्यासाठी श्री.पी.सी.जोशी, मुंबई यांची रु.५०,०००/- च्या मोबदल्यात व्हॅटसंबंधीचे संपूर्ण कामकाज पाहण्यासाठी नियुक्ती करणे व स्थानिक पातळीवर श्री.ए.एल.कुलकर्णी, कोपरगांव व शशीकांत कुलकर्णी, नासिक यांची विनामूल्य काम पहाण्यास नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१४.** **पूर्वलेखापरिक्षक (Pre Auditor) नेमणेसाठी सक्षम संस्थेची नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.१४.** संस्थानच्या कामकाजाचा व्याप दिवसेंदिवस वाढत असून, त्याच बरोबर आर्थिक व्यवहारातही मोठया प्रमाणात वाढ होत आहे. वाढत्या व्यवहारावर योग्य नियंत्रण रहावे, यासाठी लेखाशाखेकडून आदा करण्यात येणारे प्रत्येक देयक, आदा होण्यापूर्वी त्याचे पूर्व लेखापरिक्षकाकडून (Pre-Auditor) लेखापरिक्षण होणे गरजेचे आहे.

आदा होण्यापूर्वी देयकांचे पूर्व लेखापरिक्षण (Pre-Audit) झाल्यास, नजर चूकीने होणा-या चुका व काही संभाव्य धोके टाळणे सहज शक्य होईल. तसेच वैधानिक लेखापरिक्षणाच्या कालावधीमध्ये पूर्व लेखापरिक्षक स्वतः हजर राहणार असल्यामुळे वैधानिक लेखापरिक्षणासही त्याची मदत होऊन, सध्या वैधानिक लेखापरिक्षक घेत असलेल्या हरकतीच्या मुद्यांचे प्रमाणही बरेच कमी होण्यास मदत होईल. तसेच होणारे सर्व आर्थिक व्यवहार हे अधिनियम-२००४ मधील तरतुदींप्रमाणे होतात की नाही हे पाहण्याचीही सर्वस्वी जबाबदारी पूर्व लेखापरिक्षकावर राहणार असल्याने आर्थिक व्यवहारावर योग्य नियंत्रण राहील.

मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०५ नोव्हेंबर, २००५ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.६९४ अन्वये, सन २००५-०६ या आर्थिक वर्षाकरीता, अंतर्गत लेखापरिक्षणाच्या कामकाजासाठी, दोन सक्षम संस्थांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्याप्रमाणेच पूर्व लेखापरिक्षक (Pre-Auditor) म्हणून बाहेरील सक्षम संस्थेची नियुक्ती करण्यात यावी असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन संस्थानचे पूर्व लेखापरिक्षक नेमणूकीचे अधिकार मा.अध्यक्ष महोदय यांना प्रदान करणेत आले. (कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.१५.** **प्रसादालय हॉल, किचन व उप भांडाराचे आतील भागातील रंगकाम व दुरुस्तीचे निविदांबाबत.**

**निर्णय क्र.१५.** प्रसादालय हॉल, किचन व उपभांडाराचे आतील रंगकाम व दुरुस्ती करणेकामी येणाऱ्या अंदाजे रुपये ४,२५,०९०.०० चे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०२/१०/२००५ नि.क्र. ६१५ अन्वये मान्यता देण्यात आली आहे. याकामी आर्किटेक्ट निकम पा. श्रीरामपूर यांचेकडून कोरे निविदा फॉर्म तयार करुन घेउन स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या होत्या. कोऱ्या निविदा फॉर्मची विक्री दि. २६/१२/२००५ ते दि. ०२/०१/२००६ अखेर होती

विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फॉर्म विकत घेतले होते.

१. श्री.सचिन जवाहरलाल बोगावत, अ.नगर

२. श्री.संतोष नागनाथ गंजेगांवकर, मु.निघोज, ता.राहाता

३. श्री.महेश व्ही.भूतकर, अ.नगर
४. श्री.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर
५. मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो.,नाशिक
६. श्री.आर.बी.कुमार, अ.नगर
७. श्री.आर.एल.भुतडा, कोपरगांव

सिलबंद निविदा सादर करण्याची मुदत दि.०५/०१/२००६ अखेर ठेवण्यात आली होती. विहित मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या आहेत.

१. श्री.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर
२. श्री.आर.बी.कुमार, अ.नगर
३. मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो.,नाशिक

उपरोक्त ठेकेदारांच्या सिलबंद निविदा (लिफाफा क्र.१ व २) मा.व्यवस्थापन समितीचे आजचे सभेपूढे उघडण्यात आला असता, निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नाव | निविदेतील देऊ केलेले दर |
|---|---|---|
| ०१. | श्री.महेंद्र आर. टाटीया, श्रीरामपूर | ३.६% कमी |
| ०२. | श्री.आर.बी.कुमार, अ.नगर | अपात्र |
| ०३. | मे.साहेबराव कोकाटे ॲण्ड असो.,नाशिक | १.५% कमी |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.महेंद्र आर.टाटीया, श्रीरामपूर यांचे निम्नतम दर मान्य करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असें ठरलें. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१६.** **संस्थानचे विविध इमारतींचे रंगकाम करणेबाबत.**

**निर्णय क्र.१६.** संस्थानचे विविध इमारतींना रंगकाम करण्याचे काम यापुर्वी ठेकेदार मे. के. बी. पाथरीकर, औरंगाबाद यांना जा.नं. एसएसएस/वशी-बांध/ ७६९९/२००३ दि. १३/०९/२००३ चे कार्यादेशान्वये निविदेतील दरापेक्षा २७.८८ टक्के कमी दराने (रु. ३१,९८,१७२.०० मात्र रकमेचे) देण्यात आले होते. त्यापैकी ठेकेदार यांनी खालीलप्रमाणे रु.१६,८२,३७८.०० मात्र रकमेचे रंगकाम पुर्ण केले आहे.

०१) भक्तनिवास - १८ व्ही.आय.पी.खोल्या व्यतिरिक्त रंगकाम पूर्ण.
०२) मंदिर परिसर - ६०% रंगकाम पूर्ण.
०३) साईप्रसाद नं.१ - रंगकाम पूर्ण.
०४) साईनाथ हायस्कूल - रंगकाम पूर्ण.

निविदा शर्तीनुसार काम पूर्ण करण्याची मुदत ६ महिने (दि.०९/०४/२००४) होती. ठेकेदार यांना आलेल्या अडचणींचा विचार करता ठेकेदार यांना ३ वेळेस दि.३१/०८/२००५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. ठेकेदार यांचेकडून वाढीव मुदतीतही काम पूर्ण न झाल्यामुळे त्यांना जा.क्र.८३८७ दि.३१/०८/२००५ रोजीचे पत्रान्वये संस्थानकडे जमा असलेली डिपॉझीटची रक्कम रु.१,१२,२९५/- मात्र का जप्त करण्यात येवू नये याबाबत खुलासा मागविण्यात आला होता. मात्र ठेकेदार यांनी याबाबत कोणताही खुलासा सादर केलेला नाही. यावरुन ठेकेदार यांची राहिलेले रंगकाम पूर्ण करण्याची इच्छा दिसून येत नाही. त्यामुळे राहिलेल्या रंगकामासह संस्थानचे उर्वरित इमारतींचेही आतील रंगकाम नव्याने निविदा मागवून करुन घेणेकरीता आर्किटेक्ट मे.निकम पा. असो., श्रीरामपूर यांचेकडून नव्याने एस्टिमेट मागविले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | इमारतीचे नावं | रक्कम |
|---|---|---|
| ०१ | स.नं.१०७ मधील अधिकारी वर्ग स्टाफ क्वॉर्टर | १,५९,६०९.०० |
| ०२ | मंदिर परिसरातील राहिलेले रंगकाम | ४,५१,२१८.०० |
| ०३ | जुनी 'A' व 'B' टाईप स्टाफ क्वॉर्टर | ५,४३,३०५.४८ |
| ०४ | कनकुरी तलावावरील इमारती | ४४,०५५.०० |
| ०५ | इंग्लिश मिडीयम स्कुल नवी नइमारत | २,९९,९२७.९० |
| ०६ | आय.टी.आय.नवी नइमारत व वर्कशॉप | ३,४९,७००.२६ |
| ०७ | साईउद्यान इमारत | ४,८५,५६२.१८ |
| ०८ | स.नं.१२५ बी-१,बी-२,बी-३,बी-४ स्टाफ क्वॉर्टर | ३,७१,५३१.८४ |
| ०९ | स.नं.१२५ - स्टाफ क्वॉर्टर (A१, A२) | १,६३,८३५.८८ |
| १० | धर्मशाळा इमारत | ५,०४,८२२.६० |
| ११ | सेवाधाम इमारत | २,२७,५३४.७६ |
| १२ | साईनगर इमारत | १,२५,७८४.१८ |
| १४ | समर्पण इमारत | १,२४,०६९.८१ |
| १५ | मंगलकार्यालय | ३०,८८१.६८ |
| १६ | भक्तनिवासस्थान इमारत (५०० रुम) | ९,५७,७९६.७१ |
| १७ | साईनिवास इमारत (व्ही.आय.पी.) | १,९३,५३०.६० |
| १८ | सेंट्रल गोडावून (जुने) | ७४,२०१.१८ |

| | | |
|---|---|---|
| १९ | शांतीनिकेतन इमारत | ४५,६२५.५० |
| २० | शैक्षणिक संकुल गॅदरिंग हॉल | ४५,९०४.६७ |
| | **एकूण :-** | **५१,९८,८९७.२६** |
| | **५% कन्टेजन्सी** | **२,५९,९४५.००** |
| | **एकूण रुपये** | **५४,५८,८४२.००** |

तरी यापुर्वीचे रंगकाम ठेकेदार के.बी.पाथरीकर, औरंगाबाद यांचे संस्थानकडे जमा असलेले सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम रु.१,१२,२९५.०० मात्र जप्त करणेस व आर्किटेक्ट मे.निकम पा.असो., श्रीरामपूर यांनी नव्याने सादर केलेल्या उपरोक्त एस्टिमेटनुसार रंगकामाकरीता **रु.५४,५८,८४२.००** मात्रचे खर्चास व वर्तमानपत्रातील जाहीरातीव्दारे निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, यापुर्वीचे रंगकाम ठेकेदार के.बी.पाथरीकर, औरंगाबाद यांचे संस्थानकडे जमा असलेले सिक्युरिटी डिपॉझीट रक्कम रु.१,१२,२९५.०० मात्र जप्त करणेस व आर्किटेक्ट मे.निकम पा.असो., श्रीरामपूर यांनी नव्याने सादर केलेल्या एस्टिमेटनुसार रंगकामाकरीता **रु.५४,५८,८४२.००** मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. व वर्तमानपत्रात जाहीरात देऊन, इमारतींना रंगकाम करणेकामी निविदा मागविण्यात याव्यात, असें ठरलें.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१७.** **नवीन मिटींग हॉलमध्ये टेबल व इतर फर्निचरबाबत.**

**निर्णय क्र.१७.** साईनिवास अतिथीगृहाच्या पहिल्या मजल्यावरील हॉलमध्ये मा. व्यवस्थापन समितीची सभा घेण्यात येते. सभेकरीता तात्पुरते टेबल लावून मिटींग टेबलची व्यवस्था करण्यात येते. या हॉलचे फर्निचर व मिटींग टेबल तयार करणेकामी स्थानिक आर्किटेक्टसच्या पॅनेलवरील आर्किटेक्ट कडून प्लॅन व एस्टीमेट मागविण्याचे मा. व्यवस्थापन समिती दि. ०८/०५/२००५ निर्णय क्र. २१८ अन्वये ठरले आहे. त्यानुसार पॅनेलवर भूतडा असोसिएटस, श्रीरामपूर यांचेकडून याकरीता प्लॅन व एस्टीमेट मागविण्यात आले आहेत . त्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

मा. व्यवस्थापन समिती मुख्य टेबल, फर्निचर विनर, मेटलशिट,
P.U. पॉलीश, frosted glass सह तयार करणे - रु.४,८०,०००.००
खुर्च्या, पार्टीशन, पॅनलींग, कलर, इलेक्ट्रीफिकेशन इ. सह.

आर्किटेक्ट यांनी सादर केलेल्या प्लॅन मध्ये योग्य त्या सुधारणा करुन त्यानुसार फर्निचर तयार करता येईल. तरी त्यासाठी येणाऱ्या खर्चास व याकामी निविदा मागविण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

आजचे सभेत आर्किटेक्ट मे.भूतडा असोसिएटस्,श्रीरामपूर हे सभेस उपस्थित होते. त्यांनी तयार केलेले प्लॅन सभेस दाखवून त्याबाबत सभेस सविस्तर माहिती दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.भूतडा असोसिएटस,श्रीरामपूर यांनी तयार केलेला प्लॅन व अंदाजे रक्कम रुपये ४,८०,०००/- चे खर्चास तसेच याकामी निविदा मागविण्यास मान्यता देणेत आली.

(कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१८.** **मंदीर परिसर व प्रसादालय परिसर वॉल कम्पाऊंड मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.१८.** मंदिर परिसर, प्रसादालय परिसर, साईउद्यान व मंगल कार्यालय येथे कास्ट आयर्न ग्रिल असलेली कंम्पाउंड भिंत बांधकाम करणेचे काम ठेकेदार मे. नितीन बी. औताडे, पोहेगांव यांना इकडील जा.नं. १००८/०५ दि. ०२/०५/२००५ चे कार्यादेशान्वये देण्यात आलेले आहे. निविदा शर्तिनुसार काम पूर्ण करण्याचा कालावधी चार महिने (दि. १४/०९/२००५) अखेर होता.

ठेकेदार यांनी दि. २१/१२/२००५ चे पत्रान्वये खालील अडचणीमुळे कामास विलंब झालेला असल्याचे कळविले आहे.

०१. नगर मनमाड रस्त्यालगत संस्थानच्या पूर्वीच्या कंपाउन्ड भिंतीवरच नवीन कास्ट आयर्न भिंतीचे बांधकाम करावयाचे नियोजत होते मात्र नगर-मनमाड रस्ता रुंदीकरणामध्ये लेंडीबागेकडील कंपाउन्ड भिंत तुटल्यामुळे तसेच प्रसादालयाचे पश्चिम व दक्षिण बाजूकडील भिंतीचे ठिकाणी पुर्वीची भिंत व नियोजीत रस्ता यामध्ये गॅप असल्यामुळे नव्याने पायासह भिंत बांधावी लागली. त्यामुळे कामांची क्वांटीटी वाढली.

०२. जुना पिंपळवाडी रस्त्याचे उत्तर बाजूकडील भिंतीचे मजबुतीकरीता आर.सी.सी. कॉलम व वाढीव बिम घ्यावे लागले.

०३. गुरुपौर्णिमा व दसरा, दिवाळी या काळात जास्त गर्दीमुळे कामास वेग देता आला नाही.

०४. दररोज गर्दी व फुटपाथ वरील दुकानांमुळे सकाळी ११ वाजेपर्यंत व संध्याकाळी ५ वाजेपासून पुढे काम करता येत नाही.

०५. स्टोन क्लॅडींगचे कामासाठी चांगले कारागीर लागतात. ते करागीर मिळण्यास उशिर झाला. तसेच कामाचा दर्जा चांगला होणेसाठी प्रत्येक दगड जागेवर मापानुसार तोडून घडवावा लागतो. त्यामुळे विलंब झाला.

०६. पावसामुळे सगळीकडे पाणी असल्यामुळे व नगर जिल्हयात वाळू लिलावास बंदी असल्यामुळे वाळू मिळण्यास विलंब झाला.

०७. दि. २४/०६/२००५ ते दि. ३०/०६/२००५ या कालावधीत नगरपंचायतीने प्रसादालय परिसरातील खोदाई बंद केली व झालेली खोदाई पुन्हा बुजवून टाकली. सदर कामासाठी मा. कार्यकारी अधिकारी साहेब व शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांच्यात मिटींग झाल्यावर पुढील कामास परवानगी मिळाली.

०८. प्रसादालय कॉर्नर ते प्रसादालय गेट नं. २ दरम्यान, आय.टी.केबल ओ.एफ.सी केबल व संस्थानला पाणी पूरवठा करणारी एम एस पाण्याची लाईन गेल्यामुळे खोदाई जपून करावी लागली.

कास्ट आयर्न कंपाउन्ड भिंतीचे उपरोक्त काम हे विशेष कलाकुसरीच्या स्वरुपाचे असून मंदिर परिसराचे हद्दीवर आहे. तसेच नगर-मनमाड व जुना पिंपळवाडी या रहदारीच्या व साईभक्तांच्या गर्दीच्या रस्त्यालगत आहे. यामुळे तसेच कामाची क्वांटीटी वाढल्यामुळे कामास जादा कालावधी लागलेला आहे. याबाबत चर्चा होऊन ठेकेदार यांना दि. २८/०२/२००६ पर्यंत मूदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-बांधकाम विभाग प्रमुख)

**विषय नं.१९. साईभक्तांना सावलीसाठी "ॲव्हनींग" उभारणी करणेबाबत.**

**निर्णय क्र.१९.** मंदिर परिसरामध्ये उन्हापासून व पावसा पासून भक्तांचे संरक्षण व्हावे यासाठी वेळोवेळी तसेच उत्सव काळात (श्री रामनवमी, श्री गुरुपौर्णिमा, श्री पुण्यतिथी उत्सव)ताडपत्री तसेच कापडी मंडपाची उभारणी करावी लागते.उन्हाळयात तर मार्च ते जून महिन्याच्या पहिल्या आठवडयापर्यंत मंडप उभारणी करावी लागते.तसेच साईचरीत्र पारायण सोहळा,श्री रामनवमी उत्सवात येणा-या पालख्या व इतर धार्मिक कार्यक्रमांचे वेळी लहान-मोठे कापडी मंडप टाकावे लागतात. याकामी दरवर्षी अंदाजे रुपये ३,००,०००/-खर्च येतो.

याकरीता आकर्षक,टिकावू असे ॲव्हनींगची उभारणी केलेस दर वर्षी मंडप उभारणीसाठी करण्यात येणारा खर्च कमी होऊ शकेल असे वाटते. या शिवाय हे 'ॲव्हनींग' फोल्डींग करता येणारे असल्यामुळे आवश्यकता नसेल त्यावेळेस ते गुंडाळून ठेवता येतील.

मेकॅन्को एन्टरप्राईजेस,पुणे यांनी प्रत्यक्ष शिरडी येथे येऊन या बाबत सर्व्हे केला असून त्यांनी खालीलप्रमाणे एकूण रु.७३,१९,९४०.०० मात्र .या व्यतिरीक्त ८ टक्के प्रमाणे व्हॅटची रक्कम रुपये ५,८५,५९५.०० असे एकूणरु.७९,०५,५३५.०० खर्चाचे एस्टीमेट सादर केले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| Sr.No. | Type of Awning &Fabric | size (sq.Ft.) | Qty. Nos. | Total | Rate per sq.ft. | Amount |
|---|---|---|---|---|---|---|
| **01** | **for Gurushtan** | | | | | |
| 01.a | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site (03 poles) | 32x12 384 | 1 | 384 | 150.00 | 57600.00 |
| 1b. | same as above 3 poles | 32x7 224 | 1 | 224. | 150.00 | 33600.00 |
| 1c | same as above 3 poles | 32x12 384 | 1 | 384 | 150.00 | 57600.00 |
| 1d | same as above 3 poles | 32x12 384 | 1 | 384 | 180.00 | 69120.00 |
| 1e | same as above 2 poles | 22x12 264 | 1 | 264 | 180.00 | 47520.00 |
| | Total poles for the above | | | 14 | 4000.00 | 56000.00 |
| | Total for the above (1) | | | | | **321440.00** |
| **02** | **for Gurusthan South** | | | | | |
| 02a. | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site (04 poles) | 43x12 516 | 1 | 516 | 150.00 | 77400.00 |
| | Total poles for the above | | | 04 | 4000.00 | 16000.00 |
| | Total for the above(02) | | | | | **93400.00** |
| **03** | **for Samadhi Mandir** | | | | | |
| 3a | same as above 8 poles | 90x12 1080 | 1 | 1080. | 150.00 | 162000.00 |
| 3b | same as above 2 poles | 16x12 192 | 1 | 192 | 150.00 | 28800.00 |
| 3c | same as above 4 poles | 45x12 540 | 1 | 540 | 150.00 | 81000.00 |
| | Total polesfor the above | | | 14 | 4000.00 | 56000.00 |
| | Total for the above (3) | | | | | **327800.00** |
| **04** | **Samadhi Mandir Uttar** | | | | | |
| 4a | same as above 5 poles | 56x12 672 | 1 | 672 | 150.00 | 100800.00 |
| . | Total poles for the above | | | 5 | 4000.00 | 20000.00 |
| | Total for the above | | | | | **120800.00** |
| **05** | **For Gurusthan** | | | | | |
| 5a | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories | | | | | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | and fitting installed at site incl.poles | 325x28 9100 | 1 | 9100 | 250.00 | 2275000.00 |
| | Total for the above (5) | | | | | **2275000.00** |
| **06** | **Samadhi Mandir Dengi karyalaya** | | | | | |
| 6a | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site (03 poles) | 30x11 330 | 1 | 330 | 150.00 | 49500.00 |
| | Total poles for the above | | | 3 | 4000.00 | 12000.00 |
| | Total for the above (6) | | | | | **61500.00** |
| **07** | **Ladoo prasad Front** | | | | | |
| 7a. | Same as above (5 poles) | 57x12 684 | 1 | 684 | 150.00 | 102600.00 |
| | Total poles for tha above | | | 5 | 4000.00 | 20000.00 |
| | Total for the above ( 7 ) | | | | | **122600.00** |
| **08** | **For Shani Mandir Front** | | | | | |
| 8a | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site (incl poles)actul size 90x22 | 90x27 2430 | 1 | 2430 | 250.00 | 607500.00 |
| | Total for the above ( 8 ) | | | | | **607500.00** |
| **09** | **Satyanarayan Gate -Admin Gate** | | | | | |
| | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site (incl poles)actul size actual size 135x25 | 135x30 4050 | 1 | 4050 | 250.00 | 1012500.00 |
| 9a | Total for the above ( 9 ) | | | | | **1012500.00** |
| **10** | **Meeting Hall** | | | | | |
| 10a | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site 3 poles | 32x12 384 | 1 | 384 | 150.00 | 57600.00 |
| 10b | Same as above(6 poles) | 70x16 1120 | 1 | 1120 | 150.00 | 168000.00 |
| | Total poles for the above | | | 9 | 4000.00 | 36000.00 |
| | Total for the above (10) | | | | | **261600.00** |
| 11a | Providing & Fixing of Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site (incl poles)actul size actual size 65x20 | 65x25 1625 | 1 | 1625 | 250.00 | 406250.00 |
| 11b | Same as above (incl poles actual size 100x14 | 100x18 1800 | 1 | 1800 | 250.00 | 450000.00 |
| | Total for the above 11 | | | | | **856250.00** |
| **12** | **Dwarkamai South** | | | | | |
| 12a | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site 7 poles | 78x12 936 | 1 | 936 | 150.00 | 140400.00 |
| 12b | Same pole for the above(6poles) | 65x18 780 | 1 | 780 | 150.00 | 117000.00 |
| 12b | Same pole for the above | 65x18 780 | 1 | 780 | 150.00 | 117000.00 |
| | Total poles for the above | | | 13 | 4000.00 | 52000.00 |
| | Total for the above (12) | | | | | **309400.00** |
| **13** | **Chawdi** | | | | | |
| 13a | Same as above (3 poles) | 33x12 396 | 1 | 396 | 150.00 | 59400.00 |
| | Total poles for the above | | | 3 | 4000.00 | 12000.00 |
| | Total for the above 13 | | | | | **71400.00** |
| **14** | **Datta Mandir baugh** | | | | | |
| 14a | Providing & Fixing of Retractable/Fixed Awning with imported double sided pvc costed fabric fited with all accessories and fitting installed at site (incl poles)actul size 65x37 | 95x37 3515 | 1 | 3515 | 250.00 | 878750.00 |
| | Total for the above (14 ) | | | 31860 | | 878750.00 |
| | Total above 1+14 | | | | | **7319940.00** |
| | | 8% Vat | | | | **585595.00** |
| | Grand Total- | | | | | **7905535.00** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मंदिर परिसरात प्रकल्पाचे आर्किटेक्ट यांचे सल्ल्याने संस्थान परिसरात जेथे ॲव्हनींग उभारणे आवश्यक आहे अशाच ठिकाणी उभारण्यात यावे. तसेच जेथे मंदिर परिसराचे सौंदर्याला बाधा येईल अशा ठिकाणी ॲव्हनींग उभारु नये, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२०.** **भक्तनिवास (५००रुम) कँटीन मधील दुरुस्ती कामाबाबत.**

**निर्णय क्र.२०.** साईबाबा भक्तनिवासस्थान (५०० खोल्या) इमारत साईभक्तांचे वापरासाठी सन १९९४ पासून आहे. सदर इमारतीत सुमारे २९०० ते ३००० साईभक्तांची राहण्याची व्यवस्था आहे. या इमारतीत नेहमीच साईभक्तांची गर्दी असते. साईभक्तांची चहा, नाष्टा व जेवण इत्यादीसाठी कॅन्टीनची सोय करण्यात

आलेली आहे. सदर कॅन्टीनकरीता अंदाजे एकूण १४४३१ चौ.फुट क्षेत्र उपयोगात येत आहे. तसेच सुमारे ३०० साईभक्तांची आसन व्यवस्था करण्यात आलेली आहे.

कॅन्टीनचा मोठया प्रमाणात वापर होत असल्याने दुरुस्तीचे काम तसेच अंतर्गत सुविधा निर्माण करण्याचे काम हाती घेणे आवश्यक आहे. कॅन्टीन मधिल फ्लोरींग, भिंतीवरील टाईल्स, रंगकाम, ॲल्युमिनियम पार्टीशन व दरवाजा इत्यादी दुरुस्तीचे कामासह नवीन पार्टीशन, ग्रेनाईट टॉप काउंटर, किचन मधिल फ्लोरींग बसविणे व भिंतीवर टाईल्स बसविणे, स्टेनलेस स्टिल मध्ये गटर करणे, फर्निचर इत्यादी कामे करणे आवश्यक आहे. याकामी आर्किटेक्ट अरविंद वैद्य, संगमनेर यांनी रु.१५,२४,५००/- मात्र रकमेचे एस्टिमेट सादर केले आहे. तसेच किचनमध्ये ॲल्युमिनियम / जी.आय.डक्ट धुर-हवा बाहेर जाण्यासाठी, स्टेनलेस स्टिल किचन प्लॅटफॉर्म इत्यादी बाबींचे नियोजन व खर्च किचन कन्सल्टंट श्री.संजीव देशमुख, मुंबई यांचेकडून घेता येईल.

तरी वरीलप्रमाणे साईबाबा भक्तनिवासस्थान कॅन्टीनमध्ये सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी रु.१५,२४,५००/- मात्रचे अंदाजे खर्चास व याकामी निविदा मागविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

अंदाजपत्रकात मुख्यत: किचनची दुरुस्ती व इतर रंगकाम आवश्यक बाबींचा समावेश करण्यात आला आहे. कॅन्टीनचे मुख्य हॉलचे फ्लोअरिंग, डॅडो, तसेच सिलींग सर्व टेबल्सकरीता ग्रेनाईट टॉप इत्यादी सर्व कामांचा समावेश करुन सुधारित एस्टिमेट तयार करुन निविदा मागविण्यात यावी. तसेच प्रसादालयाकरीता नेमण्यात आलेले किचन कन्सल्टंट श्री संजीव देशमुख यांचे सल्ल्याने किचनमध्ये किचन इक्वीपमेंट इत्यादी आवश्यक बाबींचे अंदाजपत्रक सभेपुढे सादर करण्यात यावे, असे ठरले.
(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२१.** **चौकशी व निवासस्थान कार्यालयाचे दुरुस्तीबाबत.**

**निर्णय क्र.२१.** सन १९९६ साली चौकशी कार्यालय शांतीनिवास इमारतीतून साईप्रसाद नं. १ मध्ये तळमजल्यावरील २३७३.०० चौ.फूट साईजच्या हॉलमध्ये स्थलांतरीत झालेले आहे. सद्यस्थीतीत हॉलचे एका बाजुला संस्थान नोकरांची पतसंस्थेकरिता लॉकरसाठी २६६.०० चौ.फुट जागेत प्लायवूड पार्टीशन करुन देण्यात आले आहे. हॉलचे एका बाजूस ६०४.०० चौ.फुट या मोजमापाचे गाद्या, चादर इत्यादीसाठी स्टोअर म्हणून वापर करण्यात येत आहे. उर्वरीत भागात सध्या अंतर्गत जाळया बसविण्यात येवून पार्टीशन करण्यात आले आहे.

साईभक्तांची निवासव्यवस्था करणेसाठी असलेल्या सदर कार्यालयाची सुधारीत अंतर्गत रचना करुन सुशोभित फर्निचर इत्यादी सोयी सुविधा करणे आवश्यक आहे. याकामी भुतडा असोसिएटस, श्रीरामपुर यांनी **रु.८,८७,२५०.००** मात्र रकमेचे अंदाजपत्रक सादर केले असून सदर खर्चात मार्बो ग्रेनाईट फ्लोरींग, फॉल सिलींग, इलेक्ट्रीक काम, अंतर्गत फर्निचर, काउंटर, रंगकाम इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे. तरी सदरचे कामास व खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.
(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२२.** **शेती महामंडळाकडून घेतलेल्या जमीनीला तारेचे कुंपण करणेसाठी आलेल्या निविदांबाबत.**

**निर्णय क्र.२२.** श्रीसाईबाबा संस्थानचे शेती महामंडळाकडून संपादीत केलेल्या जमिनीभोवती काटेरी तारेचे कुंपन करणेसाठी ठेकेदार मे.के.बी. पाथरीकर, औरंगाबाद यांना इकडील जा.क्र. एसएसएस/वशी-बांध/७६९६/२००३ दि.१३/०९/२००३ अन्वये कार्यादेश देण्यात आला . ठेकेदार के.बी. पाथरीकर यांनी याकामी खड्डे खोदाईचे कामास सुरुवात केली होती. याकामी आवश्यक असलेले मोजणी नकाशे तालुका निरीक्षक भुमीअभिलेख यांचेकडून दि.२९/०१/२००४ रोजी प्राप्त करण्यात आले त्यानंतर इकडील पत्र क्रं. २४३७/०४/दि.०३/०३/२००४ अन्वये ठेकेदार यांना सदर काम त्वरीत सुरु करणेबाबत कळविले होते. मात्र ठेकेदार यांनी काम सुरु केले नाही. दि.२८/०७/२००४ अखेर मूदतवाढ देण्यात आली. मात्र सदर मुदतीतही त्यांनी काम सुरु केले नाही. त्यामुळे मा. व्यवस्थापन मंडळ सभेत निर्णय क्र. ३६८ (एफ) दि.३१/०७-०१/०८/२००४ अन्वये त्यांना देण्यात आलेला कार्यादेश रद्द करुन त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यात यावी व याकामी फेर निविदा मागविण्यात याव्यात असे ठरले आहे. त्यानुसार मे.के.बी. पाथरीकर, औरंगाबाद यांना दि. ०१/०९/२००४ अन्वये देण्यात आलेला कार्यादेश रद्द करण्यात येउन त्यांची संस्थानकडे जमा असलेली बयाणा रक्कम रुपये २५,६३५.०० मात्र जप्त करण्यात आली आहे.

शेती महामंडळाचे एकूण वीस गटापैकी सोळा गटाचे अतिक्रमीत क्षेत्र मा.प्रांत अधिकारी, श्रीरामपूर यांनी दि. १०/०१/२००६ रोजी पोलीस संरक्षणात काढले आहे. अतिक्रमीत क्षेत्राच्या हद्दीवर अँगल रोवण्यात आले आहे. मात्र काही ठिकाणी शेतकरी सदरचे अँगल काढून टाकतात करीता तातडीने सर्व क्षेत्राभोवती तारकंपाउन्ड करणे अत्यंत गरजेचे आहे. याकामी वर्तमानपत्रात जाहिरात

देवून दि.२१/०१/२००६ ते दि.२८/०१/२००६ अखेर निविदा विक्री ठेवण्यात आलेली होती. तसेच दि. ३०/०१/२००६ रोजी सिलबंद निविदा सादर करावयाची मुदत होती.

कोरे निविदा फॉर्मविकत घेतलेल्या ठेकेदारांना दिनांक २८.०१.२००६ रोजीचे पत्रान्वये खालील बाबी कळविण्यात आल्या होत्या

०१) कर कपातीबाबत-

अ) इनकम टॅक्स २% अधिक १०% सरचार्ज आणि कर व जादा आकारावर (Surcharge) २% शैक्षणिक अधिभारासह एकूण २.२४४% दराने कपात करण्यात येईल.

ब) विक्रीकर रजिस्टर्ड ठेकेदारांकडून व्हॅट २% दराने व विक्रीकर रजिस्टर्ड नसलेल्या ठेकेदारांकडून ४% दराने व्हॅट कपात करण्यात येईल.

०२) स्ट्रक्चरल स्टीलच्या मूळ दर रुपये २९,६००.०० प्रति मे.टन आहे.

०३) सिमेंटचा मूळ दर रुपये १५०.०० प्रती गोणी आहे.

०४) काटेरी तार १२ गेजची आहे.

०५) सिमेंट ब्लॉकचे प्रमाण १:४:८ आहे.

निविदेतील सर्व अटी व शर्ती तसेच स्पेसिफिकेशन न बदलणारे आहेत.

विहीत मुदतीत खालील निविदासादरकर्त्या नी आपल्या निविदा सादर केल्या आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव |
|---|---|
| ०१. | श्री राजेश कदम,पुणे |
| ०२. | श्री आर.बी.कोते,नाशिक |
| ०३. | श्री बी.एम.गुंजाळ,संगमनेर |
| ०४. | मे.पंडित इंजिनिअरिंग कंपनी,सिन्नर |
| ०५. | श्री योगेश एस.पाटील,कोपरगांव |
| ०६. | श्री विशाल पारख,नाशिक |
| ०७. | श्री आर.व्ही.जाधव,अहमदनगर |
| ०८. | मे.वाघ बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स,कोपरगांव |
| ०९. | मे.आर.एल.भुतडा,कोपरगांव |

उपरोक्त निविदासादरकर्त्यांनी सादर केलेल्या निविदांचे पाकीट नं.०१ व ०२ आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता निविदासादरकर्त्यांनी पुढीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्यांचे नांव | निविदेत देऊ केलेले दर | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | श्री राजेश कदम,पुणे | निविदा दरात | अनुपस्थित |
| ०२. | श्री आर.बी.कोते,नाशिक | १०% अधिक | ८% अधिक |
| ०३. | श्री बी.एम.गुंजाळ,संगमनेर | ४.९९% कमी | अनुपस्थित |
| ०४. | मे.पंडित इंजिनिअरिंग कंपनी,सिन्नर | अपात्र | अपात्र |
| ०५. | श्री योगेश एस.पाटील,कोपरगांव | १% कमी | १% कमी |
| ०६. | श्री विशाल पारख,नाशिक | अपात्र | अपात्र |
| ०७. | श्री आर.व्ही.जाधव,अहमदनगर | २.०१% कमी | ३% कमी |
| ०८. | मे.वाघ बिल्डर्स ॲण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, कोपरगांव | १०% अधिक | १७% अधिक |
| ०९. | मे.आर.एल.भुतडा,कोपरगांव | २०.११% अधिक | अनुपस्थित |

उपरोक्त निविदाधारकांनी देऊ केलेल्या दराचा विचार करता, श्री बी.एम.गुंजाळ यांचे दर निम्नतम आहेत. परंतू ते चर्चा /वाटाघाटीस उपस्थित नसल्याने मे.आर.व्ही.जाधव, अहमदनगर यांचे निम्नतम दर मान्य करण्यात यावे असे ठरले. (कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**विषय नं.२३.** **श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर कॅंटीन चालविणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२३.** श्री साईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर कॅन्टीन चालविणेकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/११/२००५ चे सभेत ठेवण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ६६८ अन्वये १ वर्षाकरीता प्रायोजक तत्वावर चालविण्यास मंजूरी मिळालेली आहे.

त्यानुसार दि. २६/११/२००५ चे मंजूर टिपणीन्वये सदरच्या कॅन्टीन चालविणेकामी सकाळ, लोकमत, लोकसत्ता, दैनिक सामना, टाईम्स ऑफ इंडीया व इंडीयन एक्सप्रेस मुंबई आवृत्तीमध्ये जाहिरात देण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. २१/१२/२००५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे मुंबई व शिरडी कार्यालयात मिळून एकूण३० निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. मुंबई कार्यालयातुन ०१ व शिरडी कार्यालयातून ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.एक निविदा मा.विश्वस्त डॉ.पी.एल.तिवारी यांचे ऑफिसमध्ये दि.२१.१२.२००५ रोजी जमा करण्यात आली आहे. सोबत कॅशच्या स्वरुपात रु.१०,०००/- देण्यात आले होते. ज्याची पावती उशिरा म्हणजे दि.२६.१२.२००५ रोजी करण्यात आली आहे. ही निविदा श्री.दामोदर बिंदल

ॲण्ड असोसिएटस या नावाने भरण्यात आली आहे, ही धरुन एकूण०६ (सहा) निविदांचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|
| १ | चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. लि. शिर्डी |
| २ | गिरीश शिवनारायण झंवर, शिर्डी |
| ३ | महेश कारभारी पठारे, फत्याबाद |
| ४ | विराज केटरर्स , सावेडी - अहमदनगर |
| ५ | अनुपम सेंटर, कांदीवली-पुर्व |
| ६ | दामोदर बिंदल ॲण्ड असोसिएटस |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. निविदासादरकर्त्यांनी निविदेत खालीलप्रमाणे दर दिलेले आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | निविदेत देऊ केलेले दर |
|---|---|---|
| १ | चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. लि. शिर्डी | माल खरेदी , नोकर पगार, इंधन खर्च, लाईट बील व इतर खर्च संस्थानने करुन निव्वळ नफ्याच्या १०% घसारा |
| २ | गिरीश शिवनारायण झंवर, शिर्डी | १४,४४४.०० |
| ३ | महेश कारभारी पठारे, फत्याबाद | ५,०००.०० |
| ४ | विराज केटरर्स , सावेडी - अहमदनगर | १७,७७७.०० |
| ५ | अनुपम सेंटर, कांदीवली-पुर्व | रक्कम लिहीलेली नाही |
| ६ | दामोदर बिंदल ॲण्ड असोसिएटस | १०,०११.०० |

उपरोक्त सहा निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी समक्ष बोलविण्यात आले असता चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. लि. शिर्डी हे एकच निविदासादरकर्ते उपस्थित असल्याने सर्व निविदासादरकर्त्यांना वैद्यकीय समितीचे दिनांक ११.०२.२००६ सभेपूढे चर्चा/वाटाघाटीसाठी आमंत्रित करण्यात यावे व निर्णय घेण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**विषय नं.२४. श्रीसाईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर मेडिकल स्टोअर चालविणेकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२४.** श्री साईबाबा रुग्णालयात भाडेतत्वावर औषध दुकान चालविणेकामीचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. व्यवस्थापन समिती सभा दि. ०५/११/२००५ चे सभेत ठेवण्यात आला होता त्यावर चर्चा होऊन निर्णय क्रमांक ६६८ अन्वये १ वर्षाकरीता प्रायोजक तत्वावर चालविण्यास मंजूरी मिळालेली आहे.

त्यानुसार दि. २६/११/२००५ चे मंजूर टिपणीन्वये सदरच्या औषध दुकान चालविणेकामी सकाळ, लोकमत, लोकसत्ता, दैनिक सामना, टाईम्स ऑफ इंडीया व इंडीयन एक्सप्रेस मुंबई आवृत्तीमध्ये जाहिरात देण्यात आली होती. निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि. २१/१२/२००५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आली होती. त्यानुसार संस्थानचे मुंबई व शिरडी कार्यालयात मिळून एकूण६५ निविदा विक्रीसाठी ठेवण्यात आल्या होत्या. शिरडी कार्यालयातून २३ निविदा प्राप्त झालेल्या आहेत.तसेच एक निविदा उशिरा प्राप्त झालेली आहे. मुंबई कार्यालयात एकही निविदा प्राप्त झालेली नाही. प्राप्त झालेल्या निविदांची तपशिलवार माहिती खालीलप्रमाणे -

| अ.नं. | निविदाधारकाचे नाव | अ.नं. | निविदाधारकाचे नाव |
|---|---|---|---|
| १ | निलेश सुदामराव आहेर, कोपरगाव | १३ | उर्मिला अजित सुराणा, हडपसर-पुणे |
| २ | आशिष सुर्यकांत शिंगी, देवळाली - प्रवरा | १४ | कैलास जामदेव अहेर, नाशिक |
| ३ | अरुण पोपटलाल जानी, शिर्डी | १५ | अनिल साहेबराव कदम, नाशिक |
| ४ | रोहीणी तुकाराम देशमुख, शिर्डी | १६ | राहुल भाऊसाहेब कातोरे, निमगाव |
| ५ | राजु किसन दंडवते, सावेडी-अहमदनगर | १७ | समीर अशोक जोशी, नाशिक |
| ६ | अतुल किसनराव गिरमे, चिंचवड-पुणे | १८ | प्रमोद देविदास सोनवणे, नाशिक |
| ७ | प्रदीप भानुदास राऊत, भेंडा फॅक्टरी | १९ | भारत बाबासाहेब मते, निघोज-निमगाव |
| ८ | योगेश्वर सुदाम शेळके, शिर्डी | २० | विजय रामाचंद लोढा, शिर्डी |
| ९ | राहुल मुरलीधर बच्छाव, नाशिक | २१ | वैभव चंद्रकांत जाधव, जुनी सांगवी-पुणे |
| १० | शाम रावसाहेब कोते, शिर्डी | २२ | पुखराज माणकलाल रुणवाल, राहाता |
| ११ | रोहिणी प्रविण चतारे, बुऱ्हाणनगर | २३ | राजेंद्र खिवराज मुथ्था, चिंचवड गाव-पुणे |
| १२. | चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. लि. शिर्डी | २४. | टी.एस.डी.एक्सेल मार्केटर्स,नाशिक (दिनांक २७.०१.२००६ रोजी उशिरा प्राप्त झालेली) |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात आले असता निविदासादरकर्त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | निविदेत देऊ केलेले दर प्रति महिना |
|---|---|---|
| ०१. | निलेश सुदामराव आहेर, कोपरगाव | ९,०००.०० |
| ०२. | आशिष सुर्यकांत शिंगी, देवळाली - प्रवरा | ३०,.०००.०० |
| ०३. | अरुण पोपटलाल जानी, शिर्डी | १,३५,०००.०० |
| ०४. | रोहीणी तुकाराम देशमुख, शिर्डी | ३०,०००.०० |
| ०५. | राजु किसन दंडवते, सावेडी-अहमदनगर | १३,५००.०० |
| ०६. | अतुल किसनराव गिरमे, चिंचवड-पुणे | २,०१,१११.०० |
| ०७. | प्रदीप भानुदास राऊत, भेंडा फॅक्टरी | ११,०००.०० |
| ०८. | योगेश्वर सुदाम शेळके, शिर्डी | ४५,०००.०० |
| ०९. | राहुल मुरलीधर बच्छाव, नाशिक | २५,०००.०० |
| १०. | शाम रावसाहेब कोते, शिर्डी | २०,००१.०० |
| ११. | रोहिणी प्रविण चतारे, बुऱ्हाणनगर | ३०,८८७.०० |
| १२. | चेअरमन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसा. लि. शिर्डी | सर्व खर्च औषधे खरेदी पगार, इंधन,लाईटबील खर्च संस्थानने करुन येणाऱ्या निव्वळ नफ्याच्या १०% घसारा |
| १३. | उर्मिला अजित सुराणा, हडपसर-पुणे | १८,१०१.०० |
| १४. | कैलास जामदेव अहेर, नाशिक | ५०,०००.०० |
| १५. | अनिल साहेबराव कदम, नाशिक | २,५१,०००.०० |
| १६. | राहुल भाऊसाहेब कातोरे, निमगाव | २,११,०००.०० |
| १७ | समीर अशोक जोशी, नाशिक | १,५१,०००.०० |
| १८. | प्रमोद देविदास सोनवणे, नाशिक | ३,००,१११.०० |
| १९. | भारत बाबासाहेब मते, निघोज-निमगाव | ७५,०००.०० |
| २०. | विजय रामाचंद लोढा, शिर्डी | ५१,०००.०० |
| २१. | वैभव चंद्रकांत जाधव, जुनी सांगवी-पुणे | ३१,१११.०० |
| २२. | पुखराज माणकलाल रुणवाल, राहाता | ३५,०००.०० |
| २३. | राजेंद्र खिवराज मुथ्था, चिंचवड गाव-पुणे | २,००,००१.०० |
| २४. | टी.एस.डी.एक्सेल मार्केटर्स,नाशिक | १,२६,५००.०० |

उपरोक्त निविदांवर चर्चा होत असतांना, श्री साईबाबा रुग्णालयात दाखल होणाऱ्या रुग्णांना किती प्रमाणात संस्थानचे रुग्णालयातील औषध भांडारातून औषधे देण्यात येणार व किती आषधे ही बाहेरील औषधे दुकानातून (भाडे तत्वावर देण्यात येणाऱ्या) खरेदी करावी लागणार आहेत. याचा उल्लेख निविदेमध्ये करण्यात न आल्याने, आलेल्या निविदांच्या दरांमध्ये खूपच तफावत दिसून येत होती. त्यामुळे सभेने सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित बोलावून याकामी काही अटीमध्ये फेरबदल करुन फेर-निविदा मागविण्यात येतील असे सांगितले. याचवेळी उपस्थित निविदासादरकर्त्यांनी अन्न व औषध प्रशासन विभाग हे कमीत कमी ०५ वर्षांच्या कालावधीसाठी परवाना देत असल्यामुळे निविदाचा कालावधी ०५ वर्षांचा करण्यात यावा अशी त्यांची अडचण सभेपुढे सांगितली.

यावर चर्चा होऊन, निविदेचा कालावधी ०५ वर्षांचा करण्यात येऊन दरवर्षी मंजूर निविदाधारकास पुढील वर्षाचे भाडे ठरविण्यात यावे व पूर्वी निविदा सादर केलेल्या निविदाधारकांनाच सुधारित निविदा संस्थान खर्चाने पाठवून बंद पाकिटात दर देण्यास सांगण्यात यावे असे ठरले.

फेरनिविदा वर्तमानपत्रात जाहिरात देऊन मागविण्यात याव्यात. यामध्ये पुर्वी निविदा भरलेल्या निविदाधारकांना बयाणा रक्कमेची अट न ठेवता त्यांना संस्थान खर्चाने निविदा पाठवून फेर दर बंद पाकिटात देण्यास सांगण्यात यावे. (कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**विषय नं.२५.** **फिरते वैद्यकीय पथक सन-२००६ नियोजनाबाबत.**

**निर्णय क्र.२५.** सन २००५ मध्ये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे श्री साईनाथ रुग्णालयामार्फत परिसरातील को-हाळे, पिंपळस व देर्डे को-हाळे या गावात संस्थानचे फिरते पथक महिन्यातुन एक दिवस पाठविले जात होते. या पथकाबरोबर रुग्णालयाचे डॉक्टर्स, नर्सेस , वार्डबॉय/आया इत्यादी कर्मचारी पाठवून या गावातील रुग्णांची तपासणी करुन मोफत औषधोपचार करण्यात येत होते. पथकाला थांबण्यासाठी स्वच्छ जागा व पाण्याची व्यवस्था संबंधित गावावर सोपविण्यात आली होती. सुरवातीला काही व्हीजीट साठी या गावांनी ही व्यवस्था केली. परंतु नंतर पथकास थांबण्यासाठी जागा करुन देण्यास सदर गावे असमर्थ ठरली. तसेच पथकास जागा मिळणेसाठी गावातील सरपंच व ग्रामसेवक यांना शोधण्यात वेळ जात असे. त्यामुळे संस्थानचे पथक सदर गावात मिळेल त्या अस्वच्छ जागेत थांबत. तसेच पथकातील कर्मचा-यास त्या गावातील गावक-यांचे पाहीजे असे सहकार्य मिळत नाही. अशा काही अडचणीमुळे दोन वेळेस सदर गावातून पथक परत पाठविण्यात आले.

पथकाबरोबर रुग्णालयाचे जवळ जवळ ८ ते ९ कर्मचारी जात असतात. परंतु त्या मानाने रुग्ण संख्या होत नाही. फिरते वैद्यकीय पथक सन २००६ चे नियोजनाबाबत मा. समिती सदस्य डॉ. गोदकर व डॉ. तिवारी यांचे मत घ्यावे असे निर्देश देण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन दिनांक

१५/१२/२००५ रोजीचे टिपणी मा. वैद्यकीय समिती सदस्य यांचे अवलोकनार्थ ठेवली असता "फिरते वैद्यकीय पथकाचा फायदा पाहिजे तेवढा होत नसून त्या ऐवजी रुग्णालयात सर्व सुविधा उपलब्ध आहेत व या भागातील लोकांना रुग्णालयात येण्यासाठी सर्व त्या सोई उपलब्ध आहे तरी या सेवा बंद करण्यात याव्यात" असे निर्देश दिले असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली.

आजचे सभेत श्री गणेश सहकारी साखर कारखान्याचे संचालक, श्री बाबासाहेब डांगे व श्री बाबासाहेब कोते उपस्थित होते. त्यांनी श्री गणेश सहकारी साखर कारखान्याच्या आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने कारखान्याकडे काम करत असलेल्या कामगांराना औषधे संस्थानतर्फे देण्याबाबत विनंती केली.

याबाबत चर्चा होऊन, गणेश सहकारी साखर कारखान्याचे कामगांराना औषधोपचार करणेकरीता आठवड्यातून एक दिवस फिरते वैद्यकीय पथक पाठविण्यात यावे असे ठरले.

(कार्यवाही-वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.२६.** **संस्थान कर्मचाऱ्यांना जादा वैद्यकीय बीलांचा परतावा देणेबाबत.**

**निर्णय क्र.२६.** संस्थान कर्मचारी व त्यांचेवर अवलंबून असलेल्या त्यांचे अवलंबीतांना कर्मचारी वैद्यकीय देखभाल नियमावली सन १९९९ अन्वये जादा वैद्यकीय बीलाचा परतावा देण्यात येतो. त्याप्रमाणे ज्या कर्मचाऱ्यांची बीले एका वर्षात रुपये ५०००/- चे आत असतील त्यांचा परतावा मा.कार्यकारी अधिकारी यांचे अधिकारात मंजूर होतो व ज्या बीलांची रक्कम रुपये ५०००/- पेक्षा अधिक आहे त्यांचे बीलास मा.व्यवस्थापन समितीची मान्यता घ्यावी लागते. यापूर्वी व्यवस्थापन समितीचे दिनांक ११.०९.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१९ अन्वये येथून पुढे अशा प्रकारची कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बीले वैद्यकीय क्षेत्रातील तज्ज्ञ सदस्य मा.डॉ.एकनाथ भा.गोंदकर व मा.डॉ.पी.एल.तिवारी यांनी तपासून त्यांचे शिफारशीनुसार बीले अंतीम मंजूरीसाठी व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावीत, असें ठरलें आहे.

त्यानुसार खालीलप्रमाणे कर्मचाऱ्यांची बीले सदस्य मा.डॉ.एकनाथ भा. गोंदकर व सदस्य मा. डॉ.पी.एल. तिवारी यांना दाखवून घेतली आहेत. त्यानुसार खालील देयके आदा करण्याची शिफारस केली आहे, ज्यास मान्यता देण्यात आली.

| अ.नं. | कर्मचाऱ्याचे नांव | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|
| १ | श्री सतिष गंगाधर बकरे | ३४१५.०० | ३४१५.०० |
| २ | श्री रामदेव भैरुलाल शर्मा | ६१९५.०० | ६१९५.०० |
| ३ | डॉ.सौ.आशा श्रीराम पेंडसे | ८३१.०० | ८३१.०० |
| ४ | श्री श्रावण माधव चौधरी | १०१०.०० | १०१०.०० |
| ५ | श्री मधूकर भिवाजी डोखे | ५२७३.०० | ५२७३.०० |
| ६ | श्री अशोक उत्तमचंद तोरडवाल | १००००.०० | ६४६०.०० |
| ७ | श्री गुरुप्रसाद अरुण कापरे | १९८२.०० | १९८२.०० |
| ८ | श्री रघूनाथ भागाजी आहेर | ८६०७.०० | ६६४६.०० |
| ९ | कै.सुभाष बळवंत शिदोडकर | १३०३९.०० | १२८३९.०० |
| १० | श्री दत्तात्रय विश्वनाथ जोशी | ४०७९९.०० | ३६४९९.०० |
| ११. | श्री सुधांशु परशुराम लोकेगांवकर | १७१४२९.०० | १३७१४३.०० |

(कार्यवाही-वैद्यकीयअधिक्षिका,रुग्णालय)

**विषय नं.२७.** **श्रीसाईभक्तांचे दर्शन रांगेच्या शांतीनिवास व भक्तनिवास इमारतीतील प्रत्येकी दोन हॉल व भूयारी मार्गात वातानुकूलीन यंत्रणा बसविण्याच्या प्रोजेक्टसाठी कन्सल्टंन्सी फी बाबत.**

**निर्णय क्र.२७.** "श्री" चे दर्शनाला येणा-या श्री साईभक्तांचे दर्शनरांगेकरीता शांतीनिवास इमारतीत दोन हॉल, भक्तनिवास इमारतीत दोन हॉल, व भुयारी मार्ग बनविण्यात आलेला आहे. सुट्टीच्या दिवसात भक्तांची गर्दी वाढत असते. उन्हाळ्यात या दर्शन रांगेच्या हॉलमधून " सफोकेशन " जाणवते. भक्तांची गर्दी, त्यांचे श्वासोश्वास, बाहेरील तापमान यामुळे हॉलमधील तापमानात आणखी वाढ होते. व भक्तांना गुदमरणे, श्वासाला त्रास होणे, चक्कर येणे, उलटी होणे हे प्रकार होऊ लागतात. हे प्रकार टाळण्यासाठी या हॉलमधून थंड हवा खेळती राहणे गरजेचे आहे. याकरीता त्याठिकाणी वातानुलीत यंत्रणा बसविण्यासंबंधी गेल्या १५ वर्षापासून संस्थानला एअरकंडीशनिंग व वायुवीजन यंत्रणेमधील मार्गदर्शन विनामूल्य देणारे या शाखेतील तज्ञ श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.सपदा कन्सल्टंट, मुंबई यांचा अहवाल मागविण्यात आला होता, त्यानुसार हा संपूर्ण प्रोजेक्ट रु. ०१,४०,००,०००.०० ( रु. एक कोटी चाळीस लाख मात्र) इतक्या रकमेचा असल्याचे श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.संपदा कन्सल्टंट, मुंबई यांनी कळविले होते. या अहवालावर दिनांक ०५-११-२००५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विचारविनिमय करणेसाठी उपस्थित राहणेसाठी श्री.प्रशांत चितळे मुंबई यांना संस्थान पत्र क्र. एसएसएस/ विद्युत/ १२६४४ /२००५ दिनांक ०२-११-२००५ अन्वये कळविण्यात आले होते. व श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.संपदा कन्सल्टंट, मुंबई यांनी या सभेत उपस्थित राहून त्यांनी एअरकुल्ड चिलर्स सह चिल्ड वॉटर सर्क्युलेशन टाईप एअरकंडिशनर सिस्टिमबाबत सभेत माहिती दिली तसेच

मा.व्यवस्थापन समितीचे सभेने त्यांना विचारलेल्या प्रश्नांची समर्पक व समाधानकारक उत्तरे दिली. यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.व्यवस्थापन समितीचे सभेने श्री.प्रशांत चितळे यांना याकामी टेंडर तयार करण्यास व कंपन्यांची शॉर्ट लिस्टिंग तसेच वर्तमानपत्रातील द्यावयाच्या जाहीरातीचा नमूना तयार करण्याविषयी सांगितलेले आहे.

यानंतर श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.संपदा कन्सल्टंट, मुंबई यांनी दिनांक ०७-१२-२००५ रोजी पत्र पाठवून, या कामापोटी कन्सल्टेशन फी मिळावी तसेच अशा प्रकारच्या कामासाठी ३ टक्के कन्सल्टेशन फी घेतली जाते, परंतू संस्थानकरीता २ टक्के फीमध्ये काम करण्यास तयार असल्याचे, लेखी कळविले होते.

श्री.प्रशांत चितळे, मुंबई यांनी गेल्या १५ वर्षापासून श्री साईबाबा संस्थानकरीता विनामोबदला मार्गदर्शन सेवा दिलेली आहे. आता त्यांनी वरील संदर्भीय पत्रान्वये इतक्या वर्षात प्रथमतःच कन्सल्टेशन फीची मागणी केलेली आहे. म्हणून याबाबत त्यांना पुर्नविचार करण्याची तसेच शक्य असल्यास पुर्वीप्रमाणे श्री साईबाबा संस्थानकरीता विनामोबदला मार्गदर्शन देण्याची व याबाबतीत अभिप्राय लवकरात लवकर कळविण्याची लेखी विनंती संस्थानतर्फे संस्थान पत्र क्र.एसएसएस/ विद्युत/ १४३८४/२००५ दिनांक १२-१२-२००५ अन्वये करण्यात आली होती.

आता श्री.प्रशांत चितळे , मुंबई यांनी पत्र क्र.एससी /२५९ /२००५ दिनांक १६-१२-२००५ पाठवून, चिल्ड वॉटर सर्कुलेशन एअरकंडीशनिंग सिस्टिमसाठी टेक्नीकल इनपुट मोठ्या प्रमाणावर लागणार असल्याचे व यामध्ये रिझल्ट ओरिएन्टेशनला महत्त्व असल्याने ,संस्थानच्या पत्राचा विचार करून व विनंतीला मान देऊन संस्थानकरीता २ टक्के ऐवजी १ % फीमध्ये काम करण्यास तयार असल्याचे, लेखी कळविले आहे. एकूणप्रोजेक्ट अंदाजे १,४०,०००,००.०० ( रु. एक कोटी चाळीस लाख ) इतक्या अंदाजे रकमेचा असून या प्रोजेक्टच्या श्री.प्रशांत चितळे द्वारा मे.संपदा कन्सल्टंट, मुंबई यांनी मागणी केलेली कन्सल्टंसी फी १% इतकी रक्कम रुपये १,४०,०००.०० ( रु. एक लाख चाळीस हजार) इतकी होत असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.२८.** **श्रीसाईलीला मासिकाचे शिर्डी कार्यालयाचे डी.टी.पी.विभागाचे संगणक कक्षात आणि संपादक केबिन विभागात बसविणेसाठी एअर कंडिशनर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.२८.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे संस्थान प्रकाशित `` श्री साईलिला `` या द्वैमासिकाचे कार्यालय व मासिकाचे कामकाजाशी संलग्न इतर ऊपविभाग मुंबई येथून स्थलांतरीत करून शिरडी येथे साईउद्यान इमारतीमध्ये सुरु करावयाचे असल्याने श्री. विद्याधर ताठे, कार्यकारी संपादक, श्री साईलिला मासिक यांनी शिरडी येथे स्थलांतरीत होत असलेल्या ``श्री साईलिला`` कार्यालयातील वर्गणी, वितरक, संगणक आणि संपादक या चार विभागापैकी डी.टी.पी. विभागाचा संगणक कक्ष आणि संपादक केबिन या दोन ठिकाणी एअर कंडीशनर बसवून मिळणेकामी उपरोक्त दि.२१-११-२००५ रोजीचे पत्रान्वये मागणी केली आहे.

डी.टी.पी. विभागाचा संगणक कक्ष आणि संपादक केबिन या दोन ठिकाणी एअर कंडीशनर बसविणेसाठी स्प्लिट टाईप एअर कंडीशनर १.५ टनाचे ०२ नग एअर कंडीशनर कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रुपये ५०,०००/- खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | तपशील | मागणी | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१) | व्होल्टास / ब्लू स्टार मेक स्प्लिट टाईप वॉल माऊंटेड एअरकंडीशनर | | |
| | (अ)डी.टी.पी. विभागाचा संगणक कक्ष ( १.५ टन प्रत्येकी क्षमता ) | ०१ नग | २५,०००.०० |
| | (ब) संपादक केबिन ( १.५ टन प्रत्येकी क्षमता ) | ०१ नग | २५,०००.०० |
| | | एकूणरक्कम रुपये | ५०,०००.०० |

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.२९.** **संस्थानचे कनकुरी शिवारातील साठवण तलावावरील वॉटरपंप व मशिनरीकरीता ॲडीशनल स्वतंत्र ट्रॉन्सफॉर्मर बसविणे व स्वतंत्र ११ के.व्ही लाईन महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीकडून टाकून घेणेबाबत.**

**निर्णय क्र.२९.** "श्री "च्या दर्शनासाठी शिरडीत येणाऱ्या सर्व श्रीसाईभक्तांना सर्व सुखसोयी पुरविण्याचा संस्थानचा प्रयत्न असतो. त्यातील एक भाग म्हणून श्रीसाईभक्तांना पिण्यासाठी व स्नानासाठी पाणीपुरवठा करणेकामी शिरडीपासून जवळ असलेल्या कनकुरी गावाच्या शिवारात नळपाणीपुरवठा योजनेसाठी साठवण तलाव तयार करण्यात आलेले आहेत.या साठवण तलावांचा वापर सन १९९१-९२ च्या काळात सुरु झाला , त्यावेळेस श्रीचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची संख्या तसेच त्यांचेसाठी असलेली निवासस्थाने व सुविधा कमी असल्याने विद्युत भार कमी होता. आताच्या काळात श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची संख्या दररोज वाढतच आहे त्यामुळे निवासस्थानात वाढ होत आहे व पर्यायाने

भक्तांना पुरविण्यात येणाऱ्या सुविधामध्ये वाढ होत आहे, आणि यामुळे पाण्याचा वापर वाढलेला असून त्यामुळे वीजवापर वाढलेला आहे.

सध्या महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीमार्फत या साठवण तलावाच्या परीसरातील शेतक-यांना वीजपुरवठा करण्यासाठी जो ट्रान्सफॉर्मर आहे , त्यामधूनच या साठवण तलावाकरीता महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचा वीजेचा सप्लाय देण्यात आलेला आहे. गेल्या काही वर्षापासून या परीसरातील शेतक-यांचा विजेचा वापर वाढला आहे. तसेच या ट्रान्सफॉर्मरवर साठवण तलावाकरीता असलेल्या पंपाचा तसेच मशिनरींचाही सध्या लोड असल्याने या ट्रान्सफॉर्मर मध्ये वारंवार बिघाड होऊन वीज पुरवठा खंडीत होतो. त्यामुळे साठवण तलावावरील पंपसेट चालण्यात व्यत्यय येऊन भक्तांना कमी प्रमाणात पाणीपुरवठा होण्यामध्ये तसेच त्यामुळे भक्तांची गैरसोय होण्याचे प्रमाण वाढत आहे. तसेच ट्रान्सफॉर्मरवर लोड वाढल्याने व्होल्टेज कमी मिळते व परिणामी पंपसेट्च्या मोटारी जळतात. म्हणून या साठवण तलावावर संस्थान पाणीपुरवठा योजनेकरीता स्वतंत्र व वेगळा ट्रान्सफॉर्मर बसवून वीजपुरवठा होणे गरजेचे आहे. त्यामुळे साठवण तलावावरील पंपसेटला व मशिनरींना व्होल्टेज व्यवस्थीत मिळून मोटार जळण्याचे / बिघडण्याचे प्रकार कमी होतील आणि वीज पुरवठा तसेच त्यामुळे पाणीपुरवठाही सुरळीत होईल.

हा साठवण तलाव ग्रामीण भागात असल्याने या ठिकाणी दररोज १२ तास भारनियमन असते. या भारनियमनामुळे पाणीपुरवठा सुरळीत चालू ठेवण्यात अडचणी येतात. शिरडीत महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीचे नवीन सबस्टेशन तयार होत आहे. या नियोजित महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या सबस्टेशन पासून २ किलोमीटर अंतरं असलेल्या संस्थानच्या कनकुरी साठवण तलावापर्यंत स्वतंत्र ११ के. व्ही. लाईन टाकल्यास सध्याच्या ग्रामीण भागाकरीता सध्या जे अतिरिक्त भारनियमन असते त्यामधुन वगळून शिरडीतील महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीच्या वीजपुरवठ्यावर साठवण तलावाचा समावेश करता येईल. जेणेकरुन साठवण तलावावरील पंपसेट्ला व मशिनरीला कायम शाश्वत वीज पुरवठा होऊन पाणी पुरवठा सुरळीत चालेल व श्री साईभक्तांना पाणीपुरवठाही आवश्यक त्या प्रमाणात होऊ शकेल. यासाठी उपरोक्त साठवण तलावावर महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडून (०१) नवीन स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर बसवून मिळणेबाबत तसेच (०२) शिर्डीतील नियोजित नवीन सबस्टेशन पासून ते सस्थानचे कनकुरी साठवण तलावापर्यंत स्वतंत्र ११ के.व्ही.लाईन त्वरीत टाकून मिळणेबाबत त्वरीत पुढील कार्यवाही होणेसाठी महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडे वेळोवेळी विनंती करण्यात आली होती.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिरडीच्या मा.सल्लागार समितीच्या दिनांक ०१-१०-२००५ रोजीच्या सभेत या विषयावर चर्चा होऊन मा.जिल्हाधिकारीसाहेब यांनी या बाबत त्वरीत पुढील कार्यवाही करण्याचे आदेश या बैठकीत उपस्थित असलेल्या महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या प्रतिनिधीला दिलेले होते. तसे महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी कडे लेखी कळविण्यात आले होते.
संस्थानमार्फत याकामाकरीता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी यांनी त्यांचे पत्र क्र.एसई/एएनआरसी/टेक/इएसटी/ओआरसी/एलटी/००००४०दि.०३-०१-२००६ अन्वये एकूण रुपये ०५,८०,५९०.०० इतका खर्च येईल म्हणून कळविले आहे. यामध्ये काम रु.०४,५८,९५८.४० इतक्या रकमेचे असून लेबर चार्जेस रु.४५,८९५.८४ व महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी सुपरव्हिजन चार्जेस रु.७५,७२८.१४ असा एकत्रित खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३०.** **श्री साईबाबा रुग्णालयाच्या नवीन ॲटोक्लेव्ह मशिनसाठी लागणारी केबल, मेनस्विच वगैरे साहित्य खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.३०.** नवीन सुपर स्पेशालिटी श्री साईबाबा हॉस्पीटल येथे विविध ऑपरेशन थिएटरसाठी नवीन ऑटोक्लेव्ह मशिन - ०८ नग आलेल्या असून त्यामधील ०६ मशिन प्रत्येकी १८ किलो वॅटच्या असून राहिलेल्या ०२ मशिन प्रत्येकी १० किलोवॅटच्या आहेत. या मशिनला वीजकनेक्शन जोडून मिळावे म्हणून वरीष्ठ प्रशासक, श्री साईबाबा हॉस्पीटल, शिर्डी. यांनी पत्र क्र. ७६४९/२००६ दि.०२-०१-२००६ अन्वये कळविले आहे. या एकूण ०८ नग मशिनचा एकूण लोड १२८ किलोवॅट (१७० एच.पी.) इतका आहे. त्यासाठी जनरेटररुममधील पॅनेलपासून स्वतंत्र केबल टाकाव्या लागणार आहेत. शिवाय प्रत्येक लिफ्टकरीता दोन ठिकाणी स्वतंत्र अर्थिंग कराव्या लागणार आहेत. एकूण तीन लिफ्ट असून एकूण सहा ठिकाणी अर्थिंग कराव्या लागणार आहेत. त्यासाठी खालीलप्रमाणे मटेरीअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ३,८८,७२६.०० चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| अ.क्र. | तपशील | मागणी | दर ( अंदाजे ) रुपये | रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|
| ०१) | पॉलीकॅब / फिनोलेक्स / ॲंकर मेक आय. एस. आय. ॲप्रुव्हड ॲल्युमिनिअम आरमड पीव्हीसी केबल, साईज - ३.५ x १५० | १०० मीटर | ४५०/- (प्रति मीटर ) | ४५,०००.०० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | स्क्वे.एम.एम. | | | |
| ०२) | पॉलीकॅब / फिनोलेक्स / अँकर मेक आय. एस आय. अॅप्रुव्हड अॅल्युमिनिअम आरमड पीव्हीसी केबल, साईज - ३.५ x ०५० स्क्वे.एम.एम. | १५०० मीटर | रु. १६०/- (प्रति मीटर ) | २,४०,०००.०० |
| ०३) | पॉलीकॅब / फिनोलेक्स / अँकर मेक आय. एस आय. अॅप्रुव्हड अॅल्युमिनिअम आरमड पीव्हीसी केबल, साईज - ३.५ x ०२५ स्क्वे.एम.एम. | ८० मीटर | रु. ११३/- (प्रति मीटर ) | ९,०४०.०० |
| ०४) | एल.अँड.टी.मेक,एच.आर.सी.टीपीएन स्विच फ्युज युनिट इन शीट मेटल बॉक्स विथ फ्युजेस अँड केबल एन्ड बॉक्सेस,क्षमता २५० अॅम्पीअर, | ०४ नग | ७०००/- (प्रति नग ) | २८,०००.०० |
| ०५) | अर्थिंग कंप्लीट सेट विथ प्लेट अर्थिंग, जी.आय. नरसाळे, पाईप २ मीटर ,चेंबर कव्हर १` X १` | ०६ नग | २०००/- (प्रति नग ) | १२,०००.०० |
| ०६) | कॉपर पट्टी , साईज - २५ x ०५ एमएम | २०० मीटर | २५०/-(प्रति मीटर) | ५०,०००.०० |
| ०७) | एच.एम.आय.मेक फ्लँज टाईप केबल ग्लँड,<br>०१) ०नंबर (५० स्क्वे.एम.एम..केबलसाठी)<br>०२)००१नंबर (१५० स्क्वे.एम.एम केबलसाठी)<br>०३) ११ नंबर (२५ स्क्वे.एम.एम.केबलसाठी) | <br>१० नग<br>०३ नग<br>०६नग | <br>३५/- (प्रति नग )<br>६०/- (प्रति नग )<br>२६/- (प्रति नग ) | <br>३५०.००<br>१८०.००<br>१५६.०० |
| | | | **एकूणरक्कम** | **३,८८,७२६.००** |

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३१.** **श्री साईबाबा रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर व आय.सी.सी.यु करीता यु.पी.एस खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडणेबाबत.**

**निर्णय क्र.३१.** उपरोक्त संदर्भीय विषयान्वये नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर्स आणि आय.सी.सी.यु.साठी यु.पी.एस.खरेदीसाठी ३,७५,०००.०० इतक्या खर्चास मान्यता मिळणेसाठी दिनांक १८-१२-२००५ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेपुढे प्रस्ताव मांडण्यात आला होता. दिनांक १८-१२-२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेत या प्रस्तावावर चर्चा होऊन नवीन सुपर स्पेशालिटी रुग्णालयाच्या ऑपरेशन थिएटर्स आणि आय.सी.सी.यु.साठी यु.पी.एस.खरेदीसाठी कोटेशन मागवावेत असा निर्णय झाला आहे. त्यानुसार जा.क्र.एसएसएस /विद्युत /४९ /२००६ दि.०२-०१-२००६ नुसार यु.पी.एस. खरेदीसाठी कोटेशन मागविण्यात आले होते व खालीलप्रमाणे कोटेशन्स प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१) | मे.ओम्नी सेल्स, बार्डोली,सुरत |
| ०२) | मे.युनिक पॉवर इंडस्ट्रीज,मुंबई |
| ०३) | मे.विवितार इलेक्ट्रॉनिक्स,मुंबई |
| ०४) | मे.जाधव स्विचगिअर सर्व्हीसेस,नासिक |
| ०५) | मे. इलेक्ट्रोमोटीव्हस,नाशिक |
| ०६) | मे. ओपल इलेक्ट्रॉनिक्स,पुणे. |
| ०७) | मे. कोमल एन्टरप्राईझेस,नाशिक |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत उघडण्यात येऊन निम्नतम दराच्या तीन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीनंतरचे दर |
|---|---|---|---|
| ०१) | मे.ओम्नी सेल्स, बार्डोली,सुरत | ०७,०९,५००.०० | --- |
| ०२) | मे.विवितार इलेक्ट्रॉनिक्स,मुंबई | ०९,०४,८००.०० | --- |
| ०३) | मे.जाधव स्विचगिअर सर्व्हीसेस,नासिक | ०५,३७,६८०.०० | ५,१०,८००.०० |
| ०४) | मे. इलेक्ट्रोमोटीव्हस,नाशिक | १०,०९,३२०.०० | --- |
| ०५) | मे. ओपल इलेक्ट्रॉनिक्स,पुणे. | ०७,४८,८००.०० | --- |
| ०६) | मे. कोमल एन्टरप्राईझेस,नाशिक | ०७,०७,६००.०० | ६,७२,२२०.०० |
| ०७) | मे.युनिक पॉवर इंडस्ट्रीज,मुंबई | ०४,४२,०००.०० | ४,१९,९००.०० |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे.युनिक पॉवर इंडस्ट्रीज, मुंबई यांची निम्नतम दराची निविदा व वाटाघाटीत त्यांनी नमूद केलेले कमी दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा, असे ठरले.

(कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३२.** **मंदिर परिसरात स्टेनलेस स्टील रेलींग बसविणेसाठी प्राप्त झालेले कोटेशन्स उघडून निविदाधारकांशी चर्चा/वाटाघाटी करुन निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.३२.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १८-०९-२००५ रोजी शिर्डी येथे झालेल्या सभेतील निर्णय क्र.५३६ अन्वये मंदिर परिसरात विविध ठिकाणी स्टेनलेस स्टील रेलींग व स्लाईडींग गेट बसविणेसाठी रक्कम

रू. ०५,३५,०००.०० इतक्या खर्चास मान्यता मिळून या कामासाठी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन निविदा मागविणेचा निर्णय झालेला आहे. त्यानुसार वर्तमानपत्रात जाहिरात देण्यात आली होती. त्यानुसार दोन निविदा प्राप्त झाल्या होत्या.

दिनांक १८-१२-२००५ रोजी झालेल्या मा.व्य.समितीच्या सभेसमोर दोन्ही टेंडर्स उघडणेत आली. व वर्तमानपत्रात जाहिरात दिल्यानंतर फक्त ०२ च टेंडर प्राप्त आल्याने व यामधील एक टेंडर ओव्हरकॉस्टींग असल्याने व नियमानुसार कमीत कमी तीन निविदा पाहिजे असल्याने संबंधित कामे करणाऱ्या पार्टीजना पत्र पाठवून त्यांचेकडून पुन्हा निविदा बोलाविंण्यात याव्यात असे ठरले आहे. त्यानुसार विविध पार्टीजना पत्र व कोटेशन फॉर्म पाठवून कोटेशन मागविण्यात आले होते. त्यानुसार मुदतीत खालीलप्रमाणे कोटेशन्स व पत्र प्राप्त झाले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव |
|---|---|
| ०१. | मे. भन्साळी मोटार्स , राहाता (सोबत ०१ ई.एम.डी. पाकीट ) |
| ०२. | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक |
| ०३. | मे.स्टीलवेल्ड, मुंबई |

याशिवाय मे. शार्प इंजिनिअर्स, पुणे ( ज्यांनी यापुर्वी टेंडर सादर केले होते ), यांनी आता दूरध्वनीवरून असे कळविले आहे की, त्यांनी पुर्वी सादर केलेले व मा.व्य.समितीच्या सभेसमोर दिनांक १८-१२-२००५ रोजी उघडण्यात आलेले टेंडरच पुन्हा विचारात घ्यावे.

उपरोक्तप्रमाणे मंदिर परिसरात स्टेनलेस स्टील रेलींगसाठी प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता निविदासादरकर्त्यानी पुढीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | पार्टीचे नांव | निविदेतील दर | चर्चा/वाटाघाटीनंतर देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | मे. भन्साळी मोटार्स , राहाता | ०७,०१,०००.०० | अनुपस्थित |
| ०२. | मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक | ०५,७८,७३५.०० | ५,६०,०००.०० |
| ०३. | मे. शार्प इंजिनिअर्स, पुणे | ४२,०४,१५९.०० | अनुपस्थित |

यावर सविस्तर चर्चा होऊन, मे. आकार मशिन्स प्रा.लि., नाशिक यांची निम्नतम दराची निविदा व वाटाघाटीत त्यांनी नमूद केलेले कमी दर मान्य करण्यात येऊन त्यांना कार्यादेश देण्यात यावा असे ठरले. (कार्यवाही-विद्युत विभागप्रमुख)

**विषय नं.३३.** **नवीन स्टाफ क्वॉर्टरला पाणीपुरवठा करणेबाबत.**

**निर्णय क्र.३३.** निमगांव-को-हाळे शिवारामध्ये संस्थानने खरेदी केलेल्या सर्वे नंबर १६९ मध्ये सध्या स्टाफ क्वार्टरचे बांधकाम चालू असून त्याठिकाणी एकुण ९५ सदनिकांचे बांधकाम होणार आहे. व त्याठिकाणी संस्थान कर्मचा-यांना निवासासाठी देण्यात येणार आहे. परंतू तेथे पिण्याचे पाण्याची व्यवस्था नसल्याने पाईप लाईन द्वारे पाणी न्यावे लागणार आहे व पाईप लाईनही आपले ओव्हर हेड टँक पासून टाकावी लागणार असून, ते अंतर मोजले असता ते ५००० फूट भरले आहे. संपूर्ण पाईप लाईनसाठी खालील प्रमाणे मटेरीयल लागणार असून त्यासाठी अंदाजे रुपये ११,९४,१४१ खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशिल | साईज | टाईप | कंपनी | मागणी | अंदाजे दर प्रती फुट/किलो | एकूणरक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | जी.आय.पाईप -सी क्लास | ३" | | स्वास्तिक | ५००० फुट | १३६/-प्रती फुट | ६,८०,००० |
| ०२ | जी.आय.बेन्ड -सी क्लास | ३" | | झेनिथ | ५० नग | २०६/- प्रती नग | १०,३०० |
| ०३ | जी.आय.एलबो सी क्लास | ३" | | प्रकाश-सुर्या | १० नग | १३९/- प्रती नग | १,३९० |
| ०४ | जी.आय.टी -सी क्लास | ३" | | | ०५ नग | १६१/- प्रती नग | ८०५ |
| ०५ | जी.आय.सॉकेट सी.क्लास | ३" | | | १५० नग | १५०/- प्रती नग | २२,५०० |
| ०६ | एम.एस.फ्लँज | ३"x१०mmजाड | हेवी | | १५० नग | ८०/- प्रती नग | १२,००० |
| ०७ | एम.एस.नटबोल्ट | २"x १० आणे | | | १५ किलो | ५०/-प्रतीकिलो | ७५० |
| ०८ | नॉन रिटर्न व्हॉल्व | ३" | फ्लँज टाईप | लिडर कं. | ०२ नग | ३४७०/-प्रतीनग | ६,९४० |
| ०९ | एअर व्हॉल्व | ३" | I.S.I मार्क | | ०५ नग | १८००/-प्रतीनग | ९,००० |
| १० | गॅसकेट | | | | १० किलो | २५०/-प्रतीकिलो | २,५०० |
| ११ | रबर जॉईंट | ३" | | | १५०नग | १०/- प्रती नग | १,५०० |
| १२ | वॉटर फ्लो मिटर | ३" | | के.सी.कंपनी | ०१ नग | ७,००० प्रती नग | ७००० |
| १३ | वॉटर फ्लो मिटर | २" | | के.सी.कंपनी | ०१ नग | ३,५०० प्रती नग | ३५०० |
| | | | | | | एकूण- | **७,५८,१८५** |
| | | | | | | व्हॅट- १२.५% | **९४,७७३** |
| | | | | | | एकूण- | **८,५२,९५८** |
| | प्लंबिग मजुरी खोदाई सह (३फुट खोल x १फुट रुंद x ५००० फुट लांब) खरेदी रकमेच्या ४०% | | | | | | **३,४१,१८३** |
| | | | | | | एकूणरक्कम - | **११,९४,१४१** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, स्टाफ क्वार्टससाठी पाणीपुरवठा करणेस पाईपलाईन व त्याअनुषंगिक मटेरिअल कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ११,९४,१४१/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३४. बक्षिस मिळालेल्या जागेवर "बोअर" घेणेस मंजूरी मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.३४.** मौजे पांगरी ता. सिन्नर येथील श्री. शिवाजी पांडूरंग पांगारकर यांनी त्यांचे आईचे नांवे श्रीमती बबाबाई पांडूरंग पांगारकर यांनी शिर्डी-नाशिक रोडवर पांगरी गावाचे शिवारात एकूण २० गुंठे जमीन बक्षीस म्हणून दिलेली आहे. त्याचा बक्षिस पत्र स्विकारणेचा व बक्षीस पत्र तयार करुन देणे-घेणेचा कार्यक्रम दि.१६/०८/२००५ रोजी सिन्नर रजिस्टर कचेरीत झालेला आहे. सदर जमिनीचा ताबा घेतला असून जागेचा फ्रन्ट ८० फूट असून लांबी २७२ फूट आहे. दि.१८/०८/२००५ रोजी जमीन देणगी बक्षीस पत्राने दिले बाबत बोर्ड लावणेत आलेला आहे. तसेच सदर जमीनीचे संस्थानचे नांवे नोंद करणेसाठी गांव कामगार तलाठी -पांगरी कार्यालयाकडे वशी-२ कडून कार्यवाही चालू आहे.

सदर जागेचा उपयोग मा. व्यवस्थापन समितीच्या मान्यतेनूसार मुंबई येथून येणा-या पदयात्रींची मुक्कामाची व विश्रांतीची सोय होणेसाठी करावयाचा आहे. त्याकरीता तेथे पुढे शेड व संडास-बाथरुमची व्यवस्था करावयाची आहे. त्याकरीता त्या जागेमध्ये पाणी उपलब्ध होणेसाठी बोअरवेल घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे एकूण रुपये ८५,०००/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशिल | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| ०१ | बोअरवेल घेणे ३०० फूट | १५,०००/- |
| ०२ | इलेक्ट्रीक कनेक्शनसाठी एकूण ०४ पोल आवश्यक आहेत. एका पोलसाठी रुपये १०,०००/- खर्च ( डिपॉझीट एम.एस.ई.बी ) | ४०,०००/- |
| ०३ | इलेक्ट्रीक मोटार व पाईप | १५,०००/- |
| ०४ | थ्री फेज कनेक्शन डिपॉझीट रक्कम | १५,०००/- |
| | अंदाजे एकूण खर्च रुपये | **८५,०००/-** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला मौजे पांगरी ता.सिन्नर येथे बक्षीस मिळालेल्या जमिनीवर पिण्याचे पाण्यासाठी बोअर घेण्यापूर्वी शासनाचे भूजल संर्वेक्षण खात्याकडून अथवा तज्ज्ञ व्यक्तीकडून सर्वेक्षण करुन घेण्यात येऊन जागा निश्चित करावी. सदरहू बोअर घेण्यास व त्याअनुषंगिक इलेक्ट्रीक मोटार, इलेक्ट्रीक कनेक्शन इत्यादीसाठी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८५,०००.०० चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/पाणीपुरवठा विभागप्रमुख)

**विषय नं.३५. संस्थानद्वारा प्रकाशित मराठी पुस्तकांचा गुजराथी अनुवाद तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.३५.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित खालील प्रमाणे पुस्तके मराठी भाषेत छपाई करुन प्रकाशित करण्यात येऊन ती प्रकाशने पुस्तक काऊंटरवर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत.

| अ.नं. | पुस्तकाचे व लेखकाचे नाव |
|---|---|
| ०१ | दैनंदिन साईबोध, लेखक-डॉ.कै.सी.ग.देसाई |
| ०२ | श्री साईंचे सत्य चरित्र (गद्यभाष्य) लेखक- स्व.कर्नल.मु.ब.निंबाळकर |
| ०३ | श्री साई दैनंदिनी (रोजनिशी) (शिर्डी संस्थान) सालाबाद प्रमाणे नवीन वर्षाची |
| ०४ | श्री साईबाबा अवतार व कार्य लेखक - अच्युत यशवंत घोड, श्री साईबाबा संस्थान, शिरडी. |
| ०५ | शीलधी ( क्षेत्रवर्णन) डॉ.केशव भगवंत गव्हाणकर,१९५४-श्री साईबाबा संस्थान,शिरडी. |
| ०६ | श्री साईबाबांची शिकवण व तत्वज्ञान लेखक- स्व. कर्नल.मु.ब. निंबाळकर श्री साईबाबा संस्थान,शिरडी. |

वरील पुस्तकांचा गुजराथी अनुवाद व श्री साई दैनंदिनी (रोजनिशी) (शिर्डी संस्थान) छपाई करून भक्तांना उपलब्ध करून देणेबाबत श्री.जयसिंह निंबाळकर, बडोदे यांनी त्यांचेकडील दि.०६.११.२००५ रोजीचे पत्रान्वये सदरची पुस्तके संस्थानची छापण्याची इच्छा नसेल तर आमचे बडौदे येथील "ओम श्रीसाईभक्त परिवार ट्रस्ट वडोदरा" या नावाचे ट्रस्टला छपाईबाबत संस्थानची परवानगी मिळणेबाबत विनंती पत्र दिले आहे.

वरील यातील अ.नं. ३ श्री साई दैनंदिनी (रोजनिशी) ही मराठी/इंग्रजी भाषेत प्रसिद्ध होते. तिचा स्थर हा आंतरराष्ट्रीय आहे. त्यामुळे भारतातील प्रत्येक राज्यात ती चालू शकते. दैनंदिनीचे स्वतंत्र गुजराथी भाषेत तीचे प्रकाशन करणे इष्ट होणार नाही. प्रकाशने विभागाकडील दि.२२.११.२००५ रोजीचे मंजूर प्रस्तावानुसार वरील अ.नं. ३ व्यतिरिक्त उर्वरीत ५ पुस्तकांचे संस्थानमार्फत प्रकाशित करून गुजराथी साईभक्तांना उपलब्ध करून द्यावे असे वाटते. त्यासाठी ५ पुस्तकांचे गुजराथी भाषेत संस्थानद्वारे प्रकाशित करणेस मा.व्यवस्थापन समितीची मान्यता मिळणेस व त्याकामीचे गुजराथी भाषेत डिटीपी तयार करून घेणेस व त्याकामी येणारे योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३६. संस्थान प्रकाशित दिनदर्शिका (सिंगल शिटर)-२००६ चे जादा छपाईबाबत.**

**निर्णय क्र.३६.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी प्रकाशित श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ (सिक्स शिटर) ७५,००० नग छपाई किंमत रु.८.५० पैसे व सिंगल शिटर २०,००० नग छपाई दर रुपये ३.०० याप्रमाणे जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/११९५२/२००५ दि.१९.१२.२००५ अन्वये मे. मॅग्रा ग्राफिंक्स (इंडिया) लि., मुंबई यांना छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

श्री साईबाबा दिनदर्शिका सिंगल शिटर २०,००० नग छपाई होऊन आदेशानुसार पुर्णपणे पुरवठा झालेला आहे. उपरोक्त दिनदर्शिकेचे खालील बाजूस ६ पाने तारखेचे पॅडसह छपाई केल्याने सदर दिनदर्शिकेची विक्रीस भक्तांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाल्याने सदर दिनदर्शिकेचा उपलब्ध साठा संपलेला आहे. तथापि श्री साईबाबा दिनदर्शिका २००६ (सिंगल शिटर) यास भक्तांची मागणी मोठ्या प्रमाणात असल्याने तसेच पुढील नववर्षानिमित्त सदर दिनदर्शिकेस भक्तांची वाढती मागणी लक्षात घेता वरील संदर्भिय छपाई आदेशातील अट नं.१४ नुसार संस्थानला जादा नगांची आवश्यकता भासल्याने त्याच अटी व शर्तीने ५०,००० दिनदर्शिका सिंगल शिटर २००६ चे मागील छपाई प्रमाणे खालील बाजूस तारखेचे ६ पॅडसह छपाई करुन घेणे गरजेचे आहे.

मे.मॅग्रा ग्राफिंक्स (इंडिया) लि., मुंबई यांनी त्यांचेकडील दि.३०.१२.२००५ चे फॅक्स पत्राअन्वये ५०,००० दिनदर्शिकेची छपाई करणेसाठी दिनदर्शिका सिंगल शिटर २००६ साठी रुपये ३/- अधिक दिनदर्शिकेचे खालील बाजूचे ६ पाने तारखेचे पॅड दोन रंगात छपाई करणेसाठी रुपये - २/- याप्रमाणे एकूण रुपये ५/- प्रती नग याप्रमाणे छपाई करुन देण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे.मॅग्रा ग्राफिंक्स (इंडिया) लि., मुंबई यांचेकडून ५०,००० नग दिनदर्शिका सिंगल शिटर २००६ चे खालील बाजूस ६पाने तारखेचे पॅडसह छपाई प्रती नगास रुपये ५/- प्रमाणे करुन घेणेस व त्याकामी येणा-या एकूण रुपये २,५०,०००/-चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३७. संस्थान प्रकाशित दिनदर्शिका (८ पेजेस मोठी साईज)-२००६ बाबत.**

**निर्णय क्र.३७.** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०८.२००५ रोजीचे आयत्या वेळेचा विषय नं.०७ निर्णय क्रमांक ४५६ नुसार मे.मेग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांना जा.नं.एसएसएस/वशी/प्रकाशने/१०५८६/२००५ दि.२४.०९.२००५ अन्वये श्री साईबाबा दिनदर्शिका ८ पेजेस ( मोठया आकाराचे) २०,००० नगांची छपाई मंजूर दर प्रती नगास रूपये १५०/- प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

मे.मेग्ना ग्राफिक्स (इंडिया) लि., मुंबई यांचेकडून बिल नं.९५/२१.१२.२००५ अन्वये ९,६२५ नग + बिल नं.१०३/२९.१२.२००५ अन्वये ५०० नग + बिल नं.१०८/०५.०१.२००६ अन्वये ८२५० नग असे एकूण १८,३७५ नगांचा पुरवठा आज अखेर झालेला आहे.

दि.२७.१२.२००५ पासून ते दि.१३.०१.२००६ पर्यंत खालील तपशिलाप्रमाणे विक्री झालेली आहे.

| दिनांक | प्रती दिवस विक्री | दिनांक | प्रती दिवस विक्री |
|---|---|---|---|
| | | मागिल बेरीज | २३५२ |
| २७.१२.२००५ | ४६ | ०५.०१.२००६ | १६७ |
| २८.१२.२००५ | २८१ | ०६.०१.२००६ | ३०२ |
| २९.१२.२००५ | १७३ | ०७.०१.२००६ | ११४ |
| ३०.१२.२००५ | ३०२ | ०८.०१.२००६ | १९९ |
| ३१.१२.२००५ | २७५ | ०९.०१.२००६ | १४० |
| ०१.०१.२००६ | ६४५ | १०.०१.२००६ | ८७ |
| ०२.०१.२००६ | ३०१ | ११.०१.२००६ | १३७ |
| ०३.०१.२००६ | १४५ | १२.०१.२००६ | १५४ |
| ०४.०१.२००६ | १८४ | १३.०१.२००६ | १५९ |
| एकूण - | २३५२ | मुंबई कार्यालय | ७० |
| | | एकूण विक्री- | ३८८१ |

उपरोक्त तपशिलावरुन असे दिसून येते की, १८ दिवसात सरासरी २१५ नगांची विक्री होत आहे. विक्रीचा खप फारच कमी आहे. संबंधीत प्रेसधारकाकडून एकूण पुरवठा आजरोजी १८,३७५ नगांचा झालेला आहे. आदेशानुसार अजून १६२५ नग दिनदर्शिका येणे बाकी आहे. प्राप्त झालेले एकूण दिनदर्शिका १८३७५पैकी वरील प्रमाणे ३८८१ नगांची विक्री होऊन १४,४९४ नग आजरोजी शिल्लक आहेत. सदर श्री साई दिनदर्शिकेची विक्री प्रती नगास रुपये २५०/- मात्र आहे.सदर दिनदर्शिकेच्या विक्रीत वाढ होण्यासाठी विक्रीचा दर कमी करणे गरजेचे आहे, जेणेकरुन जास्तीत जास्त भक्तांना लाभ घेता येईल यास अनुसरुन श्री साईबाबा दिनदर्शिकेची विक्रीची किंमत रुपये २५०/- ऐवजी रुपये

१८०/- प्रती नग ठेवण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३८.** **संस्थान प्रकाशित दैनंदिनी-२००६ छपाईबाबत.**

**निर्णय क्र.३८.** मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना जा.नं.एसएसएस/वशी/ प्रकाशने/११९५३/२००५ दि.१९.१०.२००५ अन्वये श्री साईबाबा दैनंदिनी २००६ चे ९०,००० नगांचा छपाई मंजूर दर रूपये ४१/- प्रमाणे छपाई कामाचा पुरवठा आदेश देण्यात आलेला आहे.

श्रीसाईबाबा दैनंदिनीतील पूर्वीचे मनोगतातील मा.अध्यक्ष महोदयांचे फोटो शेजारी मा.उपाध्यक्ष महोदयांचा फोटो छपाई करण्याचे ठरल्याने त्या अनुषंगाने मनोगतात बदल करणे असल्याने मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांना जा.नं.एसएसएस/ वशी/प्रकाशने/३५२३५ /२००५ दि.३०.१२.२००५ अन्वये मनोगतातील बदल व सुधारणा करणे बाबत सांगून व यासाठी छपाई संबंधी होणा-या खर्चाचे बिल अदा करणेविषयी त्यांना कळविण्यात आले आहे. यास अनुसरून मे.महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांनी त्यांचे दि.३१.१२.२००५ चे फॅक्स पत्राअन्वये एकूण ९०,००० नगातील छपाईतील शेवटच्या स्टेजमध्ये असलेल्या प्रतींची संख्या ६७,००० असल्याचे कळवून सदर प्रतींमध्ये मनोगतातील दुरूस्ती करून देण्याबाबत कळविले आहे. यासाठी दैनंदिनी मधील पहिल्या १६ पानी फॉर्मची एकूण ६७,००० प्रतींसाठी छपाई पुन्हा करावी लागणार असल्याचे सदर पत्राद्वारे कळवून त्यासाठी खालीलप्रमाणे येणा-या खर्चाचे स्वतंत्र बिल अलहिदा सादर केले जाईल असे कळविले आहे.

१) कागद खरेदी ( १६ पाने x६७,००० प्रतींसाठी )

२) मनोगतातील मजकूर बदल व आर्टवर्कचे डी.टी.पी.

३) मनोगताच्या पानातील बदलामुळे १ ला १६ पानी फॉर्म पुनर्छपाई.

४) सर्व उर्वरीत ६७,००० प्रती नव्या बदलासहीत बांधणी.

वरील तपशिलानुसार महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय, पुणे यांनी त्यांचेकडील दि.०४.०१.२००६ चे फॅक्स पत्राअन्वये दैनंदिनीतील मनोगताच्या पानातील दुरूस्ती करणेकामी दुरूस्तीपोटी झालेला छपाई व बांधणी खर्चाचा तपशिल खालील प्रमाणे कळविला आहे.

**<u>खर्चाचा तपशील</u>**

१६ पानांसाठी डी.टी.पी., पॉझिटिव्ह, प्लेटमेकिंग, प्रिंटिंग, कागद, व बांधणी इ.चा ६७,००० प्रतींसाठी होणारा एकूण खर्च - रक्कम रूपये - १,०१,२२४/- तरी वर दर्शविल्या तपशिलानुसार होणारा एकूण रक्कम रूपये १,०१,२२४/- खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.३९.** **पुस्तके/फोटो छपाई करणेबाबत.**

**निर्णय क्र.३९.** पुस्तके/फोटो यांचा भांडार विभागात सद्य स्थितीत अल्प प्रमाणात साधारणतः २ ते ६ महिने पुरेल एवढाच साठा शिल्लक असल्याने खालीलप्रमाणे पुस्तके/ फोटो छपाई करून घेणे आवश्यक आहे.

**अ) पुस्तके छपाई**

| अ.नं | पुस्तकाचे नांव | भाषा | मागिल छपाईची तारीख | मागिल छपाई दर | नवीन छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | साईसत्चरित्र | **गुजराथी** | १२.०९.०२ | ३१.३८ | २५,००० | ३५.०० | ८,७५,०००/- |
| ०२ | **मुलांचे साईबाबा** | **इंग्रजी** | १२.०९.०२ | ४.०० | १०,००० | ५.०० | ५०,०००/- |
| ०३ | श्री सदगुरू साईनाथ सगुणोपासना आरती झरिन | **इंग्रजी** | १९.१२.०५ | १०.२० | ५,००० | १२.०० | ६०,०००/- |
| ०४ | श्री सदगुरू साईनाथ सगुणोपासना आरती | तामिळ | ०४.११.०४ | ८.८० | ५,००० | १०.०० | ५०,०००/- |
| | | | | | | एकूण रू. | १०,३५,०००/- |

**ब) फोटो छपाई**

| अ.नं | फोटोचे नांव | साईज | छपाई केल्याची तारीख | मागिल छपाई दर | छपाई संख्या | छपाई अंदाजे दर | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात | १०"X १४" | ३.५.०२ | ००.९८ | ५०,००० | १.१० | ५५,०००/- |
| ०२ | श्री साईबाबा मुर्ती फोटो ४ रंगात | ०७"X १०" | ३.५.०२ | ००.४८ | ५०,००० | १.०० | ५०,०००/- |
| ०३ | दगडावर बसलेले बाबा फोटो ४ रंगात | १०"X १४" | १२.९.०२ | ०१.२३ | ५०,००० | १.५० | ७५,०००/- |
| | | | | | | एकूण रू | १,८०,०००/- |

उपरोक्त "अ "व "ब" नुसार

| | | |
|---|---|---|
| १) | "अ " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ४ पुस्तके छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये | १०,३५,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ०२ | "ब " या रकान्यात दर्शविल्याप्रमाणे एकूण ३ प्रकारचे फोटो छपाई कामी अपेक्षित खर्च रूपये | १,८०,०००/- |
| | एकूण रूपये - | १२,१५,०००/- |

वरील "अ " व "ब" यात दर्शविलेप्रमाणे पुस्तके/फोटोंची छपाई ही मा.व्यवस्थापन मंडळाचे दि. २९-३१.३.२००४ चे सभेतील निर्णय क्र.१३८ नुसार १८ प्रेसधारक व मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०५.११.२००५चे सभेतील निर्णय क्र.६७८ नुसार ११ प्रेसधारक असे एकूण २९ निवडक प्रेसधारकांकडून पुस्तके/फोटो छपाई कामाचे कोटेशन्स मागविणेस व याकामी अंदाजे रूपये १२,१५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रकाशने विभागप्रमुख)

**विषय नं.४०. सन २००६-०७ प्रसादालय व कॅन्टीन वार्षिक किराणा माल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४०.** सन २००६-०७ सालामध्ये प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापराकरीता खरेदी करावयाचे गहू, हरबरा इ.धान्य तसेच तांदूळ ,तूप, तेल, साखर, चहा,दूध विविध प्रकारचा किराणा माल, बिस्कीटे इत्यादी मालाचा तपशीलवार तक्ता सर्व सदस्यांना पुरविण्यात आला होता. तो सोबत परिशिष्ट "क" म्हणून ठेवण्यात आला आहे. गेल्या ३ वर्षाच्या प्रसादालय विभागाकडील प्रत्यक्ष वापराची आकडेवारी दिलेली असून या कालावधीमधील प्रत्यक्ष खपाचे सरासरीमध्ये १०% वाढ गृहीत धरलेली आहे. तसेच भोजनात सुरु झालेली चटणी तसेच सत्संग उत्सव आदी कार्यक्रमासाठी माल देणगी दयावी लागत असल्याने काही मालाचा खप वाढलेला आहे. त्यामुळेही काही माल वाढीव खरेदी करावा लागणार आहे. त्याबाबतचा तपशील खालीलप्रमाणे-

**अ) मोंढयावरुन जाहिर लिलाव पध्दतीने खरेदी....**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| गहू - | ७००० | क्विंटल | मेथी- | १.५० | क्विंटल |
| हरभरा- | ३७५ | क्विंटल | सफेद तीळ- | १.०० | क्विंटल |
| मोहरी- | २५ | क्विंटल | खिसमिस- | १०५.०० | क्विंटल |

दरवर्षी गहू, हरभरा, मोहरी, मेथी व सफेद तीळ इ.ची खरेदी कृषी उत्पन्न बाजार समितीचे कोपरगाव, कोल्हार इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरून मा. स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीमध्ये जाहिर लिलाव पध्दतीने करणेत येते. मध्यवर्ती भांडार विभागातील गव्हाचा शिल्लक साठा पाहता १००० क्विंटल गहू कमी खरेदी करणेत येत आहे.

सन २००६-०७ करीता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या कोपरगांव, कोल्हार व राहाता इत्यादी ठिकाणच्या मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करावी लागेल व खरेदी केलेला माल मध्यवर्ती भांडारमध्ये साठवून जागा अपुरी पडल्यास राज्य वखार महामंडळाचे कोपरगांव येथील गोदामामध्ये ठेवावा लागेल. सदरील खरेदी मार्च २००६ पासून मा.विश्वस्तांचे उपस्थितीत सुरू करण्यात यावी.

तसेच सन २००५-०६ मध्ये प्रसादालयासाठी आवश्यक खिसमिस कृषी उत्पन्न बाजार समितीच्या पिंपळगांव बसवंत, तासगांव, सांगली पंढरपूर येथील मोंढयावरून जाहीर लिलावाने खरेदी करण्यास तसेच मे.प्रवरा फळे भाजीपाला व प्रक्रिया खरेदी विक्री शेतकरी सहकारी संस्था मर्यादित, प्रवरानगर यांचेकडूनही खरेदी करणेस व त्यांचेकडील शितगृहात आवश्यकतेनुसार ठेवणेस मान्यता मिळालेली होती. त्यानुसार खिसमिस खरेदी करणेत आलेला होता मात्र मे.प्रवरा फळे यांनी शितगृहात खिसमिस ठेवणेस असमर्थता दर्शविलेने अहमदनगर येथील शितगृहात खिसमिस ठेवून आवश्यकतेनुसार वापरणेत येत आहे. सन २००६-०७ साठीही वरीलप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली.

**ब) कोटेशन मागवून खरेदी..साखर ७००० क्विंटल (एम ३० ग्रेड)**

कॅन्टीन तसेच प्रसाद लाडू बनविणेसाठी आवश्यक साखर खरेदीसाठी सन २००५-०६ मध्ये अ.नगर जिल्हयातील कोपरगांव, राहाता व श्रीरामपूर तालुक्यांतील ५० कि.मी.च्या परिसरातील कारखान्याकडून दरपत्रके मागवून तसेच संस्थान वाहनाने वाहतूक करुन खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती. सन २००६-०७ मध्ये कारखाना तसेच संस्थान वाहनाने वाहतूक अशा अशा दराचे टेंडर मागवून वाहतुक खर्चाबाबत शहानिशा करून खरेदी करण्यात यावी.

**क) उत्पादकांकडून खरेदी.. वनस्पती तूप- २०० क्विंटल**

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक वनस्पती तूप मे.विप्रो लिमीटेड, अंमळनेर, जिल्हा जळगांव यांचेकडून त्या-त्या वेळी अस्तित्वात असणा-या दराने थेट खरेदी करणेस तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०९.०७.२००५ मधील निर्णयानुसार संस्थान कामकाजात अडचण होवू नये म्हणून मे.पारख फुडस, पुणे किंवा अन्य उत्पादक यांचेकडून त्या-त्या वेळेस अस्तित्वात असणाऱ्या दराने थेट खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती. सन २००६-०७ मध्येही पारख फुडस, पुणे अथवा इतर उत्पादकांकडून त्या-त्या वेळी अस्तित्वात असणा-या दराने खरेदी करण्यात यावी.

**ड) जाहिर निविदा मागवून खरेदी..**

**०१. किराणा माल, कडधान्ये व मसाल्याचे पदार्थ**

प्रसादालयाचे दैनंदिन वापरासाठी लागणारा किराणा माल, कडधान्ये व मसाले पदार्थ इत्यादी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देउन को-या निविदांची विक्री करून ठरावीक मुदतीत निविदा व मालाचे नमूने मागवून, मा.विश्वस्त समितीचे सभेमध्ये नमूने निवडून, तसेच संबंधितांना समक्ष चर्चेसाठी बोलावून अंतिम निर्णय घेतला जातो. त्याप्रमाणेच सन २००६-०७ साठीचे खरेदीकामी कार्यवाहीस मान्यता असावी. तसेच मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०८.०५.२००५ मधील निर्णयानुसार प्रसाद भोजनात बासमती सुगंधी तांदुळाचा भात दयावा असा निर्णय झाल्याने बासमती आख्खा/तुकडा तांदुळ पुरविणेकामी निविदा मागविणेत आलेल्या होत्या. त्यानुसार प्राप्त झालेल्या निविदावर निर्णय होवून सुपर कोहीनुर बासमती दुबार, मिनीदुबार, कोहीनुर फुटबॉल, फ्लाईंग हॉर्स या प्रकारचा तांदुळ वेगवेगळया दराने खरेदी करणेत आलेला आहे.

सन २००६-०७ मध्ये एकाच प्रकारच्या तांदुळाचे नमुने मागविल्यास तुलनात्मक दृष्टया निर्णय घेणे सोईचे होईल.याकरीता मा.विश्वस्त श्री पांडुरंग गमाजी अभंग मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर, मा.श्री सुरेश गोरक्षनाथ वाबळे, मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांची उपसमिती नेमणेत आली. त्यांनी आंध्रप्रदेशात किंवा तांदूळ उत्पादन करणारे राज्यात समक्ष जाऊन अथवा निविदा मागवून आंध्र सोना मसुरी (आंध्रप्रदेश) तांदळाच्या नमुन्यांची पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले.

**०२. गावरान तूप- ३४०० क्विंटल**

प्रसादालयामध्ये प्रसाद लाडू तयार करणेकामी आवश्यक असणारे गावरान तूप सन २००५-०६ मध्ये मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार दोन टप्प्यात निविदा मागवून खरेदी करणेस आले होते. सन २००५-०६ मध्ये पहिल्या सहामाहीसाठी गावरान तूप अॅगमार्क पॅकींगमध्ये प्र.किलो रू.१०१/- अधिक वॅट या दराने खरेदी करणेत आलेले होते. दुस-या सहामाहीमध्ये प्र.किलो रु.११५/-अॅगमार्क पॅकींग व लूज तूप रु.१०८/-प्र.किलो दराने खरेदी करणेत येत आहे.

सन २००६-०७ साठीही सन २००५-०६ प्रमाणेच दि. ०१.०५.०६ ते ३१.१०.०६ व ०१.११.०६ ते ३०.०४.०७ अशा २ सहामाहीसाठी वेगवेगळया निविदा मागवाव्यात. तसेच लूज ३५ किग्रॅ. कॅन व १५ किग्रॅ. डब्यातील अॅगमार्क तूपासाठी निविदा मागणी करून खरेदी करण्यात यावी.

**०३. चहा- ६० क्विटंल व कॉफी-५ क्विटंल**

सन २००५-०६ मध्ये सपट व टाटा सीटीसी डस्ट चहा व ब्रुक बॉण्ड कॅफे गोल्ड कॉफी खरेदी करण्यात येत आहे. कॅन्टीन विभागासाठी सन २००६-०७ मध्ये ब्रुक बॉण्ड सुपर डस्ट, टाटा सीटीसी डस्ट व सपट सीटीसी डस्ट तसेच कॉफीसाठी ब्रुक बॉण्ड कॅफे गोल्डची अथवा ब्रु गोल्ड कॉफीची निविदा मागणी करून खरेदी करणेत यावी.

**०४. बिस्कीटे - पार्ले व ब्रिटानीया**

कॅन्टीनमध्ये दैनंदिन विक्रीकामी आवश्यक असणारे पार्ले प्रॉडक्टचे १००/१५० ग्रॅम, क्रॅकजॅक व मोनॅको तसेच ब्रिटानीया प्रॉडक्टस्चे १००/१५० ग्रॅम, फिफ्टी-फिफ्टी, स्नॅक्स इत्यादी बिस्कीटे कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यांकडून खरेदी करणेस तसेच श्री साईभक्तांचे मागणीनुसार वरील कंपन्यांचे ब्रॅण्ड पैकी काही नवीन खरेदी करावयाची झाल्यास ती खरेदी करण्यात यावी

**०५. पॅकेज्ड् ड्रीकींग वॉटर -०१ लिटर व ५०० एमएल पॅकींग**

शासनाच्या नियमानुसार आयएस आय स्टॅण्डर्ड मान्यता प्राप्त पॅकेज्ड् ड्रीकींग वॉटर उत्पादनाच्या निविदा मागणी करून १ लिटर व ५०० एमएल पॅकींगमध्ये ड्रीकींग वॉटर खरेदीकामी निविदा मागवाव्यात.

**०६. गाय दूध - दररोज अंदाजे १६०० लिटर**

कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठीचे गाय दूध ३.५ ते ३.८ फॅट व ८.५ एसएनएफ गुणवत्तेचे दूध खरेदी कामी निविदा मागणी करून खरेदी करण्यात यावी.

**०७. डिश वॉशिंग मशिन लिक्वीड, लिक्वीड सोप व क्लिनींग पावडर-**

प्रसादालयाकडील भांडे धुण्याच्या मशिनसाठी आवश्यक असणारे डिश वॉशिंग मशीनसाठी नॉन फोमिंग लिक्वीड सोप साफसफाईसाठी लिक्वीड सोप व क्लिनींग पावडरसाठी निविदा मागणी करून खरेदी करण्यात यावी. या वर्षापासून डिश वॉशिंग लिक्वीड सोपचा निविदेमध्ये समावेश करणेत आलेला आहे.

**०८. भाजीपाला**

प्रसादालयाचे दैनंदिन वापराकरीता आवश्यक भाजीपाला कृषी उत्पन्न बाजार समिती कोपरगांव, शिरडी, सावळीविहीर, राहाता इ.ठिकाणीचे जाहीर लिलावाने खरेदी करणेत येत आहे. सन २००६-०७ मध्येही कृषी उत्पन्न समितीचे कोपरगांव, शिरडी सावळीविहीर तसेच राहाता इत्यादी ठिकाणचे मोंढयावरून जाहिर लिलाव पध्दतीने आवश्यकतेनुसार खरेदी करण्यात यावी.

दरवर्षी किराणा माल, गावरान तूप, तेल, दूध, मिनरल वॉटर, बिस्कीटे इत्यादी खरेदीकामी वर्तमानपत्रात जाहिरात देवून, कोऱ्या निविदा फॉर्म विक्री करून, निविदेसोबत नमूने मागणी करणेत येतात. आलेले नमूने मा.व्यवस्थापन समितीचे सभेत उघडून, निवडून संबंधितांना मा.व्यवस्थापन समितीचे सभेत चर्चेस बोलावून खरेदीबाबत निर्णय घेणेत येतो. सन २००५-०६ मध्ये आर्थिक उलाढालीबाबत निकष देण्यात आलेले होते. त्यामुळे योग्य क्षमतेच्या पुरवठादाराकडून निविदा सादर केल्या गेल्या होत्या. सन २००६-०७ मध्येही खालीलप्रमाणे वार्षीक उलाढालीबाबत निकष देवून त्या निकषांनुसार निविदांची मागणी करण्यात यावी.

| अ.नं. | तपशील | संस्थानला करावयाची अंदाजे खरेदीची रक्कम | पूरवठाधारकाची अपेक्षीत वार्षिक उलाढाल |
|---|---|---|---|
| ०१ | किराणामाल-तांदूळ,दाळी, कडधान्ये व इतर | ३,०९,०८,५२४/- | ५०,००,०००/- |
| ०२. | सुर्यफूल/मका तेल | ७०,९२,१७६/- | १,००,००,०००/- |
| ०३. | गावरान तूप (सहामाही खरेदी) | १,९५,५०,०००/- | ५०,००,०००/- |
| ०४. | चहा व कॉफी | ६,८४,८२०/- | १०,००,०००/- |
| ०५. | गाय दुध | ६६,५७,६००/- | १,००,००,०००/- |
| ०६. | बिस्कीटे | १५,७५,०००/- | १०,००,०००/- |
| ०७. | पॉलिकप | १२,७५,०००/- | २०,००,०००/- |
| ०८. | मिनरल वॉटर | ७,९४,६००/- | १०,००,०००/- |
| ०९. | प्लॅस्टीक पिशवी | २३,३७,४००/- | ३०,००,०००/- |

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४१. सन २००५-०६ प्रसादालय व कँटीन विभागातील वाढीव माल खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४१.** सन २००५-०६ मध्ये (दि.०१.०५.०५ ते दि.३०.०४.०६ अखेर ) प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे दैनंदिन वापरासाठी आवश्यक किराणा माल खरेदीकामी मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२९.०१.२००५ निर्णय क्र.१६ नुसार मान्यता मिळालेली असून त्यानुसार खरेदी करणेत येत आहे.

अ) प्रसादलाडूसाठी आवश्यक असणारे गावरान तूप पुरविणेकामी पहिल्या सहामाहीसाठी मे.नारायण उदेराम वैश्य, नाशिक यांना १२०० क्विंटल तूप पुरविणेकामी पुरवठा आदेश देणेत आलेला होता. पहिल्या सहामाहीसाठी एकूण१७५० क्विंटल तूपाची मागणी होती. मात्र खरेदी निर्णयास २ महिने उशीर झाल्याने त्यांना १२०० क्विंटल गावरान तूप पुरविणेचा पुरवठा आदेश देणेत आलेला होता. मात्र गर्दीचे प्रमाण वाढल्याने त्यांचेकडून ३२३ क्विंटल तूप जादा खरेदी करणेत आलेले आहे

ब) प्रसादालय व कॅन्टीन विभागाकडील दि.३१.१२.२००५ अखेर वापराचे परिमाणावरुन काही माल पूर्वीचे मंजूर परिमाणापेक्षा जादा खरेदी करावा लागेल. त्यासाठी अंदाजे रक्कम रुपये २६,६०,०००/- इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

| अ.नं. | तपशिल | मागणी | रक्कम रुपये |
|---|---|---|---|
| ०१. | साखर | १००० क्विंटल | १९,००,०००/- |
| ०२. | हरबराडाळ | १५० क्विंटल | ३,७१,२५०/- |
| ०३. | वनस्पती तूप | १० क्विंटल | ४३,०००/- |
| ०४. | खिसमिस | ५ क्विंटल | ३१,५८५/- |
| ०५. | रवा | ५ क्विंटल | ५,३६५/- |
| ०६. | कच्चे पोहे | ४ क्विंटल | ५,८००/- |
| ०७. | पापड | १ क्विंटल | ८,०००/- |
| ०८. | पार्ले बिस्कीट १५०ग्रॅम | १५००० पुडे | ९०,०००/- |
| ०९. | ब्रिटानीया ५०-५० | १५००० पुडे | ९०,०००/- |
| १०. | मिनरल वॉटर १ लिटर | २०००० बाटली | १,१५,०००/- |
| | | एकुण | २६,६०,०००/- |

यावर सविस्तर चर्चा होऊन सन २००५-०६ या सालाकरिता प्रसादालय व कॅन्टीन विभागासाठी वरीलप्रमाणे जादा माल पूर्वीच्या मान्य दराने आवश्यकतेनुसार खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २६,६०,०००/-चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-खरेदी अधिकारी)

**विषय नं.४२. पाणीपुरवठा विभागासाठी ब्लिचिंग पावडर,ॲलम, क्लोरिन गॅस सिलेंडर खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणेबाबत**

**निर्णय क्र.४२.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१८.१२.२००५ मधील निर्णयानुसार संस्थानचे पाणीपुरवठा विभागाचे कनकुरी साठवण तलाव येथे पाणी शुद्धीकरणासाठी आवश्यक असणारी ब्लिचींग पावडर-२५ टन, फेरीक ॲलम (तुरटी)-५० टन व क्लोरीन गॅस सिलेंडर-२० नग खरेदीस व त्याकामी येणारे

रु.५,७७,८००/-चे खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार दि.०६-०७/०१/२००६ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देवून दि.०९.०१.०६ ते दि.१९.०१.२००६ अखेर शिरडी व मुंबई कार्यालयात निविदा विक्री ठेवणेत येवून निविदा स्विकारणे मुदत दि.२०.०१.२००६ अखेर अशी ठेवणेत आलेली होती. त्यानुसार मुदतीअंती खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक |
| ०२. | एसव्हीएस केमिकल कार्पोरेशन, पुणे |
| ०३. | स्वानंद ट्रेडर्स प्रा.लिमीटेड, लोणी खुर्द |
| ०४. | स्नेहल एजन्सीज, औरंगाबाद |
| ०५. | श्री गणेश एजन्सीज, वैजापूर |
| ०६. | राजदिप एंटरप्राईजेस, मुंबई (मुंबई कार्यालय) |

त्यानुसार खालील निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता निविदासादरकर्त्यांनी चर्चा /वाटाघाटीमध्ये खालीलप्रमाणे दर देऊ केलेले आहेत.

| अ.नं. | निविदासादरकर्त्याचे नांव | स्टेबल ब्लिचींग पावडर IS-1065-1089 (IInd Revision)Grade I I.S.I ग्रासीम मेक एसबीपी-विक्रम ब्रॅण्ड किंवा डीसीएम मेक श्रीराम ब्रॅण्ड किंवा श्री रॉयल सिमा बुच केंसीन लिमिटेड ज्योत्स्ना ब्रॅण्ड. २५ मे.टन. | | ॲल्युमिना सल्फेट (फेरीक ॲलम) Loose slabs 16/ 17% Grade I with ISI As per I.S.I Standard I.S 299/1989 धरमसी मोरारजी केमिकल, अंबरनाथ किंवा वाडा ॲलम्स ॲण्ड ॲसीड, मुंबई ५० टन | | लिक्वीड क्लोरीन गॅस सिलेंडर आय.एस.आय मार्क २० सिलेंडर्स | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर | निविदेतील दर | वाटाघाटीनंतरचे दर |
| ०१. | एशियन सेल्स कार्पोरेशन, नाशिक | १४३५२.०० + १२.५% व्हॅट १६१४६.०० Siel Co. | १३९२१.०० + १२.५% व्हॅट १५६६१.०० | --- | --- | -- | -- |
| ०२. | मे.एसव्हीएस केमिकल कार्पोरेशन,पुणे | १४४००.०० + १२.५% व्हॅट १६२००.०० ग्रासिम | १४३५०.०० + १२.५% व्हॅट १६१४३.७५ | २५७५.०० +१२.५% व्हॅट २८९६.८७ वाडा | २५५०.०० +१२.५% व्हॅट २८६८.७५ | ४३००.००+ + ४% व्हॅट ४४७२.०० | ४३००.००+ + ४% व्हॅट ४४७२.०० |
| ०३. | स्वानंद ट्रेडर्स,लोणी | १५०००.०० + १२.५% व्हॅट १६८७५.०० रॉयल सिमा | १५६००.०० + १२.५% व्हॅट १७५५०.०० | ३७००.०० + १२.५% व्हॅट ४१६२.५० डीएमसी | ३६००.०० +१२.५% व्हॅट ४०५०.०० | -- | -- |
| ०४. | स्नेहल एजन्सीज,औरंगाबाद | --- | --- | २९००.००+ +१२.५% व्हॅट ३२६२.५० Kaustaba | २८००.०० +१२.५% व्हॅट ३१५०.०० | -- | -- |
| ०५. | श्री गणेश वैजापूर | १५६००.०० + १२.५% व्हॅट १७५५०.०० ग्रासीम मेक | अनुपस्थित | ३५००.०० + +१२.५% व्हॅट ३९३७.५० DMC | अनुपस्थित | --- | ----- |
| ०६. | मे.राजदिप एंटरप्रायजेस, मुंबई | १७१००.०० व्हॅटसह | अनुपस्थित | ३२६२.५० | अनुपस्थित | ४२००.०० +४% व्हॅट ४३६८.०० | अनुपस्थित |
| ०७. | हितू जितू एंटरप्रायजेस, मुंबई | १४२२०.०० + १२.५% व्हॅट १५९९७.५० ग्रासीम मेक | १४०००.०० + १२.५% व्हॅट १५७५०.०० (पत्राव्दारे सुट) | --- | --- | | |

यावर सविस्तर चर्चा होऊन, ब्लिचिंग पावडर खरेदीकामी मे. एशियन सेल्स,नाशिक यांचे दर निम्नतम आहेत. मात्र मागणीप्रमाणे कंपनीचे नाही त्यामुळे ब्लिचिंग पावडरसाठी मे.हितू जितू एंटरप्रायजेस, मुंबई, ॲल्युमिना सल्फेट (फेरीक ॲलम)खरेदीकामी मे.एस.व्ही.एस.केमिकल कार्पोरेशन, पुणे व क्लोरीन गॅस सिलेंडर्स खरेदीकामी मे.राजदीप एंटरप्राईजेस,मुंबई यांचे निम्नतम दर स्वीकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असें ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक खरेदी विभाग)

**विषय नं.४३. साईनिवास अतिथीगृह व भक्तनिवासस्थान इमारतीसाठी फायबर खुर्च्या खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४३.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.११.२००५ मधील निर्णय क्र.६८६ नुसार संस्थानचे साईनिवास अतिथीगृह व भक्तनिवासस्थान इमारतीसाठी आवश्यक असणाऱ्या फायबर खुर्च्या खरेदीकामी निलकमल कंपनीकडून कोटेशन्स मागविण्यात यावेत. कोटेशन्स मागणी करतांना कोटेशन्समध्ये वजनाचा उल्लेख करावा. तसेच साईनिवास अतिथीगृह व भक्तनिवासस्थान या ठिकाणी वापरण्यात येणाऱ्या खुर्च्या वेगवेगळया रंगाच्या घ्याव्यात असा निर्णय झालेला असून याकामी अंदाजे रक्कम रुपये ६ लाखचे खर्चास मान्यता देण्यात आलेली आहे.

त्यानुसार निलकमल कंपनीच्या खुर्च्यासाठी मे.निलकमल प्लॅस्टीक लिमीटेड, मुंबई यांना जा.क्र.एसएसएस/खरेदी/७६/२००५ दि.०३.०१.२००६ अन्वये पत्र पाठवून काही निवडक नमुन्यांचे दर, रंग, वजन व इतर शर्ती-अटीबाबत सविस्तर पत्र मागविणेत आलेले होते. मे.निलकमल यांनी त्यांचे जा.क्र.एनपीएल/एएम/जीए/२००५-०६ दि.१३.०१.२००६ पत्रान्वये खालीलप्रमाणे दर दिलेले आहे. त्याचा तपशिल-

| अ.नं | खुर्ची मॉडेल नंबर | मागणी | दर प्र.नग | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | सीएचआर २०५१ | ११०० नग | रु.२९०/- | रु.३,१९,०००/- |
| ०२. | सीएचआर २०६० | ३०० नग | रु.२४५/- | रु. ७३,५००/- |
| ०३. | सीएचआर ४००१ | ४०० नग | रु.२८४/- | रु.१,१३,६००/- |
| ०४. | हेरीटेज | २०० नग | रु.४७०/- | रु. ९४,०००/- |
| | **एकूण** | **२००० नग** | | **रु.६,००,१००/-** |

मे.निलकमल प्लॅस्टीक लिमीटेड, मुंबई यांनी त्यांचे पत्रात पुरवठा आदेशात १००टक्के ॲडव्हॉन्स मागितलेला आहे. तसेच मालाची पोहोच १५ दिवसाचे आत शिरडी येथे करणेत येईल. सदरील खुर्च्यामध्ये साधारणत: मार्बल बेग, पिअरवुड व मार्बल व्हाईट याप्रकारे रंग उपलब्ध असल्याचे नमुद केलेले आहे. दरपत्रकामध्ये खुर्च्यांचे वजनाचा उल्लेख केलेला नसल्याने वजन व पेमेंटच्या ॲडव्हॉन्सबाबत त्यांचे प्रतिनिधी श्री आाशिष माहना, एरीया सेल्स मॅनेजर यांचेशी दूरध्वनीवरुन संपर्क साधला असता, खुर्च्यांचा पुरवठा डिलर मार्फत न होता थेट कंपनीकडून होणार असल्याने त्यांची सर्वस्वी जबाबदारी कंपनीवर राहील तसेच त्यांनी ॲडव्हॉन्स न घेता माल पोहोच केला जाईल मात्र माल पोहोच झालेनंतर पेमेंटची लवकरात लवकर व्यवस्था करावी असे कळविलेले आहे. सदर पत्रात त्यांनी सुटबाबतचा उल्लेख केलेला नसल्याने त्यांचे प्रतिनिधींना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले असता त्यांनी खालीलप्रमाणे दर देऊ केले.

| अ.नं | खुर्ची मॉडेल नंबर | मागणी | देऊ केलेले दर | चर्चा/वाटाघाटीमध्ये देऊ केलेले दर |
|---|---|---|---|---|
| ०१. | सीएचआर २०५१ | ११०० नग | रु.२९०/- | रु.२८०/- |
| ०२. | सीएचआर २०६० | ३०० नग | रु.२४५/- | रु.२३५/- |
| ०३. | सीएचआर ४००१ | ४०० नग | रु.२८४/- | रु.२७४/- |
| ०४. | हेरीटेज | २०० नग | रु.४७०/- | रु.४६०/- |

उपस्थित सदस्यांनी सभागृहात नमूना खुर्च्यांची समक्ष पहाणी करुन खालीलप्रमाणे खुर्च्या खरेदी कराव्यात तसेच कंपनीचे प्रतिनिधीने समक्ष कबूल केल्याप्रमाणे प्रत्येक खुर्चीवर संस्थानचे नांव टाकण्यात यावे, असे ठरले.

| अ.नं | खुर्ची मॉडेल नंबर | मागणी | देऊ केलेले दर |
|---|---|---|---|
| ०१. | सीएचआर २०५१ | १९०० नग | रु.२८०/- |
| ०२. | हेरीटेज | १०० नग | रु.४६०/- |

(कार्यवाही-अधिक्षक, खरेदी विभाग)

**विषय नं.४४. कार्यालयीन कामासाठी झेरॉक्स मशिन खरेदीकामी आलेले कोटेशन्स उघडून निर्णय घेणे.**

**निर्णय क्र.४४.** मा.व्यवस्थापन समिती सभा दि.०५.११.२००५ मधील निर्णय क्र.६८५ नुसार संस्थानचे कार्यालयीन कामकाजासाठी आवश्यक असणाऱ्या अद्ययावत तंत्रज्ञानावार आधारीत, कॅनॉन व रिको कंपनीच्या दोन डिजीटल झेरॉक्स मशिन्स विहीत पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १२ लाख चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार दि.०६-०७/०१/२००६ चे दरम्यान वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदाधारकाच्या संस्थेचे लेटरहेडवर सर्वसमावेशक दर तसेच आवश्यक कागदपत्रे, माहितीपत्र व १ टक्का बयाणा रकमेच्या डि.डि.सह सिलबंद दरपत्रके शिरडी व मुंबई कार्यालयात दि.२०.०१.२००६ अखेर मागविणेत आलेल्या होत्या. त्यानुसार मुदतीअंती खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं. | निविदाधारकाचे नांव |
|---|---|
| ०१. | शिवाणी सेल्स कार्पोरेशन, पुणे |
| ०२. | सेंचुरीएन मार्केटींग, अहमदनगर |
| ०३. | स्वॅन इलेक्ट्रो मेक सिस्टीम्स, नाशिक |
| ०४. | झेरॉक्स इंडीया लिमीटेड, हरीयाणा |
| ०५. | आर.बी.इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर |
| ०६. | एचसीएल इन्फायनेट लिमीटेड, पुणे |
| ०७. | एसीई ऑफीस ॲटोमेशन, पुणे |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदा आजचे सभेत समक्ष उघडण्यात येऊन निविदासादरकर्त्यांना आजचे सभेत समक्ष चर्चा/वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते.

निविदासादरकर्त्याशी समक्ष चर्चा/वाटाघाटीमध्ये कॅनन कंपनीने परिपूर्ण कोटेशन्स भरलेले नसलेचे दिसून आल्याने थेट कॅनन कंपनीकडून फॅक्सपत्राव्दारे कोटेशन्स मागवून प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग)

**विषय नं.४५.** **प्रसादालयातील चपात्या (पोळी) लाडू/बर्फी व अन्न पाकीटे (नाष्टा) तयार करुन घेणेचे काम टेंडर पद्धतीने देणेबाबत.**

**निर्णय क्र.४५.** ०१. प्रसादालयात प्रसाद भोजन घेणा-या साईभक्तांसाठी चांगल्या प्रतीच्या चपात्या (स्वामी नारायण पोळी) मिळाव्या म्हणून सन १९९९ पासून चपात्या बनविण्याचे काम टेंडर पध्दतीने देण्यात आलेले आहे. सन २००५-०६ साठी चपाती (आटा+मैदा) बनविण्याचे कंत्राट श्री प्रेमशंकर हरीशंकर जोशी, साळंगपुर यांना रु.३८०/- प्रति क्विंटल दराने देणेत आलेले आहे. यामध्ये त्यांचेकडील कामगाराना निवास, दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामूल्य देण्यात येत आहे. सदर टेंडरची मुदत दि.३१/०३/२००६ रोजी संपत आहे.

०२. साईभक्तांना संस्थानतर्फे मोतीचूर प्रसादलाडूची प्रति पाकिट रु.१०/- (तीन नग) या सवलतीचे दराने विक्री करण्यात येते. सदर प्रसाद लाडू बनविण्याचे काम टेंडर पध्दतीने देण्यात आलेले आहे. सन २००५-२००६ साठी प्रसाद लाडू बाविण्याचे कंत्राट श्री माधव गंगाराम नाईकवाडी रा. अंदरसूल याना रु.११०/- प्रति हजारी दराने देण्यात आलेले आहे.यामध्ये त्यांचेकडील कामगारांना दोन वेळ भोजन व दोन वेळ चहा विनामूल्य देण्यात येत आहे. मात्र त्यांचेकडून ३ उत्सवाचे व ३ श्रमपरिहार भोजनाचे मिष्टान्न मोफत बनवून घेत आहोत. तसेच प्रसाद भोजन व नाष्टा पाकीटामध्ये गोड पदार्थ म्हणून बर्फी देण्यात येते. सदर बर्फी बनविण्याचे काम हे सुध्दा लाडू कंत्राटदार श्री माधव गंगाराम नाईकवाडी यांनाच रु.१.३०/- प्रति किलो (साखर) या दराने दिलेले असून त्याचीही मुदत दि.३१/०३/२००६ रोजी संपत आहे. उपरोक्त कामगारांना निवासासाठी साईउद्यान इमारतीमधील २ खोल्या देण्यात आलेल्या आहेत. मात्र कंत्राटदाराकडून प्रचलित दराने सेवा आकार वसूल करण्यात येतो.

०३.साईभक्तांना संस्थानतर्फे नाष्टयाकरीता सकाळी ७.०० ते १०.०० यावेळेत नाष्टा पाकिटे रु.३.०० या सवलतीचे दरात विक्री करण्यात येतात. सदर नाष्टा पाकीटात ५ पु-या, सुकी भाजी व गोड पदार्थ म्हणून बर्फी देण्यात येते. नाष्टापाकीट बनविणेचे काम सौ.रोहिणी राजेंद्र कोते व्दारा श्री साईबाबा समाज विकास संस्था , शिरडी यांना रु.००/५० पैसे प्रति पाकीटास मजुरी या दराने देण्यात आलेले असून त्यांची मुदत दि.३१/०३/२००६ अखेर संपत आहे. याकामी लावलेल्या कामगारांना एक वेळ चहा व भोजन विनामूल्य देण्यात येते.

वरीलप्रमाणे तीनही ठेकेदारांची नेमणूक करताना सन २००५ मध्ये वृत्तपत्रात जाहीरात देऊन उपरोक्तप्रमाणे तीनही प्रकारची कामे पुढील कालावधीसाठी देणेकामी टेंडर मागविणेत आलेले होते.कामाचा अनुभव , गुणवत्ता, व न्यूनतम दर यावर चर्चा होउन सदर ठेकेदारांची निवड झालेली आहे. तसेच त्या तिघांचेही काम समाधानकारक असल्याने सध्याचेच वरील ३ ठेकेदारांना पूर्वीचे अटी व शर्तीवर पुढील एक वर्षासाठी मुदतवाढ देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक, प्रसादालय विभाग)

**विषय नं.४६.** **मा.सदस्यांचे भाडोत्री वाहनांचे बीलाबाबत.**

**निर्णय क्र.४६.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०१.०९.२००४ रोजी शिरडी येथे झालेल्या सभेतील निर्णयान्वये संस्थानचे शिरडी व मुंबई येथे होणारे व्यवस्थापन समितीचे सभांसाठी देण्यात येणारे दैनिक भता न घेण्याचा निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. तसेच सदस्यांनी मागणी केल्यास फक्त सभेसाठी जाणे-येण्यास प्रत्यक्ष खर्च दिला जावा अथवा त्यासाठीची व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात यावी असे ठरले.

बऱ्याच वेळा मा.सदस्य श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे उत्सव, वेगवेगळया कामाच्या निविदा उघडणे, प्रसादालय व रुग्णालय नियोजित इमारतीची पहाणी करणेकामी शिरडी अथवा मुंबई येथे बोलाविण्यात येतात. परंतू वरील निर्णयाप्रमाणे फक्त सभासाठी जाणे-येण्याचा खर्च देण्यात यावा असा निर्णय सहमत झालेला असल्याने इतर वेळी त्यांचे मागणीप्रमाणे बीले अदा करणेस अडचण निर्माण होत आहे.

तसेच आपले संस्थानचे वाहनाचे खाजगी वापराचे दर प्रति कि.मी.ए.सी. वाहनास रुपये ५/- व नॉन ए.सी. वाहनास रुपये ४/- असा आहे. त्यामूळे मा.सदस्यांनी सभेसाठी किंवा इतर संस्थानचे कामासाठी किंवा इतर संस्थानचे कामासाठी आणलेले खाजगी वाहन बील अदा करणेस अडचण निर्माण होत आहे. त्याकरीता प्रति कि.मी. प्रमाणे दर निश्चित करणे आवश्यक आहे.

मा.सदस्यांनी सभासाठी अथवा संस्थानचे इतर कामाकरीता आणलेल्या खाजगी वाहनांचे बील देणेस, तसेच खाजगी वाहनाचे प्रति कि.मी. दर नॉन ए.सी. वाहनांसाठी रुपये ६/- व ए.सी.वाहनांसाठी रुपये ७/- मात्र निश्चित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.४७.** **अ) संस्थानसाठी नवीन बसेस खरेदीबाबत.**
**ब) संस्थानसाठी नवीन वाहने खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४७.** **अ)**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे इंग्लिश मिडीयम स्कूल कडील मुले ने-आण करणे करीता तसेच श्री साईभक्तांची मंदिर परिसर ते नविन भक्तनिवास स्थान येथे ने-आण करणे करीता खालील प्रमाणे बसेस खरेदी केलेल्या आहेत.

| *अ.नं.* | *वाहन प्रकार* | *वाहन क्रमांक* | *खरेदी साल* | *खरेदी रक्कम* |
|---|---|---|---|---|
| ०१. | स्कुलबस | एमएच-१७/ए-७५९३ | १९९२ | ६,४५,३०१.०० |
| ०२. | स्कुलबस | एमएच-१७/ए-७५९४ | १९९२ | ६,४५,३०१.०० |
| ०३. | स्कुलबस | एमएच-१७/सी-९०१६ | १९९६ | ८,४३,८५६.०० |
| ०४. | स्कुलबस | एमएच-१७/सी-८८५१ | २००२ | ९,३०,६००.०० |
| ०५. | स्कुलबस | एमएच-१७/के-९३७० | २००४ | ११,४२,१९०.०० |
| ०६. | भक्तनिवास बस | एमएच-१७/ए-७५९५ | १९९२ | ६,४५,३०१.०० |
| ०७. | भक्तनिवास बस | एमएच-१७/सी-९०१७ | १९९६ | ८,४३,८५६.०० |
| ०८. | भक्तनिवास बस | एमएच-१७/के-९३७१ | २००४ | ११,४२,१९०.०० |

उपरोक्त बसेस पैकी श्री साईभक्तांचे सोयी करीता मा.व्यवस्थापन समितीचे दि.१७/०४/२००५चे सभेतील निर्णय क्रं.१५९ अन्वये दि.०६/०८/२००५ पासून भक्तनिवास कडील दोन बसेस शिरडी-नगरसुल रेल्वेस्टेशन- शिरडी करीता सवलतीचे दरात प्रति सिट रू.२५/- प्रमाणे सुरू करण्यात आलेल्या आहेत. दि.०६/०८/२००५ ते दि.३१/१०/२००५ अखेर तीन महिने करीता विमा, परिवहन टॅक्स, घसारा व दुरूस्ती, इंधन खर्च, कर्मचारी पगार व जमा झालेला सेवा आकार खालील प्रमाणे.

विमा, परिवहन टॅक्स, घसारा, इंधनखर्च, कर्मचारी पगार व जमा झालेला सेवा आकार प्रमाणे नफा-तोटा.

| **बसेस नंबर** | **विमा** | **परिवहन टॅक्स** | **घसारा व दुरूस्ती** | **इंधनखर्च** | **कर्मचारी पगार** | **एकूण खर्च रक्कम** | **जमा रक्कम** | **नफा रक्कम** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **७५९५** | २,९७३.०० | ३०,२२५.०० | १०,७५५.०० | ७१,१७७.०० | ५७,६००.०० | १,७२,७३०.०० | १,८१,९००.०० | **९,१७०.००** |
| **९३७१** | ६,६५५.०० | ४७,०२५.०० | १९,३२६.०० | ७७,५५२.०० | ५७,६००.०० | २,०८,१६८.०० | २,१९,७२५.०० | **११,५५७.००** |
| **एकूण** | ९,६२८.०० | ७७,२५०.०० | ३०,०८१.०० | १,४८,७२९.०० | १,१५,२००.०० | ३,८०,८९८.०० | ४,०१,६२५०० | **२०,७२७.००** |

**तसेच आसन क्षमता अनुक्रमे ३७/५७ अशी असून गर्दीचे प्रमाणात श्री साईभक्त संख्या असते, आसन क्षमतेचा विचार घेता नफा-तोटा खालील प्रमाणे असेल.**

| **आसन क्षमतेनुसार नफा-तोटा** | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **बसेस नंबर** | **आसन क्षमता** | **दि.०६/०८/२००५ ते ३१/१०/२००५** | **दर** | **आवश्यक रक्कम** | **प्रत्यक्ष जमा रक्कम** | **नफा** | **तोटा** |
| **७५९५** | ३७ | ८६ दिवस | २५/- | १,५९,१००.०० | १,८१,९००.०० | २२,८००.०० | - |
| **९३७१** | ५७ | ८६ दिवस | २५/- | २,४५,१००.०० | २,१९,७२५.०० | - | २५,३७५.०० |

नगरसुल रेल्वेस्टेशन करीता कायम दोन बसेस नफा-तोटयाचा विचार न करता श्री साई भक्तांचे सोयी करीता चालू ठेवावयाच्या आहेत. नगरसुलसाठी वापरात येत असलेली एक स्कूल बस व एक भक्तनिवासस्थानकडील बस त्यांना आवश्यकता असल्याने पर देऊन नवीन दोन बसेस खरेदी कराव्या लागतील. या कामी अंदाजे रू.२५ ते ३० लाख खर्च अपेक्षीत असून सदरच्या बसेस टाटा कंपनीच्या अधिकृत डिलर कडून कोटेशन्स मागवून खरेदी करण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**निर्णय क्र.४७** **ब)(०१)** मा. व्यवस्थापन समितीचे दि. १७.११.२००४ च्या सभेतील निर्णय क्र. ११० अन्वये १२ वाहनांचा जाहिर लिलाव करणेस तसेच लिलावाने वाहने विक्री केल्यानंतर संस्थानचे दैनंदिन वापराकरीता नविन ०७ वाहने खरेदीस रु. २०,५०,०००/- चे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार वाहने लिलावाकामी सदर प्रस्ताव शासनाकडे मान्यते करीता पाठविलेला आहे. परंतु शासनाची अद्याप मान्यता आलेली नाही.

कचरावाहतूक व शववाहिनी टाटा- ४०७ या दोन मालवाहू गाडया फारच जुन्या झालेल्या आहेत. वारंवार दुरुस्ती करावी लागते, त्यामुळे तातडीने दोन गाडया खरेदी करणे आवश्यक आहे. दि. २९.०१.२००५ चे सभेतील न्यूनतम निविदाधारक मे. शुभयन मोटर्स, अ. नगर यांना दूरध्वनीवरुन पुन्हा विचारणा केली असता त्यावेळी देय केलेल्या सवलतीच्या दरात गाडया दयावयास तयार नाहीत. त्यावेळचे मूळ दराने गाडया देणेत येतील, असे सांगितले. त्यावेळी डिस्काऊंट वजा जाता त्या गाडया खरेदीस एकूण रक्कम रु. १२,४०,०००/- येणार होता. ऐवजी आता एकूण खर्च रु. १३,००,३००/- येईल म्हणजेच रु. ६०,३००/- खर्च जास्त येणार आहे.

तरी शुभायन मोटर्स, अ. नगर यांच्याकडून वाहने खरेदी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, कचरावाहतूक व शववाहिनी टाटा-४०७ या दोन मालवाहू गाडया निविदासादरकर्त्यांनी दिलेल्या वरील मुळ दरात खरेदी न करता टाटा कंपनीच्या अधिकृत डिलरकडून नव्याने कोटेशन्स मागवून खरेदी करण्यात याव्यात याकामी येणाऱ्या योग्य त्या खर्चास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**ब (०२)** सध्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडीचे वाहन विभागात कार्यालयीन वापराकरीता खालील प्रमाणे वाहने आहेत.

| अ.न. | तपशिल | नग |
|---|---|---|
| ०१ | ॲम्बेसॅडर कार | ०४ |
| ०२ | टाटा सुमो | ०२ |
| ०३ | हुन्डाई ॲसेंट | ०१ |
| ०४ | महिंद्रा बोलेरो | ०१ |
| ०५ | महिंद्रा स्कॉर्पिओ | ०१ |
| ०६ | टाटा इंडिगो | ०१ |
| | एकूण | १० |

उपरोक्त वाहना पैकी ॲम्बेसॅडर कार-०२, टाटा सुमो-०१, हुन्डाई ॲसेंट-०१ अशी एकूण ०४ वाहने जुनी असल्याने सदर वाहनांचा जाहिर लिलाव करणेचा प्रस्ताव शासनमान्यतेकरीता पाठविण्यात आलेला आहे. तो विचाराधिन आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता मिळाले नंतर कार्यालयीन वापराकरीता खालील प्रमाणे वाहने शिल्लक राहतील.

| अ.नं. | वाहन प्रकार | नग | वाहन क्रं. | खरेदी साल | वापर कि.मी. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | टाटा इंडिगो- | ०१ | टी-१००० | २००५ | ४०,००० |
| ०२ | ॲम्बेसॅडर कार | ०१ | टी-६०१ | २००५ | ५२,००० |
| ०३ | महिंद्रा स्कॉर्पिओ | ०१ | एन-३०१ | २००२ | १,४६,००० |
| ०४ | ॲम्बेसॅडर कार | ०१ | एच-८०१ | २००० | १,५०,००० |
| ०५ | टाटा सुमो | ०१ | के-१८०१ | २००२ | १,८३,००० |
| ०६ | महिंद्रा बोलेरो | ०१ | एच-११०१ | २००० | २,३६,००० |
| | **एकूण** | ०६ | | | |

एकूण १० वाहनांपैकी ०४ वाहनांचा जाहिर लिलाव झाले नंतर वरील प्रमाणे ०६ वाहने शिल्लक राहतील. त्यामुळे कार्यालयीन वापराकरीता वाहने अपुरी पडणार आहेत.

शिल्लक असलेली ०६ वाहने ही मा.विश्वस्त, अधिकारी यांना संस्थान कामा करीता वापरात आहे. सदर वाहने ही संस्थान कामाकरिता मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर इ. ठिकाणी कायम पाठवावी लागतात. त्यातील काही वाहनांचा जास्त प्रमाणात वापर झाल्यामुळे प्रवासात अचानक बंद पडतात. त्यामुळे कामात खोळंबा व अडचणी निर्माण होतात. त्याकरीता नवीन वाहने खरेदी करणे आवश्यक आहे. याबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक ०५.११.२००५ चे सभेतील निर्णय क्र. ७२६ अन्वये महिंद्रा स्कॉर्पिओ गाडी घेण्यास मान्यता देण्यात आलेली आहे तथापि महिंद्रा स्कॉर्पिओ ऐवजी इनोव्हा गाडी खरेदी करण्यात यावी याकरीता कंपनीचे अधिकृत विक्रत्यांकडून दरपत्रके मागविण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-वाहन विभागप्रमुख)

**विषय नं.४८. शोभेच्या कुंड्या खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.४८.** श्री साईबाबा हॉस्पिटलचे नव्याने काम चालू आहे. त्याच्या सुशोभिकरणासाठी फूलांची व शोभेची झाडे ठेवण्यासाठी कुंड्या तयार करावयाच्या आहेत. हॉस्पिटलसाठी स्वतंत्र ५०० नग कुंड्या घ्यावयाच्या आहेत.

सिंटेक्स कंपनीच्या कुंड्या वाहतूकीला व दिसायला व झाडे वाढण्यास चांगल्या आहेत. व त्या दीर्घकाळ सुध्दा टिकतात. आपल्याकडे सिंटेक्सच्या कुंड्या असल्यामूळे त्याचा अनुभव आहे.
सिंटेक्स कंपनीच्या षटकोनी आकाराच्या कुंड्या ३८५ मी.मी. व्यासाच्या व ३१० मी.मी. उंचीच्या (मध्यम साईज) ५०० नग कुंड्या कोटेशन्स मागवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये ८०,०००.०० मात्रचे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,खरेदी विभाग/बगीचा विभागप्रमुख)

**विषय नं.४९. गादी खोळ, बेडशिट व उशी कव्हर यासाठी कापड खरेदीबाबत.**

**निर्णय क्र.४९.** चौकशी व निवासस्थान विभागामार्फत श्री साईभक्तांचे सेवेकरीता प्रत्येक रुम मध्ये बेडशिट, उशी,गादी पुरविण्यात येत असतात. सदरच्या गादया , बेडशिट, उशी कव्हर हे अंदाजे ४ ते ५ वर्षा

पासून वापरात आहे. सततचे वापरामुळे, वारंवार धुवून त्याची झिज झाल्याने कापड जीर्ण होत आलेले असल्याने जुने गादी खोळ कापड,बेडशिट,उशी कव्हर बदलणे गरजेचे आहे.

उपरोक्त प्रमाणे गादी खोळ , बेडशिट, उशी कव्हर साठी खालील नमूद केले प्रमाणे कापड खरेदी करावे लागेल .

| अ.नं. | कापड तपशिल | एकूण मिटर | अंदाजे दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| ०१. | गादी खोळ कापड,<br>२००० नगासाठी , एका खोळीकरीता २.५ मिटर, ७२ इंच पन्हा | ५००० | ७५.०० | ३,७५,०००.०० |
| ०२. | बेडशिट प्रिंटेड कापड<br>३५०० नगाकरीता, ६० इंच पन्हा | ९००० | ६०.०० | ५,४०,०००.०० |
| ०३. | उशी कव्हर कापड,<br>१००० नगा करीता- ६० इंच पन्हा | ५०० | ७५.०० | ३७,५००.०० |
| | | | एकूण रु. | **९,५२,५००.००** |

तरी उपरोक्त नमूद कापड विहीत पध्दतीने खरेदीस व शिलाई कोटेशन्स मागवून करुन घेण्यास व त्याकामी येणारे अंदाजे रु. ९,५२,५००/- चे खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-चौकशी व निवासस्थान विभागप्रमुख)

**विषय नं.५०. माहिती तंत्रज्ञान विभागाकडील तांत्रिक कामकाजासाठी "मानद स्थानिक तांत्रिक सल्लागार" म्हणून विजय नायडू, कोपरगांव यांचे नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.५०.** (अ)कार्यालयीन संगणकीकरण व नियोजित रुग्णालयांच्या संगणकीकरणाचे काम प्रगतीपथावर आहे. या संगणकीकरणांच्या प्रकल्पांसाठी वेळोवेळी संगणकीय यंत्रसामुग्री खरेदी करणे, संगणकीय कार्यप्रणाली विकसित करणे आदि कामे पार पाडावी लागतात. ही कामे सुरळीतपणे होण्याच्या दृष्टीने संस्थानमधील संगणकीकरणासंबंधित प्राप्त परिस्थितीची संपूर्ण माहिती असणारे तांत्रिक अर्हता उपलब्ध असलेले मनुष्यबळ संस्थान आस्थापनेकडे खूपच कमी आहे. तसेच संगणक क्षेत्रातील बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या संगणकीय उत्पादनांची माहिती व दर्जा आपल्याकडे त्वरीत उपलब्ध होत नाही. यादृष्टीने संगणकीकरणाचे प्रकल्प व्यवस्थितरित्या कार्यान्वीत व्हावे म्हणून प्रकल्पाची कार्यवाही सुरु असतांना तसेच आवश्यक तेथे तांत्रिक सल्ला-तथा-अभिप्राय तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने, विशेषतः संगणकीय कार्यप्रणालींचे झपाटयाने होत असलेले अद्ययावतीकरण, बाजारातील उपलब्धता व गुणवत्तेबाबत सखोल ज्ञान असणारा आणि विश्वासू व प्रामाणिक अशा साईभक्त-स्थानिक सल्लागाराची गरज असल्याने, मा.व्यवस्थापन मंडळ सभा दिनांक ०४ जानेवारी,२००४ मधील निर्णय क्रमांक ३२ नुसार, श्री.विजय पंढरीनाथ नायडू, कोपरगांव यांची स्थानिक पातळीवरील मानद तांत्रिक सल्लागार म्हणून दोन वर्षासाठी नेमणूक करण्यात यावी, तसेच श्री.विजय नायडू यांना रुपये ३०००/- मात्र प्रतीमाह एवढे नाममात्र मानधन देण्यात यावे असा निर्णय झालेला होता. त्यानुसार श्री.नायडू यांची या मानद स्थानिक तांत्रिक सल्लागार पदावर दोन वर्षासाठी नेमणूक करण्यात आलेली होती. ही नेमणूकीची मुदत दिनांक ०३ जानेवारी,२००६ रोजी संपलेली आहे.

(ब)श्री.विजय नायडू, कोपरगांव हे संस्थानला मागील १५ वर्षापासून संस्थानमधील संगणकीकरणाचे कामामध्ये व संबंधीत यंत्रसामुग्रीच्या दुरुस्ती-देखभालीसाठी तांत्रिक सल्ला व सक्रीय सहकार्य देत आहेत. श्री.विजय नायडू स्वतः व त्यांचे कुंटुंबिय हे निस्सीम साईभक्त असलेने आतापर्यन्त त्यांनी सदरील काम विनामूल्य केलेले आहे. संस्थानमधील संगणकीकरणाबाबत आतापर्यन्त आलेल्या दैनंदिन व विशेष प्रसंगी आलेल्या अडचणी/समस्या सोडविण्यासाठी बाहेरील कोणत्याही तांत्रिक संस्था / व्यक्तींच्या सेवा सर्वसाधारणपणे विकत घेतलेल्या नसून, आत्तापर्यन्त आलेल्या अडचणी तसेच कार्यालयीन संगणकीकरण प्रकल्पासाठी श्री.नायडू यांनी तत्परतेने मदत केलेली आहे. त्यामुळे संस्थान व्यवस्थापनाची मोठया प्रमाणावर आर्थिक बचत झालेली आहे. श्री. विजय नायडू हे श्री साईंचे निस्सीम भक्त असल्याने त्यांना देऊ केलेले मानधन त्यांनी न स्वीकारता संस्थानला विनामोबदला सेवा पुरविल्या आहेत.

उपरोक्त परिच्छेदांमधील विवेचनानुसार, श्री.विजय नायडू, कोपरगांव यांच्या "मानद स्थानिक तांत्रिक सल्लागार " म्हणून नेमणूकीस माहे जानेवारी,२००६ पासून पुढील दोन वर्षासाठी मुदत वाढ देण्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.५१. माहिती तंत्रज्ञान विभागाकडील "तंत्रज्ञ" या पदावर करण्यात आलेल्या मानधन तत्वावरील तात्पूरत्या स्वरुपाच्या नेमणूकीस मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.५१.** (अ) मा. व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०६ ऑगष्ट,२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ४२६ अन्वये,ई-टेम्पल अंतर्गत कार्यालयाचे आर्थिक व्यवहारासंबंधी कामकाजाचे संगणकीकरण

करण्यासाठी, आयआयएमव्ही,पुणे यांचेकडून तयार करण्यात आलेल्या संगणक आज्ञावलींमध्ये, भविष्यात वेळोवेळी अपरिहार्यपणे कराव्या लागणाऱ्या बदलांसाठी (adjustments), व्यवस्थापनाच्या बदलत्या व वाढत्या गरजांनुसार आवश्यक ते फेरफार (Modifications) करणेसाठी व विस्तारासाठी (enhancement) सदरील आज्ञावलींची दुरुस्ती-देखभाल करणेकामी, श्री. प्रसाद नारायण जोशी यांची तात्पुरत्या स्वरुपात तंत्रज्ञ म्हणून एकत्रितरित्या रुपये ७,०००/- मात्र या मानधनावर दिनांक ०१ सप्टेंबर,२००५ पासून पुढील सहा महिन्यांसाठी नेमणूक करण्यात यावी, असा निर्णय झालेला आहे. या निर्णयानुसार प्रशासन शाखा आदेश क्र. २१९९ दिनांक २१ सप्टेंबर,२००५ नुसार श्री.जोशी यांची 'तंत्रज्ञ' म्हणून तात्पुरते स्वरुपात नेमणूक करण्यात आलेली आहे. श्री. जोशी यांची तात्पुरते नेमणूकीची मुदत दिनांक २८ फेब्रुवारी,२००६ अखेर संपत आहेत.

(ब) उपरोक्त निर्णयांस अनुसरुन, श्री.जोशी हे 'तंत्रज्ञ' म्हणून सध्या पगारबिल संगणक कार्यप्रणाली, आयआयएमव्ही,पुणे मार्फत कार्यान्वीत करण्यांत आलेल्या काऊंटर्सवरील इतर सर्व संगणक कार्यप्रणालीत आवश्यकतेनुसार अनुषंगिक फेरफार व बदल करणे, त्यांचा विस्तार करणे, भक्तांना माहितीसाठी टचस्क्रिन संगणक कार्यप्रणाली विस्तारीत करणे इत्यादी कामकाज करीत आहेत. श्री.जोशी हे त्यांचे कामकाज चांगल्याप्रकारे सांभाळीत आहेत. त्यांनी संस्थान कर्मचाऱ्यांचे परिपूर्ण पगारबीलाची संगणक कार्यप्रणाली स्वतंत्ररित्या जादा वेळ देऊन पूर्ण केली असून, त्याची प्रत्यक्ष चाचणी सुरु आहे. कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्यासाठी, तयार करण्यात आलेल्या विविध संगणक आज्ञावलींमध्ये, भविष्यात कराव्या लागणाऱ्या बदलांसाठी (adjustments), गरजेनुसार आवश्यक ते फेरफार (Modifications) करणेसाठी व आज्ञावलींच्या विस्तारासाठी (enhancement) तसेच संगणकीय जाळयाचे देखभाल दुरुस्तीसाठी (Network Maintainance) आपणांस या क्षेत्रातील अनुभवी तंत्रज्ञाची अत्यंत आवश्यकता आहे. सध्या आपणाकडे या क्षेत्रातील परिपूर्ण असा तंत्रज्ञ उपलब्ध नाही. श्री.जोशी हे सध्या त्यांचेवर सोपविण्यांत आलेले कामकाज अत्यंत चांगल्याप्रकारे सांभाळीत आहेत.

श्री. प्रसाद नारायण जोशी यांची मुदत दिनांक ०१ मार्च,२००६ पासून पुढे एक वर्षासाठी वाढविणेस व त्यांच्या मानधनात थोडी वाढ करुन त्यांना एकत्रितरित्या रुपये ८०००/- (अक्षरी रुपये आठ हजार मात्र ) या मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात 'तंत्रज्ञ' म्हणून नेमणूक देणेकामी मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी माहिती तंत्रज्ञान विभागाकडील "तंत्रज्ञ" या पदावर कायमस्वरुपी पात्र कर्मचाऱ्यांची नेमणूक होणेकामी वर्तमानपत्रात जाहिरात देऊन अर्ज मागविण्यात यावेत, असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.५२.** **प्रसादालयाकडील कांदा कापण्याचे मशिनमध्ये सुधारणा करणेबाबत.**

**निर्णय क्र.५२.** सध्या प्रसादालयामध्ये एक कांदा कापणेचे मशिन आहे. सदर मशिनला साधे लोखंडी ब्लेड बसविलेले आहे व सदर २ ब्लेडमध्ये अंतर जास्त आहे. लोखंडी ब्लेड असल्यामुळे पाण्याचे वापरामुळे सदरील ब्लेडला गंज येतो. अशा प्रकारे गंज आल्यामुळे आरोग्याचे दृष्टीने धोकादायक आहे. शिवाय २ ब्लेड मध्ये अंतर जास्त असल्याने पाहिजे त्या क्षमतेने कांदा कापणेचे काम होत नाही व काही वेळेस अखखे कांदे खाली पडतात.

वरील अडचणींचा विचार करता सदर संपूर्ण मशिन स्टेनलेस्टीलचे बनविणे आवश्यक आहे तसेच २ ब्लेड मधील अंतर कमी करणे गरजेचे आहे. सदरील मशिन दुरुस्तीचे काम हे औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात करता येईल. त्यासाठी आवश्यक असलेले मटेरीयलची पुर्व मंजूरी प्रसादालय विभागाने टिपणी दि.२०/१०/२००५ अन्वये रक्कम रु.२३,४५०/- घेतलेली आहे. त्याअन्वये सदरील पुर्व मंजूरी औद्योगिक प्रशिक्षण केंद्राकडे मटेरीयल खरेदीकामी व मशिन दुरुस्तीकामी देण्यात आली आहे.

त्यानुसार औद्योगिक प्रशिक्षण केंद्राने मटेरीयल खरेदीकामी सात पुरवठादारांकडून दरपत्रकांची मागणी केली होती. त्यापैकी पांच पुरवठादारांकडून दरपत्रके प्राप्त झाली होती. सदरील मटेरीयलचा खर्च हा जवळपास रक्कम रु.४५,०००/- इतका अपेक्षित असून, त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्य,आय.टी.आय)

**विषय नं.५३.** **गोदावरी खोरे दूध उत्पादक संघ लि.सहजानंदनगर, पो.शिंगणापूर ता.कोपरगांव यांना संस्थान परिसरात जागा देणे बाबत.**

**निर्णय क्र.५३.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा

**विषय नं.५४.** **श्री साईबाबा यांचे भक्तांचे समाधीजवळ दक्षिणा पेट्या बसविणे बाबत.**

**निर्णय क्र.५४.** संस्थानचे परिसरांत असलेल्या श्री साईबाबांचे भक्त श्री. भाऊ महाराज कुंभार, श्री तात्या पाटील कोते, श्री. अब्दूल बाबत, श्री नानावली बाबा यांच्या समाध्या आहेत. श्री साईबाबांचे समाधी मंदिरात दर्शनास

आलेले साईभक्त प्रस्तुतचे समाध्याचे दर्शनार्थ जात असतात. प्रस्तुतचे ठिकाणी दान पेटया ठेवण्याबाबत स्थानिक ग्रामस्थ, स्थानिक विश्वस्त व स्थानिक साईभक्त यांचेकडून सुचविणेत आले होते. त्याप्रमाणे सदरहू ठिकाणी दक्षिणा पेटया बसविणेस मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक २७/१२/२००४ चे सभेत मान्यता देण्यांत आलेली आहे. मात्र तूर्त प्रस्तूत ठिकाणी दान पेटया ठेवलेल्या नाहीत.

उपरोक्त समाध्यापैकी श्री. अब्दुलबाबांचे समाधी मधील जमा होणाऱ्या दानाचा फायदा अब्दुलबाबा चे वारस घेतात. ते संस्थानची दान पेटी तेथे ठेवू देत नाही अशी गोपनिय माहिती पोलीस स्टेशनला मिळाली असून व हिंदुत्ववादी संघटना, साईभक्तांनी केलेले दान संस्थानलाच मिळाले पाहिजे. हया मागणीसाठी भविष्यांत आदोंलनाची शक्यता आहे अशी पोलीस स्टेशनला माहिती मिळालेली आहे असे पोलीस स्टेशन यांनी दिलेल्या दिनांक १७/०८/२००५ चे पत्रात नमूद केले आहे. तसेच काही मुद्यावर माहिती विचारलेली आहे.

१) अब्दुलबाबांची समाधी सार्वजनिक आहे काय ?असल्यास मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे तशी नोंद आहे काय? तसेच समाधी संस्थानचे ताब्यात असल्यास त्यांची नोंद आहे काय? धर्मादाय आयुक्तांकडे तशी नोंद आहे काय ?

अब्दुलबाबांचे वारस श्री साईबाबा संस्थानला दान पेटी ठेवू देत नाही याचे कारण अशा आशयाचे सदरचे मुद्ये आहेत.

शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे कडील असलेल्या रेकॉर्डला श्री अब्दुलबाबा समाधीला संस्थानच्या नावाची नोंद आहे. तसेच हया मिळकतीस सिटी सर्व्हे नंबरला सुध्दा संस्थानची नोंद आहे. संस्थानने सर्व्हे नं १ क्षेत्र - ७० आर (१-२८-११) विकत घेतले त्या बाबतचा मा. धर्मादाय आयुक्त यांचेकडे चेंज रिपोर्ट दाखल केला होता तो मंजूर झाला आहे. संस्थानने हया समाधीचे नुतनीकरणही केले आहे हयावरुन श्री साईबाबा संस्थानची मालकी स्पष्ट होते.

याबाबत सदरच्या समाधीजवळ थांबणारे व स्वतःला वारस म्हणवून घेणारे यांचेकडून प्रकरणी काही विरोध होऊ नये. विरोध झाल्यास अथवा विरोध होऊ नये म्हणून वकीलांचे सल्ल्याने योग्य ती कायदेशीर कारवाई करणे (दावा दाखल करणे वा कॅव्हेट दाखल करणेसाठी) मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, मा.अध्यक्ष महोदय यांनी संबंधितांशी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५५.** **गुरुकृपा सेल्स, कोपरगांव यांना भक्तनिवास येथील (स्टॉल) साईगंगाची विक्री करणेकामी गाळयाचे भाड्याबाबत.**

**निर्णय क्र.५५.** सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा

**विषय नं.५६.** **नवीन भक्तनिवासस्थान इमारतीतील गाळयास लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर मुदतवाढ देणेबाबत श्री.संदीप अशोक जगधनी, श्रीरामपूर यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.५६.** नवीन भक्तनिवासस्थान इमारतीचे बाहेरील बाजूस असणाऱ्या गाळ्यांपैकी एक गाळा टेलिफोन सुविधेसाठी श्री.संदीप अशोक जगधने, श्रीरामपूर यांना "लिव्ह ॲण्ड लायन्सेन्स" पध्दतीने ११ महिन्यांचे मुदतीसाठी देण्यात आलेला आहे. सदर गाळयाच्या परवान्याची मुदत दिनांक ३१.१२.२००५ अखेर संपत आहे.

श्री.जगधने यांनी त्यांचे दिनांक १०.१२.२००५ चे पत्रान्वये दिवसेंदिवस मोबाईल सुविधा वाढत असल्याने व एसटीडीचे दर कमी होत असल्याने, व्यवसाय कमी होत आहे. या सर्व बाबींचा विचार करून पुढील मुदतवाढी करीता भाडेवाढ न करता सदरहू गाळयाच्या परवान्यास २४ महिने कालावधीसाठी मुदतवाढ पूर्वीचेच अटी व शर्तीवर मिळणेबाबत विनंती केली आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन, भक्तांना या सुविधेची आवश्यकता असल्याने परवाना फी रकमेत १०% वाढ करुन रुपये १,४३०.०० इतकी मात्र व मीटर रिडिंगप्रमाणे विद्युत बील वेगळे तसेच इतर अटी व शर्ती पुर्वीप्रमाणेच ठेवून ११ महिन्यांकरिता "लिव्ह ॲण्ड लायन्सेन्स" तत्वावर मुदतवाढ देण्यात यावी, असें ठरलें. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५७.** **आंध्र प्रदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळ, हैद्राबाद यांना बस तिकीट विक्रीसाठी जागा/गाळा देणेबाबत.**

**निर्णय क्र.५७.** श्री कोटा संजिवा रेड्डी, चेअरमन ए.पी.एस.आर.टी.सी., सिंकदराबाद यांनी दिनांक १७/१०/२००५ रोजीचे अर्जाने भक्तनिवासस्थान व साईबाबा संस्थान परिसरांत त्यांच्या बस प्रवाशांसाठी तिकीट विक्री करण्यासाठी जागा व त्यांच्या बस गाड्यांना संस्थान परिसरांत प्रवेश करणेस व प्रवाशांना चढण्या - उतरण्यासाठी परवानगी मागीतलेली आहे. साधारणतः १५००० साईभक्त दररोज आंध्र प्रदेशातून शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी येतात व त्यांच्या प्रवासासाठी आंध्र प्रदेश राज्य रोड ट्रांन्सपोर्ट कॉर्पोरेशन यांनी सदर सुविधा उपलब्ध करुन दिलेली आहे.आंध्र प्रदेशातून येणाऱ्या साईभक्तांना बसने शिर्डी ते हैद्राबाद असा प्रवास करणाऱ्या साईभक्तांसाठी प्रवास तिकीट मिळणेसाठी व बस मध्ये चढण्या

- उतरण्यासाठी योग्य व सुलभ पध्दतीने सोय होण्याचे दृष्टीने संस्थानचे भक्तनिवास स्थान व संस्थान परिसरांत अशा दोन ठिकाणी जागा मिळावी म्हणून विनंती केलेली आहे. व तेथे ए.पी.एस.आर.टी.सी. च्या बसेसला संस्थानचे उपरोक्त परिसरांत प्रवेश करणेसही परवानगी मिळावी म्हणून विनंती केलेली आहे.

सदर गाळयाचे डिपॉझीट व भाडे विचारात घेता आंध्रप्रदेश परिवहन महामंडळ, सिंकदराबाद यांना लिव्ह ॲन्ड लायसेन्स तत्वावर (APSRTC ) यांना एक गाळा ११ महिनेसाठी रुपये ७०००/- इतकी मासिक परवाना फी व मिटर रिडींगप्रमाणे येणारे विद्युत बील वेगळे तसेच सदरचे महामंडळ हे पर राज्यांतील असल्याने आपल्या गाळेची सुरक्षितता व हमी म्हणून प्रथमतः डिपॉझीट म्हणून १,००,०००/- आकारून देता येईल. तसेच सदर गाळेबाबत शर्ती व अटी इतर गाळेधारकांना लागू असलेल्या शर्ती व अटी यांना बंधनकारक राहतील.

उपरोक्त प्रमाणे आंध्र प्रदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिकंदराबाद यांना फक्त बुकींगची व्यवस्था करता येईल. त्यासाठी नवीन भक्त निवासस्थान ५०० रुम परिसरांत १ गाळा लिव्ह ॲण्ड लायसेन्स तत्वावर १२ महिन्या करीता वापरावयास देता येऊ शकतो.असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्याबाबत चर्चा झाली परंतू त्यांनी मागणी केल्या प्रमाणे त्यांच्या बसगाड्यांना नवीन भक्त निवासस्थान ५०० रुम्स परीसरांतील जागेत बस थांबण्यास व बसेसला आंत प्रवेश दिल्यास त्यांची बसगाड्यांची वर्दळ मोठ्या प्रमाणांत वाढून गर्दीच्या वेळी कोंडी होण्याची शक्यता आहे. ५०० रुम्स परिसरांत साई भक्तांचे खाजगी वाहनांची पार्कीगची सोय केलेली आहे. म्हणून तेथे भक्तांची मोठ्या प्रमाणांवर वर्दळ असते. सध्या आंध्र प्रदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळ (A.P.S.R.T.C.) यांचे तिकीट बुकींग ऑफीस महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे बस स्टॅंड परिसरांत चालू आहे. तेथे तिकीटे घेणे कामी साई भक्तांची गर्दी होवून भक्तांची रांग लागली आहे, असे दिसून येत नाही.

तरी नवीन भक्तनिवासस्थान ५०० रुम्स परिसरांत गाळा उपलब्धतेनुसार आंध्र प्रदेश राज्य मार्ग परिवहन महामंडळ, सिंकदराबाद यांना वरीलप्रमाणे ११ महिन्यांसाठी लिव्ह ॲण्ड लायसेंन्स तत्वावर परवाना देऊन तिकीट बुकींग साठी गाळा देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५८. श्री आय आर जोशी ॲण्ड कंपनी ॲडव्होकेट, सॉलीसिटर ॲण्ड नोटरी, मुंबई यांना संस्थान कामासाठी पॅनेलवर/ मानधनावर घेणे बाबत.**

**निर्णय क्र.५८.** श्री. आय आर जोशी ॲन्ड कंपनी, ॲडव्होकेट, सॉलीसिटर ॲन्ड नोटरी, मुंबई यांचे संदर्भ क्रमांक ७०४/०५ दिनांक १७/११/२००५ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास दिनांक ०६/१२/२००५ रोजी प्राप्त झालेले असून त्यात त्यांनी " संस्थानचे कोर्टकामाचे संदर्भात सेवाभावी सहयोग देणेची संधी मिळणेबाबत इच्छा व्यक्त केली आहे अर्जात त्यांचे बाबत माहिती सादर केली असून सदर माहिती थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

१) ते मुंबई हायकोर्टात आणि मुंबई येथील इतर न्यायालयांत सॉलिसिटर म्हणून प्रॅक्टीस करीत आहेत. त्यांची न्यायालयातील ४० वर्षाची प्रॅक्टीस असून गेली ३३ वर्षे आय.आर जोशी ॲन्ड कंपनी नावांने सॉलिसिटर फर्म चालवति आहेत.

२) ते १९७३ पासून श्री साईबाबांचा निस्सीम भक्त आहे. १९७३ मध्ये विलक्षण साक्षात्कार झाल्याने तेव्हांपासून सातत्याने ते श्री साईबाबांच्या आशिर्वादासाठी शिर्डीला आल्याशिवाय रहात नाहीत.

३) त्यांचा संस्थानचा कारभार कोर्ट रिसिव्हरचे ताब्यात असल्यापासूनचा संबंध असून त्यावेळचा सन्मा. विव्दान न्यायमूर्ती सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई श्री. मखीजा साहेब यांचेपुढे काही साईभक्तांच्या वतीने ॲडव्होकेट म्हणून हजर होऊन त्यांच्याकडून संस्थानची स्कीम मंजूर करून घेण्यामध्ये माझा सहभाग होता. त्या काळांत श्री सिताराम धानू चेअरमन व त्यांचे सहकारी यांचा कारभार अनेक वर्षे चालू होता.

४) त्यांनी अनेक दिवाणी दाव्यात हजर राहून ते चालविले आहेत. ते त्यांची सेवा श्री साईबाबांचे चरणी समर्पण भावनेने सादर स्वेच्छेने संस्थानच्या, ट्रस्टच्या कामकाजाच्या माध्यमांतून समर्पण करू इच्छितो.

५) संस्थानच्या कारभारात ते जी काही सेवा करू इच्छितात ती ते साईबाबांची मनोभावे करणार आहेत. तिला श्री साईबाबांची पाद्यपूजा समजेन . त्यांचा पत्राचा सन्माननीय विश्वस्तांनी सदभावनापूर्वक विचार करून त्यांना श्री साईबाबांचे चरणाची सेवा करण्याची संधी उपलब्ध करून दिल्यास ते मी माझे सदभाग्य समजेन !

श्री. आय. आर जोशी यांना यापूर्वीच्या संस्थानच्या कामकाजाची माहिती आहे. संस्थानचे कोर्टाचे कामकाज सेवाभावाने करण्याचे त्यांनी त्यांचे वरील पत्रात मान्य केले आहे.

वरील सर्व बाबींचा सर्व दृष्टीने विचार करुन त्यांना संस्थानच्या कोर्ट कामकाजाच्या दृष्टीने श्री. आय.आर जोशी, आय आर.जोशी ॲन्ड कंपनी,ॲडव्होकेट,सॉलिसिटर्स ॲन्ड नोटरी मुंबई यांना संस्थानचे पॅनलवर घेता येईल. ते संस्थानचे काम हे बाबांचे आपण होऊन केलेली सेवा म्हणून करणार असल्याचे त्यांनी त्यांचे पत्रात नमूद केले असले तरी त्यांचेकडे सोपविण्यात येणारे कामाचा मोबदला म्हणून नाममात्र किंवा कमीतकमी फी आकारणेत यावी असे त्यांना सूचित करून पॅनलवर घेता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी मा.विश्वस्त श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव यांनी साईभक्त ॲडव्होकेट श्री बी.एन.सापटनेकर , पुणे यांची संस्थान पॅनेलवर नेमणूक करण्यात यावी असे सूचित केले, त्याची नोंद घेण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**विषय नं.५९.** **कर्मचाऱ्यांचे आगमन-निर्गमन वेळेकरिता फिंगर प्रिंट सिस्टम (बायो मेट्रीक) इन्स्टॉल करणेकामी प्राप्त झालेल्या निविदांवर चर्चा/वाटाघाटीने निर्णय घेणेबाबत.**

**निर्णय क्र.५९.** संस्थानच्या कायम कर्मचा-यांचे कामावर आगमन-निर्गमनाचे नियंत्रण सध्या कार्ड पंचिंग सिस्टीम पध्दतीने करण्यात येत आहे.कर्मचा-यांच्या आगमन-निर्गमनाचे वेळेची नोंद करण्यासाठी सध्या प्रशासन शाखा,(शांतीनिवास इमारत),चौकशी व निवासस्थान कार्यालय,श्री साईबाबा भक्त निवासस्थान,श्री साईबाबा कन्या शाळा इमारत,व श्री साईनाथ रुग्णालय अशा पाच ठिकाणी इलेक्ट्रॉनीक कार्ड पंचिंग मशीन बसविण्यात आलेले आहेत.त्या प्रमाणे कार्ड पंच करतांना त्यावेळची नोंद संगणकामध्ये केली जाते. तथापि ब-याच वेळा कर्मचा-यांचे आगमन-निर्गमन वेळेची नोंद तंतोतंत व अचूक होत नसल्याचे दिसून आलेले आहे. म्हणून संस्थान कर्मचा-यांचे कामावर येण्याचे व जाण्याचे (आगमन-निर्गमन) वेळे बाबत नोंद ठेवण्यासाठी फिंगर प्रिन्ट सिस्टीम (बायोमेट्रिक) मशीन्स इंस्टॉल करण्यात यावी.व त्याकरीता फिंगर प्रिन्ट मशीन (बायोमेट्रिक) खरेदी करणे कामी नामांकीत कंपन्यांकडून कोटेशन मागविण्यात यावे असा मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेमध्ये निर्णय पारीत करणेत आलेला आहे.

संस्थान कर्मचा-यांचे कामावर आगमन-निर्गमन वेळेकरीता फिंगर प्रिन्ट सिस्टीम (बायोमेट्रिक) मशीन्स खरेदी करणे कामी माहे ऑक्टोबर २००५ मध्ये वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन कोटेशन्स/निविदा मागविणेत आल्या होत्या.त्यास अनुसरुन फिंगर प्रिन्ट सिस्टीम (बायोमेट्रिक) मशीन्स पुरविणे संदर्भात नामांकीत कंपन्यांकडुन एकूण २८ निविदा/कोटेशन्स प्राप्त झालेले आहेत. सदर २८ कोटेशन्स मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/१२/२००५ रोजीचे सभेपुढे उघडणेत आलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता आजचे सभेत सादर करण्यात आला तो खालीलप्रमाणे-

| अ.नं. | कंपनीचे नांव | निविदेत देऊ केलेले दर रुपये |
|---|---|---|
| १ | ॲक्सीस सॉफ्टवेअर प्रा.लि. पुणे. | २,८१३२०.०० |
| २ | ज्योती टेलीकॉम,नाशिक | ५,१४,७६८.०० |
| ३ | मे.सुदर्शन इलेक्ट्रॉनिक्स, पुणे. | २,९१,४५०.०० |
| ४ | वेस बायोमेट्रीक्स सिस्टिम्स् प्रा.लि. पुणे. | २,४५,५२०.०० |
| ५ | एक्स्ट्रीम सोलूशन्स, पुणे | ४,४१,६००.०० |
| ६ | एटरप्राईज सॉफ्टवेअर सोलुशन्स लॅब, बेंगलोर<br>FTA-4243<br>FTA-7272B | <br>१,६८,०००.००<br>२,२८,०००.०० |
| ७ | एम-टेक इनोव्हेशन प्रा.लि. पुणे | २,२७,५९४.०० |
| ८ | हिरल टेक्ट्रोनिक्स प्रा.लि. मुंबई | ३,४९,३०५.०० |
| ९ | अेलाकीटी टेक्नोलॉजीस प्रा.लि. मुंबई | ५,४१,३२०.०० |
| १० | स्वॅन इलेक्ट्रो मेक सिस्टीम्स्, नासिक<br>Biometric "Keri" Reader with card<br>Biometric "Keri" Reader without card | <br>८,४०,६००.००<br>४,५५,६००.०० |
| ११ | निर्मळ टेक्नॉलॉजिस, पुणे<br>बॅट एस-१००<br>टाईम स्क्रॅन व्ही-५०० | <br>३,२३,५१२.००<br>३,९६,६४५.०० |
| १२ | ओसीयानिक एंटरप्रायझेस, मुंबई. | २,६२,५०००.०० |
| १३ | झेनॉन सिंडीकेट, कोल्हापूर | ६,९२,५००.०० |
| १४ | डॅनलॉ टेक्नॉलॉजीस इंडिया लि. ठाणे, मुंबई | ५,७०,४००.०० |
| १५ | बार ट्रॉनिक्स इंडिया लिमिटेड, हैद्राबाद | .४,८२,७५६.०० |
| १६ | सिल्व्हर बाईट सोल्यूशन्स, मुंबई | ३,९०,०००.०० |
| १७ | स्नेहपद्मा सॉफ्टवेअर टेक्नॉलॉजीस प्रा.लि. पुणे | १,९८,०००.०० |
| १८ | प्रिंट इलेक्ट्रॉनिक्स इक्वीपमेंटस् प्रा.लि. वडाळा, मुंबई | ७,४०,७९०.०० |
| १९ | अमेक्स इन्फरमेशन टेक्नॉलॉजीस लि. अंधेरी (ई )मुंबई | १,३७,०४०.०० |

| | | |
|---|---|---|
| २० | गॅमा- सॉप्ट इन्फरमॅटीक्स प्रा.लि. बांद्रा (ई )मुंबई<br>FTA-7272<br>FBAC-8181 | <br>१,९०,०८०.००<br>२,०४,२४०.०० |
| २१ | इव्हीस्का इन्फोटेक प्रा.लि. अंधेरी (ई )मुंबई | २,५३,९२५.०० |
| २२ | फ्युजन टेक, बोरीवली (वेस्ट )मुंबई<br>FP-500<br>FP-1000 | <br>४,०२,१२५.००<br>४,६९,६२५.०० |
| २३ | ॲबाकस सॉप्टेक लिमिटेड,दिल्ली | ३,८५,५४०.०० |
| २४ | प्रतिभा इलेक्ट्रॉनिक्स प्रा.लिमिटेड, ठाणे, मुंबई.<br>फिंगर स्कॅन युनिट<br>फिंगर स्कॅन युनिट | <br>४,०१,०२५.००<br>३,८०,७७५.०० |
| २५ | कार्डकॉम (इं )प्रा.लि. मुंबई | ४,३८,९२५.०० |
| २६ | लॅबकॉल बायोमेट्रीक टेक्नॉलॉजीस प्रा.लि. हैद्राबाद | ---- |
| २७ | सिक्युरा सिस्टीम्स, ठाणे (वेस्ट ) | ३,७४,७५०.०० |
| २८ | झीकॉम इलेक्ट्रॉनिक सिक्युरिटी सिरिटीम लिमिटेड, बांद्रा (वेस्ट ), मुंबई<br>बीटी-८४३ Bio ॲण्ड स्मार्ट कार्ड (बायो मेट्रीक ॲक्सेस कंट्रोल सिस्टीम)<br>बायो मेट्रिक वुईथ कि पॅड | <br>५,४१,३८१.००<br>४,३४,१५८.०० |

उपरोक्त निविदाधारकांना आजचे सभेत समक्ष चर्चा /वाटाघाटीसाठी बोलविण्यात आले होते. या सर्व निविदासादरकर्त्यांना एकत्रित सभेपुढे बोलविण्यात येऊन त्यांना दिनांक ०७.०२.२००६ पर्यन्त सुधारित दर देणेबाबत सांगणेत आले.

या निविदाधारकांनी देऊ केलेल्या सुधारित दराचा तुलनात्मक तक्ता अभिप्रायासह व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा, असे ठरले. (कार्यवाही-कामगार अधिकारी)

**विषय नं.६०. ॲड.कुलदीप पाटील व ॲड.विनोद शहा, मुंबई यांची ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेबाबत.**

**निर्णय क्र.६०.** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडीचे कोपरगांव अहमदनगर व औरंगाबाद खंडपीठ येथे वेगवेगळया प्रकारची दिवाणी,फौजदारी,तसेच कामगार विषयक न्यायालयीन प्रकरणे चालू आहेत. सदर चे कामी मा.व्यवस्थापन मंडळाचे मान्यतेने खालील प्रमाणे ॲडव्होकेटस् च्या ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूका करण्यात आलेल्या आहेत.

**०१)कोपरगांव कोर्ट :-**सर्वश्री. पी.डी.गुजराथी, डी.डी.कुलकर्णी, डी.व्ही. वझे, जे.के.गोंदकर, रमेशचंद्र ठोळे, श्री. एस.एम.वाघ

**०२)अहमदनगर कोर्ट :-** सर्वश्री. अशोक पाटील, एन.जी.तांबोळी, ए.आर.गाडेकर

**०३)मुंबई हायकोर्ट (बेंच औरंगाबाद ) :-** सर्वश्री. आर.एन.धोर्डे, अनिल बजाज, विनायक होन, राजेंद्र रघुवंशी,नितीन भवर, बाबासाहेब वाघ

वरीलप्रमाणेच ॲड.राजेश वि नाईक मु.पो.लोणी ॲड.संदिप एकनाथ गोंदकर रा.शिरडी सध्या मु.औरंगाबाद व ॲड.बाळासाहेब वि. कोते,शिरडी यांनी ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक होणेकामी केलेले विनंती अर्ज मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर करण्यात आलेले आहेत.

आता, श्री.कुलदिप एस. पाटील ॲडव्होकेट हायकोर्ट रा.अंधेरी (इस्ट) मुंबई व श्री. विनोद शाह ॲडव्होकेट हायकोर्ट रा.फोर्ट मुंबई यांचीही वरील प्रमाणेच श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिरडी संबंधात हायकोर्ट मुंबई येथील न्यायालयीन दावे चालविणेकामी संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करता येईल असे मत आहे.

तरी श्री.कुलदिप एस. पाटील ॲडव्होकेट हायकोर्ट रा.अंधेरी (इस्ट) मुंबई व श्री. विनोद शाह ॲडव्होकेट हायकोर्ट रा.फोर्ट मुंबई यांची मुंबई हायकोर्टातील कामे पहाणेकामी ॲडव्होकेट पॅनेलवर नेमणूक करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.६१. संस्थान सेवेत असताना मयत झालेल्या संस्थान कर्मचाऱ्याच्या एका नातेवाईकास अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत घेणेबाबत.**

**निर्णय क्र.६१.** श्री विकास रामदास दिवटे (कै.रामदास बाबुराव दिवटे यांचा मुलगा) यांनी, त्यांचे वडिलांचे संस्थान सेवेत असताना दिनांक २६/१२/२००५ रोजी निधन झाल्याने त्यांचे कुटूंबावर मोठें आर्थिक संकट कोसळले असून, उदरनिर्वाहासाठी कोणतेही साधन नसलेने अनुकंपा कारणास्तव संस्थान सेवेत त्यांना घेणेबाबत विनंती केली आहे.

श्री विकास रामदास दिवटे, यांची जन्मतारीख दि.११/०७/१९८६ आहे व त्यांचे वय १९ वर्षे ६ महिने असून शिक्षण इ.८ वी पास असें आहे.

महाराष्ट्र शासन निर्णय क्र. अकंपा-१०००-प्र.क्र.२०/२०००,आठ, मंत्रालय, मुंबई-३२, दि.२८/०३/२००१ नुसार शासकीय सेवेत असतांना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्याच्या एका पात्र नातेवाईकास अनुकंपा कारणास्तव शासकीय सेवेमध्ये घेण्याची तरतूद आहे. त्यास अनुसरुन संस्थान

सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्याचे नातेवाईकास मानवतेच्या दृष्टीकोनातून अनुकंपा कारणास्तव संस्थानच्या नोकरीत घेण्यात येते.

या सर्व परिस्थितीचा विचार करता, श्री विकास रामदास दिवटे (कै.रामदास बाबुराव दिवटे यांचा मुलगा) यांना, वर्ग ४ चे कर्मचारी म्हणून, प्रस्थापित अटींनुसार (पहिल्या वर्षासाठी दरमहा रुपये २,०००/- एकत्रित नियत वेतनावर) संस्थान सेवेत घेण्यात यावे, असें ठरलें.

(कार्यवाही- आस्थापना प्रमुख)

**विषय नं.६२.** **श्री.लक्ष्मण सदाशिव चव्हाण,अधिक्षक (प्रत्यक्ष काम मुख्य रोखपाल) सध्या निलंबित व श्री.वसंत नाना जेजुरकर, वरिष्ठ लेखापाल यांना संस्थान सेवेत कायम करणेबाबत.**

**निर्णय क्र.६२.** श्री लक्ष्मण स.चव्हाण,अधिक्षक (प्रत्यक्ष काम रोखपाल लेखाशाखा) व श्री वसंत नाना जेजूरकर,वरिष्ठ लेखापाल यांचा एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधीमधील कामकाजाबाबत लेखाधिकारी यांचे प्रतिकुल अभिप्राय विचारात घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६/०८/२००५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४२९ (ब) नुसार त्यांचा एक वर्षाचा परिवीक्षाधीन कालावधी दि.०२/०८/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी (दि.०१/०२/२००६ अखेर) वाढविण्यात आलेला असून सदर सहा महिन्यांचे कालावधीची मुदत दि.०१/०२/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

आता,सदरचे वाढीव परिवीक्षाधीन कालावधीमध्ये श्री लक्ष्मण स.चव्हाण,अधिक्षक (प्रत्यक्ष काम रोखपाल लेखाशाखा) व श्री वसंत नाना जेजूरकर,वरिष्ठ लेखापाल यांचेबाबत मुख्यलेखाधिकारी यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत.

१.श्री लक्ष्मण सदाशिव चव्हाण :- श्री चव्हाण यांची वर्तणूक व कामात सुधारणा दिसत होती. परंतु स्वतःच्या महत्वाच्या जबाबदाऱ्या त्यांनी कंत्राटी कामगारावर सोपविल्याने कामकाजात अडचणी आल्या त्या वरीष्ठांपर्यंत,तात्काळ व खऱ्या गोष्टी आणलेल्या नाहीत.सध्या सेवानिलंबीत,कामगार विभागामार्फत विभागीय चौकशी चालू आहे.

२.श्री वसंत नाना जेजूरकर वरिष्ठ लेखापाल :- वर्तणूक व कामात सुधारणा आहे. ते हूकुमाप्रमाणे व योग्यरितीने काम करतात.या विभागामार्फत त्यांचेबाबत सध्या कोणतेही प्रकरणे चालू अथवा प्रस्तावित नाहीत. त्यांना संस्थान सेवेत कायम करण्यास हरकत नाही.

तसेच संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांनी,"श्री लक्ष्मण स.चव्हाण,अधिक्षक (मुख्य रोखपाल) हे सध्या सेवा निलंबीत आहेत.त्यांचा परिवीक्षाधीन कालावधी ते सेवानिलंबीत आहेत तोपर्यंत वा सहा महिने वाढवावा.तसेच श्री जेजूरकर यांना सेवेत कायम करणेस हरकत नाही."असे अभिप्राय दिलेले आहेत.

तरी मुख्यलेखाधिकारी व प्रशासकीय अधिकारी यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन,श्री लक्ष्मण स.चव्हाण,अधिक्षक (मुख्य रोखपाल) यांचा परिवीक्षाधीन कालावधी दि.०२/०१/२००६ पासून ते खाते चौकशीचा निर्णय होईपर्यंत वाढविणेस व निर्णयानंतर कायम करणेबाबत प्रस्ताव सादर करणेस तसेच श्री जेजूरकर यांना दि.०२/०१/२००६ पासून सेवेत कायम करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.६३.** **श्री.जगन्नाथ देवराम डांगे, डायलेसीस तंत्रज्ञ यांचे कंत्राटी पद्धतीच्या मुदतवाढीबाबत.**

**निर्णय क्र.६३.** श्री साईनाथ रुग्णालयाकरीता डायलेसिस मशिन खरेदी करण्याचे काम अंतिम टप्प्यात असल्यामुळे येणारी मशिनरी तपासून तीचे इन्स्टॉलेशन करणे याकामी अनुभवी डायलेसिस तंत्रज्ञ उपस्थित असणे आवश्यक असल्याने रुग्णालयाची तातडीची गरज व कामाची निकड लक्षात घेऊन श्री जगन्नाथ देवराम डांगे,यांची मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.३१/०७/२००४ रोजीचे सभेतील निर्णयानुसार प्रथम सहा महिन्यांसाठी दरमहा रु.५०००/- एकत्रीत मानधनावर डायलेसिस तंत्रज्ञ या पदावर तात्पुरती नेमणूक करण्यात आली होती.त्यानुसार सदरची मुदत संपल्यानंतर वैद्यकीय अधिक्षिका,रुग्णालय यांचे अभिप्राय व मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार श्री डांगे यांची डायलेसिस तंत्रज्ञ या पदाची मुदत दि.१६/०२/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आलेली होती सदरची मुदत संपुष्टात आल्यानंतर मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.०६/०८/२००५ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार त्यांची मुदत दि.१६/०८/२००५ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविण्यात आली असून सदरची मुदत दि.१५/०२/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

श्री जगन्नाथ देवराम डांगे,हे सध्या कार्यरत असलेल्या प्रयोगशाळेमध्ये तंत्रज्ञ म्हणून काम करीत आहेत.साईनाथ रुग्णालयाचे जुन्या इमारतीचे नुतनीकरण होऊन तेथे लवकरच सुपर स्पेशालिटी सेवाअंतर्गत रुग्णांना सिटी स्कॅन, कलर डॉपलर,डायलेसिस युनीट यासारख्या सुविधा पुरविण्यात येणार आहेत.सदर डायलेसिस युनिट करता एका डायलेसिस तंत्रज्ञाची आवश्यकता आहे.श्री डांगे यांची मुदत दि.१५/०२/२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

त्यामुळे सदर युनिट सुरु झाल्यानंतर डायलेसिससाठी येणाऱ्या रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून श्री डांगे यांची मुदत दि.१६/०२/२००६ पासून पुढे सहा महिन्यांसाठी वाढविणेबाबत वैद्यकीय अधिक्षिका, रुग्णालय यांनी अभिप्राय दिलेले आहेत.

"तसेच मुलाखतीद्वारे निवड झालेली आहे.कायम स्वरुपी नेमणूक व्हावी."असे मत वरिष्ठ प्रशासक, रुग्णालये यांनी दिलेले आहे.

"सध्या मुदतवाढ सहा महिने देण्यात यावी.शासनाकडून पॅटर्नला मान्यता मिळाल्यानंतर नियमीत नेमणूका देता येतील." असे मत प्रशासकीय अधिकारी (रुग्णालये) यांनी दिलेले आहेत.

वैद्यकीय अधिक्षिका रुग्णालय ,वरिष्ठ प्रशासक व प्रशासकीय अधिकारी (रुग्णालये) यांचे उपरोक्त अभिप्राय विचारात घेऊन श्री डांगे डायलेसिस तंत्रज्ञ यांची कंत्राटी पध्दतीची मुदत दि.१६/०२/२००६ पासून पुढे सहा महिन्यांसाठी किंवा रुग्णालय आकृतीबंधास शासनाची मान्यता मिळून सदरचे पदावर उमेदवारांची नेमणूक होईपर्यंत या दोहोंपैकी जे अगोदर घडेल त्या कालावधीसाठी प्रतिमहा रु.५०००/- एकत्रीत मानधनावर वाढविणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**विषय नं.६४.** **असिस्टंट टाऊन प्लॅनरची प्रतिनियुक्तीवर नियुक्ती करणेबाबत.**

**निर्णय क्र.६४.** मा. व्यवस्थापन समितीचे **दिनांक ६/८/२००५** रोजीचे सभेतील ठरावाप्रमाणे संस्थान साठी शिर्डी परिसरातील **५० एकर** जमीन खरेदी करणेचे दृष्टीने माहिती संकलीत करण्याचे काम चालू आहे. त्याच प्रमाणे शेती महामंडळाची उर्वरित **सुमारे २०० एकर** जमीन घेणे विचाराधीन आहे. तसेच सदर जमीनी नजिकच्या जमीनी पुढील विकासाचे दृष्टीने उपयोगी ठरतील या दृष्टीने संस्थान जमीनी घेणे बाबद प्रयत्नशील आहे.

सध्या बांधकाम विभागाकडून अशा जमीनींची पहाणी करणे,मोजमाप करणे, नकाशे बनविणे,जागेचा ताबा,जागेचे व्हॅल्युएशन करणे अशा प्रकारची कामे पाहिली जातात तर विधी विभागा मार्फत जमीनी बाबद **७/१२ उतारा** व फेरफार उतारा वकीलांचे मार्गदर्शन खरेदीखत नोंदणी करणे अशी कामे पाहीली जातात

पुढील विकासाच्या दृष्टीने जमीनी लवकरात लवकर प्राप्त होणेचे दृष्टीने अनेक कार्यालयांशी संपर्क येतो मात्र याकामी जमीनीची प्रत्यक्ष पहाणी करुन नकाशा काढणे, मोजणी करणे,व्हॅल्युएशन करणे, इ. बांधकाम विभागाशी संबंधीत व इतर कार्यालयीन पत्रव्यवहार पहाण्यासाठी टाऊन प्लॅनिंग कार्यालयाकडील अनुभवी,वरिष्ठ कर्मचाऱ्याची अवश्यकता आहे.

तरी कामाची सोय व आवश्यकता विचारात घेऊन **"असिस्टंट टाऊन प्लॅनर"** पदावर शासनाकडून प्रतिनियुक्तीने एक अधिकारी घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

याबाबत चर्चा होत असतांना याकामी मा.विश्वस्त श्री शैलेश श्रीहरी कुटे यांचे मार्गदर्शनानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी असे ठरले.

(कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना)

**विषय नं.६५.** **श्री संत ज्ञानेश्वर मंदिर ज्ञानेश्वर , नेवासा जि.अहमदनगर यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.६५.** मा. प्रा. ना. स. फरांदे, माजी सभापती ,महाराष्ट्र विधान परिषद, यांनी दिनांक ११/०१/२००६ चे पत्रान्वये "श्रीज्ञानेश्वरीची निर्मिती " आपल्याच जिल्हयातील नेवासा येथे झाली आहे. दि.०५/०३/९८ रोजी माझ्या अध्यक्षतेखाली शासनाने परिसर समिती गठीत केली. समितीने रुपये- ५ कोटी खर्चाचा विकास आराखडा तयार केला. त्यापैकी रुपये -१ कोटी जमा करण्याचे समितीने मान्य केलेले असून उरलेले रुपये ४ कोटी मदत शासनाने द्यावेत अशी मागणी केली. मा.मुख्यमंत्र्यांनी यास ताबडतोब मान्यता दिली.

आतापर्यत खासदार ,आमदार व विकास वैधानिक मंडळाकडुन ६९ लाख रुपये तसेच शासनाकडुन ८२ लाख रुपये मिळालेले असून रस्ता, घाट, स्वच्छता गृहे व परिसराच्या संरक्षण भिंतीचे काम पूर्ण झालेले आहे. शासनाकडून प्राप्त होणा-या निधीची गती अत्यंत मंद आहे. या योजनेतील भक्तनिवास, सभागृह व संग्रहालय, विद्यार्थी कक्ष इत्यादी मुख्य कामे व्हावयाची आहेत. श्री साईबाबा संस्थानने या विकासाच्या पवित्र कार्यास जोरदार आर्थिक हातभार लावावा ." अशी विनंती केलेली आहे.

आजचे सभेत मा. प्रा. ना. स. फरांदे, माजी सभापती ,महाराष्ट्र विधान परिषद, हे सभेस समक्ष उपस्थित होते. त्यांनी या प्रकल्पाबाबत सविस्तर माहिती सभेस दिली.

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री संत ज्ञानेश्वर मंदिर ज्ञानेश्वर , नेवासा जि.अहमदनगर यांचे विकास कामासाठी रुपये ५०,००,०००/- (अक्षरी रुपये पन्नास लाख मात्र ) आर्थिक मदत देण्यात यावी. याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-६/मुख्य लेखाधिकारी)

**विषय नं.६६. प.पू.स्वामी रामदेवजी महाराज शिबीर-२००५ साठी झालेल्या खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.६६.** दि.०३/०५/२००५ रोजीचे मुंबई येथील मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.३३ व निर्णय क्र. २०८ अन्वये मंजूर झालेनुसार प.पू.रामदेव महाराज यांचे निवासी योगसाधना व प्राणायाम शिबीर - २००५, शनिवार, दिनांक २६/११/२००५ ते शनिवार, दिनांक ०३/१२/२००५ अखेर न.भ.नि.स्थान जवळील मैदानावर शिबीर भरविण्यात आले होते. सदर शिबिराचा लाभ साधारणपणे १५५० निवासी शिबिरार्थी व ४००० अनिवासी शिबिरार्थींनी घेतला. यात भाग घेणारे शिबिरार्थी हे वेगवेगळ्या ठिकाणाहून आले होते. त्यांच्या निवास व भोजनांची व्यवस्था संस्थानमार्फत करण्यात आली होती. या शिबिरात भाग घेणा-या शिबिरार्थींची मोफत वैद्यकीय तपासणी करण्यात आली. सदरचे शिबिर रुग्णांना व शिबिरार्थींना फारच उपयुक्त असे ठरलेले असून आरोग्याच्यादृष्टीने फारच फायदेशीर ठरलेले असून ब-याचजणांनी त्यांचे अनुभव तेथे प्रत्यक्ष सांगितले. शिबिराचे ठिकाणी औषधे, सी.डी., पुस्तके इ.उपलब्ध करुन देण्यात आले होते. सदर शिबिरात संस्थानने विभागवार केलेल्या खर्चाची विगतवारी खालीलप्रमाणे -

| अ.नं. | तपशील | खर्च झालेली रक्कम |
|---|---|---|
| ०१. | कँटीन विभाग | रु. ००,५०,७४५.०० |
| ०२. | वाहन विभाग | रु. ००,२२,३२७.०० |
| ०३. | धर्मशाळा विभाग | रु. ००,१५,००१.०० |
| ०४. | प्रसादालय विभाग | रु. ०४,६५,०४०.०० |
| ०५. | जनसंपर्क कार्यालय | रु. ००,०६,०५७.०० |
| ०६. | विद्युत विभाग | रु. ०१,०७,२७२.०० |
| ०७. | ध्वनिक्षेपण विभाग | रु. ००,५२,५०३.०० |
| ०८. | जाहिरात - छपाई खर्च | रु. ००,४८,३२०.०० |
| ०९. | न.भ.नि. स्थान | रु. ०५,६५,४४८.०० |
| १०. | स्वच्छता विभाग | रु. ००,१८,८३९.०० |
| ११. | प्र.शाखा, वशी - ०५ | रु. ०१,६१,७६०.०० |
| १२. | मंदिर विभाग | रु. ००,०९,०१५.०० |
| १३. | आय.टी. विभाग | रु. ००,१२,५८९.०० |
| १४. | संरक्षण विभाग | रु. ०१,२४,२८७.०० |
| १५. | बगीचा विभाग | रु. ००,०६,०००.०० |
| १६. | चौकशी कार्यालय | रु. ००,२१,०६७.०० |
| १७. | रुग्णालय विभाग | रु. ००,२९,६३७.०० |
| १८. | कं.का.बील | रु. ०१,१७,८३८.०० |
| १९. | प्रवास बील (सभाकामकाज विभाग) | रु. ००,००,४६३.०० |
| | **एकूण रक्कम** | **रु. १८,३४,२०८.००** |

दि.०३/०५/२००५ रोजीचे मुंबई येथील मा.व्यवस्थापन समितीचे सभेत विषय क्र.३३ व निर्णय क्र. २०८ अन्वये प.पू.रामदेव महाराज यांचे निवासी योगसाधना व प्राणायाम शिबीर साठी रु. ३०,००,०००/- (अक्षरी रु.तीस लाख मात्र) चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्तप्रमाणे प.पू.रामदेवजी महाराज यांचे दि.२६/११/२००५ ते दि.०३/१२/२००५ अखेर झालेल्या योगसाधना व प्राणायाम शिबिरास संस्थानमार्फत प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष असा एकूण रु.१८,३४,२०८.०० (अक्षरी रु. अठरा लाख चौतीस हजार दोनशे आठ मात्र.) इतका खर्च आलेला असून सदरहू खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.६७. श्रीराम नवमी उत्सव-२००६ बाबत**

**निर्णय क्र.६७.** श्री क्षेत्र शिरडी येथे सालाबादप्रमाणे याही वर्षी श्रीरामनवमी उत्सव बुधवार दि. ०५.०४.२००६ ते शुक्रवार, दिनांक ०७.०४.२००६ असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे. या उत्सवासाठी प्रामुख्याने खालील गोष्टींची तयारी करावी लागेल, ज्यास मान्यता देण्यात आली व इतर अनुषंगिक निर्णय घेण्यात आले.

०१) उत्सव निमंत्रण पत्रिका-

भक्तमंडळाचे आश्रयदाते व आजीव सभासद यांना उत्सवाच्या निमंत्रण पत्रिका पाठवाव्या लागतात. अशा एकूण १.१५ लाख निमंत्रण पत्रिकांची छपाई करुन घेण्यात यावी. छपाई वेळेवर होऊन निमंत्रण पत्रिका पोष्टाने पुरेशा आगाऊ रवाना होतील, असे पहावे. तसेच नेहमीप्रमाणे **'न्यूज आयटेम'** (प्रेस नोट) म्हणून उत्सवासंबंधी वर्तमानपत्रातून प्रसिध्दी देण्यात यावी.

अ) कलाकार कार्यक्रम

निमंत्रित कलाकारांचे कार्यक्रम मिळण्याबाबत आलेली पत्रे मा.अध्यक्ष यांना दाखवून त्यांचे कार्यक्रम निश्चित करण्यात यावेत.

ब) कीर्तन कार्यक्रम-

परंपरेनुसार ''श्रीरामनवमी'' उत्सवातील कीर्तन कार्यक्रम ह.भ.प.दासगणू महाराज आश्रम, गोरटे यांनी नामनिर्देशित केलेले कीर्तनकार करीत असतात. त्यांचेकडून नामनिर्देशित करण्यात आलेल्या कीर्तनकारामार्फत कीर्तने व्हावीत.

०३) श्रीसाईसत्यव्रत (सत्यनारायण ) पूजा व अभिषेक पूजा

उत्सवकाळात तीनही दिवस श्रीसाईसत्यव्रत (सत्यनारायण) पूजा करण्यात याव्यात. मात्र अभिषेक पूजा ठेवू नयेत.

०४) अखंड पारायण व्यवस्था:-

उत्सव काळात दिनांक ५/०४/२००६ रोजी सकाळी ६.१५ वाजता श्रीद्वारकामाई मंदिरात श्रीसाईसत्‌चरित्राच्या अखंड पारायणास सुरुवात होईल. दिनांक ६.०४.२००६ रोजी सकाळी ५.४५ वाजता त्याची समाप्ती होईल. पहिले पाच अध्याय व्यवस्थापन मंडळाचे पाच मा.सभासद वाचतात व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक असे ४८ भक्त वाचतात. ईच्छुक भक्तांची नांवे दिनांक ४.०४.२००६ रोजी मंदीर कार्यालयात नोंदविली जावीत व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाची सोडत (''ड्रॉ'') काढून पारायणाकरीता नांवे निश्चित केली जावीत. पारायणात भाग घेणाऱ्या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात यावें.

या उत्सवात पोथी, वीणा, फोटो, अध्यायवाचन, रुद्राभिषेक व पाद्यपूजा इत्यादी कार्यक्रमात मा.विश्वस्त भाग घेतील. मुख्य दिवशी पाद्यपूजा मा.अध्यक्ष व एक मा.विश्वस्त हे करतील. मा.विश्वस्तांच्या या सर्व कार्यक्रमांतील सहभागाबाबत उचित निर्णय घेण्याचे अधिकार मा.अध्यक्ष यांना देण्यात आले.

०५) पालखी व रथ मिरवणूक

उत्सवाचे पहिले दिवशी दिनांक ५.०४.२००६ रोजी पालखीची मिरवणूक रात्रौ ९.१५ वाजता व दिनांक ६.०४.२००६ रोजी रथाची मिरवणूक सायंकाळी ४.४५ वाजता निघेल.

०६) कावडी व निशाणांची मिरवणूक

उत्सवाचे मुख्य दिवशी (दिनांक ६.०४.२००६ रोजी) कावडी व निशाणांची मिरवणूक निघेल. श्रीरामनवमीचे दिवशी परिसरातील गांवकरी व साईभक्त गोदावरी नदीचे पवित्र पाणी आणून श्रीसाईबाबांचे समाधीस मंगलस्नान घालतात. कावडी घेऊन येणारे गांवकरी व साईभक्तांना समाधीला पाणी घालण्याचा मान नेहमीप्रमाणे दिला जावा. कावडी धारकांना श्रीफळ व लहान मुलांना पेरु प्रसाद नेहमीप्रमाणे दिला जावा. सायंकाळी ४.०० वाजता निशाणांची मिरवणूक निघेल.

०७) विद्युत् रोषणाई

श्रीसमाधी मंदीर, श्रीव्दारकामाई, श्रीचावडी, श्रीगुरुस्थान व मंदीर परिसरात सोयीप्रमाणे विद्युत् रोषणाई करण्यात यावी. श्रीरामनवमी उत्सवात श्रीव्दारकामाई मंडळ, मुंबई हे विनामूल्य विद्युत् रोषणाई करीत असतात. त्याकरीता ट्रक भाडे व जाणे येण्याच्या खर्चाची रक्कम मागणी प्रमाणे त्यांना द्यावी. रोषणाईसाठी ते न आल्यास संस्थान मार्फत विद्युत् रोषणाई करण्यात यावी.

०८) संरक्षण व्यवस्था

उत्सवकाळात मंदीर परिसरात बंदोबस्त ठेवणेकामी संरक्षण विभागातर्फे आवश्यकतेनुसार ठेकेदारी पध्दतीने जादा रक्षक नेमण्यात यावेत. तसेच शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी पुरेसा बंदोबस्त ठेवण्याकामी मा.जिल्हा पोलिस अधिक्षक, अहमदनगर यांना विनंती करण्यात यावी.

०९) प्रसाद भोजन व्यवस्था

उत्सवकाळात प्रसादालयात मिष्टान्नासह रुपये ५.०० या नेहमीच्या दराने भक्तांना प्रसाद भोजन देण्यात यावे. मा.व्यवस्थापन समितीचे सदस्यांचे कुटूंबीय, नातेवाईक तसेच इतर सन्माननीय व्यक्तींसाठी प्रसाद भोजनाची स्वतंत्र व्यवस्था केली जाते. पोलीस कर्मचारी व उत्सवात मदतीस येणा-या व्यक्ती यांचीही प्रसाद भोजन व्यवस्था स्वतंत्र मंडप टाकून केली जाते.

उपरोक्तप्रमाणे सर्व व्यवस्था या वर्षीही करावी. साईभक्तांचे सोयीसाठी अन्नपाकिटे, चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादी कँटीनमध्ये २४ तास मिळण्याची सुविधा उपलब्ध असावी. तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद नेहमीचेच दराने देण्यात यावा. उत्सवकाळात लाडू प्रसाद विक्री दोन ते तीन ठिकाणी करावी.

उत्सवात साईभक्तांना मिष्टान्न म्हणून प्रथम दिवशी शिरा, मुख्य दिवशी जिलेबी व सांगता दिनी बुंदी मिष्टान्न म्हणून देण्यात यावेत.

१०) लिलाव-

श्रींना अर्पण झालेली वस्त्रे व इतर वस्तूंची जाहीर लिलावाने तीनही दिवस प्रसादरुपाने विक्री करण्यात यावी.

११) जादा कंत्राटी कर्मचारी

उत्सवाची पूर्वतयारी करणेकामी व उत्सव व्यवस्थित पार पाडण्याकरीता लागणारा जादा कर्मचारी वर्ग आवश्यकतेनुसार ज्या त्या खात्यात नेमण्यात यावा. याकामी मा.कार्यकारी अधिकारी यांनी विविध खात्याकडून आलेल्या मागणीची छाननी करुन योग्य तो आदेश पारित करावा.

१२) मंडप व कमानी-

उत्सवकाळात मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्तावित केलेप्रमाणे एकूण १० मंडप, कमानी व मंच (स्टेज) उभारण्यात यावेत. तसेच, प्रस्तावित केल्याप्रमाणे,त्यानंतरही उन्हाळ्यात साईभक्तांना त्रास होऊ नये या करीता पाच मंडप उभारण्यात यावेत. याकामी कोटेशन्स मागवून व तीं स्थानिक विश्वस्तांचे उपस्थितीत उघडून उचित निर्णय घेण्यात यावा.

१३) सर्वसाधारण व्यवस्था

नेहमीप्रमाणे भक्तांच्या स्वागताची व्यवस्था, मदत केंद्र, प्रथमोपचार केंद्र, निवास व्यवस्था, आरोग्य व्यवस्था इत्यादी व्यवस्था ठेवण्यात यावी. स्वयंसेवी म्हणून काम करु इच्छिणारे कर्मचारी व इतर व्यक्तींना नेहमीप्रमाणे संधी देण्यात यावी. देणगी स्वीकारणेकामी जादा काऊंटर्सची व्यवस्था करणेत यावी. निमंत्रित कलाकारांच्या भोजन, मानधन आदी व्यवस्थेबरोबरच त्यांच्या वास्तव्याची सोय एम.टी.डी.सी. अतिथीगृह अथवा संस्थानचे निवासस्थान यांत आवश्यकतेनुसार करणेत यावी.

१४) पालखी व्यवस्था

श्रीरामनवमी उत्सवात मुंबई तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणाऱ्या पालख्यांची विश्रामाची व्यवस्था लेंडीबाग, मंगलकार्यालय, साईउद्यान, धर्मशाळा आदी परिसरात करण्यात यावी व पालखी सोबत येणाऱ्या भक्तांची निवास व्यवस्था मंगलकार्यालय, साईउद्यान व धर्मशाळा इमारतीत करण्यात यावी. पालख्यांच्या स्वागतासाठी मा.विश्वस्तांची समिती असावी व या समितीने पालख्यांचे स्वागत करावे. त्याचप्रमाणे येणारें पालख्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था मागील श्रीरामनवमी उत्सवाप्रमाणे याही वर्षी सिन्नर ते शिरडी या रस्त्यावर करण्यात यावी. तसेच पालखीमध्ये येणाऱ्या साईभक्तांना उत्सवाचे पहिल्या दिवशी एक वेळचे प्रसादभोजन संस्थानमार्फत मोफत देण्यात यावे असे ठरले.

१५) भक्तांची निवास व्यवस्था

उपरोक्त व्यवस्था संस्थानचे साईप्रसाद नं.०१ व ०२, धर्मशाळा नं.०२ व भक्तनिवासस्थान या इमारतींमधून तसेच धर्मशाळा परिसरात स्वतंत्र मंडप टाकून करण्यात यावी.

१६) कुस्त्या हगामा

श्रीरामनवमी उत्सवात कुस्त्यांचा हगामा गावकऱ्यांमार्फत भरविण्यात येतो. याकामी संस्थान बिदागी म्हणून अधिकाधिक रुपये ५०,०००/- पर्यन्तच्या खर्चास मंजूरी देण्यात आली.

१७) पाणीपुरवठा-

पाटबंधारे खात्यास उत्सवकाळात कॅनॉल चालू ठेवणेबाबत विनंती करणेत यावी. तसेच पाणीपुरवठा व्यवस्थीत चालू राहील याची दक्षता घेणेत यावी.

१८) कार्यक्रमाची सांगता-

गोपाल काल्याचे कीर्तनाने उत्सवाची सांगता होईल. काल्याचे कीर्तन निमंत्रित कीर्तनकार करतील.

१९) खर्चाचे अंदाजपत्रक-

श्रीरामनवमी उत्सव इ.स. २००६ च्या खर्चाकरीता एकूण रुपये २९,००,०००/- एवढी आर्थिक तरतूद मान्य करण्यात आली. (कार्यवाही- मंदीर प्रमुख/वशी-०५)

**विषय नं.६८.** **नाताळ सुट्टीनिमित्त मंडप उभारणी खर्चाबाबत.**

**निर्णय क्र.६८.** सुमारे १०,००० साईभक्तांची निवासव्यवस्था होईल एवढी व्यवस्था संस्थानकडे आहे. नाताळ सुट्ट्यांचे कालावधीत शिरडी येथे साईभक्तांची गर्दी मोठया प्रमाणावर वाढू लागली. परिणामी संस्थानकडे असलेली निवासव्यवस्था अपुरी पडण्यासारखी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे ऐनवेळी श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय, संस्थानचे शैक्षणिक संकूल व कर्मचाऱ्यांची रिक्त निवासस्थाने या ठिकाणी साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात आली. सदरची व्यवस्था ही अपुरी पडल्याने ऐनवेळी मा.अध्यक्ष

साहेब यांचे तोंडी मान्यतेने **दि.२४/१२/२००५ ते दि.०२/०१/२००६** या कालावधीत खालील ठिकाणी भाडोत्री शामियाना कापडी मंडप जमिनीवरील बिछायतीसह उभारणी करुन भक्तांची निवासव्यवस्था करण्यात आलेली होती.

| अ.नं. | ठिकाण व तपशील. | कालावधी. | रक्कम रुपये. |
|---|---|---|---|
| १. | साईबाबा भक्तनिवासस्थान परिसर. १०० X ६० मोजमापाचा. | दि.२४/१२/२००५ ते दि.०२/०१/२००६ अखेर. | २४,०००-०० |
| २. | धर्मशाळा इमारत परिसर. १०० X ६० मोजमापाचा. | दि.२४/१२/२००५ ते दि.०२/०१/२००६ अखेर. | १६,३००-०० |
| ३. | श्री साईनाथ माध्यमिक विद्यालय. १०० X ४० मोजमापाचा. | दि.२४/१२/२००५ ते दि.०२/०१/२००६ अखेर. | १०,७००-०० |
| ४. | प्रसादालय परिसर. १) ४० X २६ या मोजमापाचे २ मंडप. २) ४५ X ३० या मोजमापाचा १ मंडप. ( पार्टीशियनसह) | १) दि.२३/१२/२००५ ते दि.०५/०१/२००६ अखेर. २) दि.३१/१२/२००५ ते दि.०३/०१/२००६ अखेर. | १९,७२०-०० |
| ५. | धर्मशाळा इमारत परिसर. १०० X ६० मोजमापाचा. | दि.२९/१२/२००५ ते दि.०१/०१/२००६ अखेर. | ६,५२०-०० |
| | | **एकूण रक्कम रुपये.** | **७७,२४०-००** |

उपरोक्तप्रमाणे साईभक्तांचे निवासव्यवस्थेसाठी ऐनवेळी शामियाना कापडी मंडप टाकून व्यवस्था केलेली आहे. त्यासाठी एकूण रु.**७७,२४०/-** ( अक्षरी रु.सत्त्यात्तर हजार,दोनशे चाळीस ) मात्र खर्च आला असून सदरहू कार्यवाहीस व झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.६९.** **नार्दन ब्रँच मित्र मंडळ, श्रीरामपूर यांना अखंड हरिनाम ज्ञानेश्वरी पारायण किर्तन सप्ताहास दैण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.६९.** नार्दन ब्रँच मित्र मंडळ, श्रीरामपूर यांनी मा.अध्यक्ष महोदय यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला आहे. त्याचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | नॉर्दन ब्रँच मित्र मंडळ, श्रीरामपूर | श्री हनुमान मंदिर, नॉर्दन ब्रँच, मोरगे वस्ती, श्रीरामपूर येथे अखंड हरिनाम ज्ञानेश्वरी पारायण कीर्तन सप्ताह (दि.२१/०१/२००६ ते दि.२८/०१/२००६) अखेर होणार आहे. | गहू - ५ क्विंटल, गूळ - ४०० किलो तूप डबे - १५ डबे तेल - १५ डबे तांदूळ - ५ क्विंटल - प्रमाणे शिधा मिळणेबाबत |

श्रीहनुमान मंदिर, नॉर्दन ब्रँच, मोरगे वस्ती, श्रीरामपूर येथे अखंड हरिनाम ज्ञानेश्वरी पारायण किर्तन सप्ताह सोहळा दि.२१/०१/२००६ ते दि.२८/०१/२००६ अखेर होणार असून कालाप्रसादाचे महाप्रसादाकामी या धार्मिक व सामाजिक कार्यक्रमासाठी संस्थानकडून रु.२५,०००/-(अक्षरी रु. पंचवीस हजार मात्र)पर्यंतचा शिधा स्वरुपात मदत मा.अध्यक्ष, यांचे मान्यतेने देणेत आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.७०.** **सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयास शिधा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.७०.** उपरोक्त विषयास अनुसरुन सर्व धर्मिय सामुदायिक विवाह सोहळा आयोजक श्री धनंजय शेळके पा.. व श्री ए पी श्रीवास्तव, शिरडी यांनी दि.२३/०१/२००६ रोजीचे पत्रात दि.१४/०२/२००६ रोजी विना मेमोरीयल प्रतिष्ठान, साईभक्त व शिरडी ग्रामस्थ यांनी १०१ वधुवरांचा विनामूल्य सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळा आयोजित केलेला असून या विवाहासाठी येणा-या व-हाळी मंडळी, प्रमुख पाहुणे व गांवकरी असे एकूण अंदाजे ३० ते ४० हजार लोक या सोहळयासाठी येणार असून त्यांची जेवणाची व्यवस्था करण्यात येणार आहे. दरवर्षी संस्थानमार्फत या विवाह सोहळयास शिध्याची मदत मिळत असते. तरी या कार्याकरीता श्री साईबाबा संस्थानमार्फत रु. १,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख मात्र)शिधा मिळावा अशी नम्र विनंती केलेली आहे.

यापुर्वी संस्थानमार्फत विवाह सोहळयाचे कार्यक्रमास रु.२५,०००/- पर्यंत हरभरा डाळ व साखर अशी वस्तुरुपाने मदत केलेली आहे. त्यानुसार सदर कार्यक्रमास रु.२५,०००/-पर्यंतचा शिधा वस्तुरुपात मदत करण्यास हरकत नाही असे नम्र मत आहे. सन २००५ मध्ये झालेल्या सदर संस्थेच्या सर्वधर्मिय सामुदायिक विवाह सोहळयास संस्थानमार्फत रु.२५,०००/- पर्यंतची शिधा स्वरुपातील मदत देण्यात आलेली आहे. तथापि, त्यांनी रु. १,००,०००/- (अक्षरी रु. एक लाख मात्र) पर्यंतचा शिधा मिळणेबाबत विनंती केलेली आहे. याबाबत धोरणात्मक निर्णय मा.व्यवस्थापन समितीचे सभेत होणे आवश्यक आहे, कारण अशाप्रकारे रु.एक लाखापर्यंतचा शिधा जर एका सामुदायिक विवाह सोहळयास दिल्यास इतरही म्हणजे श्री. कैलास बापू कोते, पाटील यांचे मार्फत होणा-या सामुदायिक विवाह

सोहळ्यासही तेवढ्याच रकमेची मदत करावी लागेल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानतर्फे शिरडी येथे दरवर्षी ५०१ सामुदायिक विवाह आयोजित करण्यात यावे या विवाह सोहळ्याची संपूर्ण जिल्हाभर प्रसिध्दी करण्यात यावी. तसेच शिर्डी येथे विविध संस्थांमार्फत आयोजित सामुदायिक विवाह सोहळ्यास संस्थानतर्फे वधु-वरास भांडी, कपडे, वस्तू वगैरे स्वरुपात मदत करण्यात यावी. तसेच संस्थानमार्फत शिधा स्वरुपात यापूढे मदत देण्यात येऊ नये, असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**विषय नं.७१. रोटरी आय केअर ट्रस्ट, संगमनेर, यांना मोतीबिंदू शिबीरासाठी आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.७१.** अध्यक्ष,रोटरी आय केअर ट्रस्ट,संगमनेर यांनी त्यांचे दि.२१/११/२००५ चे पत्रान्वये " आमची संस्था १९८६ पासून अंधत्व निवारणाचे काम करीत असून आतापर्यंत सुमारे ९५०० मोतीबिंदू शस्त्रक्रिया यशस्वीपणे केल्या आहेत लक्षावधी रुग्णांना मार्गदर्शन करुन औषधे दिली आहेत.

संस्थेने अंधत्व निवारणाच्या या कार्याचा एक भाग म्हणून " शिर्डी व शिर्डी आजुबाजूच्या परिसराकरीता मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर डिसेंबर-जानेवारी महिन्याचे दरम्यान आयोजित करणार आहेत. या शिबीरास रोटरी क्लब शिर्डी व राहाता यांचे सहाय्य मिळणार आहे. तरी या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करुन उदार अंतःकरणाने अर्थ सहाय्य करावे, " अशी विनंती केलेली आहे असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, रोटरी आय केअर, संगमनेर या संस्थेच्या सहकार्याने श्री साईबाबा संस्थानचे रुग्णालयात वेळोवेळी मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीर आयोजित करण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३/वैद्यकीय अधिक्षीका,रुग्णालय)

**विषय नं.७२. इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे टी.बी.सॅनेटोरियम, आरणगाव,ता.जि.अहमदनगर, या रुग्णालयास आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.७२.** उपरोक्त विषयांस अनुसरुन इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे अध्यक्ष,मा.जिल्हाधिकारी व सोसायटीचे सेक्रेटरी, डॉ.प्रकाश कांकरीया, यांनी त्यांचे दि.३०/०९/२००५ चे पत्रान्वये कळविले आहे की, "रेडक्रॉस या संस्थेने अरणगांव येथे टी.बी.रुग्णालयाच्या इमारतीचे नुतनीकरण व इतर विकास कामे करावयाचे ठरविले आहे. तरी श्री साईबाबा संस्थानतर्फे संस्थेस जास्तीतजास्त आर्थिक मदत मिळावी, " अशी विनंती केलेली आहे. तसेच मा.जिल्हाधिकारी यांनी दि.०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार समितीचे सभेचे वेळी मदत देणेबाबत मागणी केलेली असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, इंडियन रेडक्रॉस सोसायटीचे टी.बी.सॅनेटोरियम, अरणगाव, ता.जि.अहमदनगर या संस्थेस मा.डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर व मा.कार्यकारी अधिकारी यांनी समक्ष भेट देऊन आपला अहवाल व्यवस्थापन समितीचे पुढील सभेपूढे सादर करावा असे ठरले.

(प्रशासनशाखा-वशी-३)

**विषय नं.७३. राष्ट्रीय हिंदी सेवी संघ, इंदोर यांचे संमेलनासाठी रुम देणेबाबत.**

**निर्णय क्र.७३.** प्रा.दत्तात्रय मा.टिळेकर, इंदौर यांनी त्यांचे दिनांक १७.११.२००५ रोजीचे पत्रान्वये राष्ट्रीय हिंदी सेवी संघ इंदौर ही संस्था देशांतर्गत राष्ट्रीय एकात्मता स्थापना व्हावी, देश एकसंघ रहावा म्हणून हिंदी प्रचार-प्रसाराचे कार्य करते. सदर संस्थेस कुठल्याही प्रकारचे शासकीय अनुदान मिळत नाही. केवळ आपल्या सारख्या संस्थानच्या योगदानामुळे हे काम शक्य होते. दरवर्षी देशात कोणत्याही अहिंदी भाषी राज्यात हे संमेलन घेतले जाते. सदर वर्षी फेब्रुवारी शेवटच्या आठवड्यात किंवा मार्चच्या पहिल्या आठवड्यात हे संमेलन शिरडी येथे घेण्याचे नियोजन आहे. परंतू आपल्या मदतीशिवाय हे काम अशक्य आहे. संबध देशातून ३०० ते ३५० प्रतिनिधी उपस्थित रहाण्याची शक्यता आहे तरी सदर संमेलनासाठी योग्य ती मदत व सहकार्य करावे अशी विनंती केलेली आहे.

सदरचे अर्जावर मा.विश्वस्त डॉ.एकनाथ भागचंद गोंदकर यांनी राष्ट्रीय हिंदी सेवी महासंघाने ठेवलेल्या संमेलनाला त्यांना रहाण्याचे सोईबाबत अर्ज केला आहे. ३०० ते ३५० प्रतिनिधींची रहाण्याची व्यवस्था विनाशुल्क व्हावी अशी त्यांची अपेक्षा आहे. तरी व्यवस्थापन समितीमध्ये मंजूरी घेऊन रहाण्याची व्यवस्था विनाशुल्क करणेस हरकत नाही असा निर्देश दिलेला आहे.

तथापि सदरचे पत्रात संस्थानकडून त्यांना कोणती मदत हवी आहे याचा स्पष्ट उल्लेख नसलेमूळे श्री टिळेकर यांना दिनांक १८.०१.२००६ रोजी सायंकाळी दूरध्वनीवरुन सदर बाबत विचारण केली असता त्यांनी या संमेलनासाठी एकूण १५० व्यक्ती हजर रहाणार आहेत. त्यांचेसाठी धर्मशाळेतील एक डॉरमेटरी हॉल व पाच खोल्या निवासासाठी मोफत मिळाव्यात तसेच धर्मशाळेशेजारील पटांगणात पेंडालसाठी जागा विनाआकार वापरासाठी मिळावी एवढीच संस्थानकडून मदतीची अपेक्षा आहे असे सांगितले.

तसेच श्री टिळेकर यांनी त्यांचे दिनांक ३०.०१.२००६ रोजीचे अर्जान्वये केंद्रीय कार्यालयाकडून सर्व सदस्यांना सूचना देणे, सदस्यांना रेल्वे आरक्षण करणे इत्यादी बाबी वेळेत पूर्ण होणे शक्य

नसल्यामुळे अधिवेशनाच्या तारखांमध्ये बदल करण्यात आलेला आहे. सदरचे अधिवेशन हे मार्च महिन्याऐवजी दिनांक २३-२४-२५ जून २००६ रोजी भरविण्याचे निश्चित करण्यात आलेले आहे. अधिवेशनासाठी साधारणतः २०० सदस्य उपस्थित रहातील. याशिवाय ३० अतिमहत्वाच्या व्यक्तींचा त्यात समावेश आहे, असे असे कळविले आहे.

श्री टिळेकर यांनी उपरोक्त दोन्ही अर्जांमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांना दिनांक २३-२४-२५ जून २००६ रोजी २०० व्यक्तींची मोफत निवास व्यवस्था व पेंन्डालसाठी धर्मशाळेशेजारील पटांगणात विनाआकार जागा वापरासाठी देता येईल. याकामी संस्थानचा तीन दिवसासाठी प्रतिदिन रुपये १०००.०० याप्रमाणे एका हॉलचा होणार एकूण आकार रुपये ३०००.०० व पाच खोल्यांना तीन दिवसासाठी होणारा आकार रुपये १०००.०० याप्रमाणे रुपये ४०००.०० होणार आहे. त्यामध्ये सूट देऊन स्वच्छता आकार व गादी चादर पुरवठा आदि कंत्राटदारामार्फत असल्याने ती रक्कम राष्ट्रीय हिंदी सेवीसंघ,इंदौर यांना भरणेस सांगता येईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**विषय नं.७४. कनिष्ठ महाविद्यालयासाठी बेंचेस तयार करणेबाबत.**

**निर्णय क्र.७४.** श्रीसाईबाबा कनिष्ठ महाविद्यालयात सन २००५-०६ वर्षात इ.११ वी कला शाखेत ७८, विज्ञान शाखेत ८३ आणि वाणिज्य शाखेत ६४ असे एकूण सध्या २२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. पुढील वर्षी २००६-०७ मध्ये आणखी अंदाजे २५० विद्यार्थी वाढतील. या वाढीव विद्यार्थ्यांसाठी १२५ बेंचेसची आवश्यकता लागेल. सदरचे बेंचेस औद्योगिक प्रशिक्षण संस्थेकडून तयार करुन घेता येतील.

याबाबत औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्यांशी चर्चा केली असता त्यांनी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत चांगले आणि टिकाऊ बेंचेस तयार करता येतील असे सांगितले. सध्या औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत कनिष्ठ महाविद्यालयासाठी २००५-०६ करिता लागणारे ६० बेंचेस तयार करण्याचे काम सुरु केले आहे. सदरचे बेंचेस लोखंडी स्क्वेअर पाईप फ्रेम आणि लाकडी फळयांचे टॉप असे असतील.

एका बेंचकरिता रुपये २०००/- पर्यंत खर्च (मटेरियल कॉस्ट) येईल. पुढील वर्षी २००६-०७ मध्ये (जून,२००६मध्ये) कनिष्ठ महाविद्यालयासाठी लागणाऱ्या १२५ बेंचेस करिता रुपये २,५०,०००/- (अक्षरी रुपये दोन लक्ष पन्नास हजार मात्र) इतका खर्च अपेक्षित असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत बेंचेस तयार करण्यास, त्यासाठी लागणारे साहित्य प्रचलित पद्धतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये २,५०,०००/- चे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्राचार्या,कन्या विद्या मंदिर/प्राचार्य, आय.टी.आय)

**विषय नं.७५. श्रीसाईबाबा अध्यासन सल्लागार समिती स्थापन करणे बाबत.**

**निर्णय क्र.७५.** मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक २.१०.२००५ चे सभेतील निर्णय क्र.६३५ नुसार पुणे विद्यापीठात श्रीसाईबाबा अध्यासन सुरु करण्यासाठी सुरुवातीला पहिल्यावर्षी दहा लक्ष रुपये अनुदान रुपाने देण्यात यावेत आणि पुढील पाच वर्षे प्रतिवर्षी दहा लक्ष रुपये प्रमाणे अनुदान देण्यात यावे. असे एकूण ६० लक्ष रुपये या कामासाठी उपलब्ध होतील. या रकमेवरील व्याज आणि सुरुवातीच्या अनुदानापैकी काही रक्कम श्रीसाईबाबा अध्यासनाचे कार्यासाठी वापरण्यात येईल. नंतर फक्त व्याजावर श्रीसाईबाबा अध्यासनाचे कार्य चालेल असे ठरलेले आहे.

श्रीसाईबाबा अध्यासन सुरु करणेचे संदर्भात पुणे विद्यापीठाचे कुलगुरु मा.डॉ.अशोक कोळस्कर यांनी दिनांक २९.९.२००५ रोजी शिर्डी येथे भेट दिली आणि निवेदन सादर केलेले आहे.या निवेदनात-

"श्रीसाईबाबा संस्थान ट्रस्ट शिर्डी आणि पुणे विद्यापीठ यांचेत परस्पर सामंजस्य निवेदनपत्रिका (Memorandum of Understanding) तयार करता येईल. अध्यासन कार्यासाठी सल्लागार समितीची स्थापना करता येईल. सल्लागार समितीत संस्थानच्या समितीचे एक किंवा दोन सदस्य (विश्वस्त) आणि शैक्षणिक क्षेत्रातील तीन ते पाच व्यक्ती यांचा सदस्य म्हणून समावेश करता येईल." असे सुचविले आहे.

मा.कुलगुरुंचे निवेदनानुसार प्रथम श्रीसाईबाबा अध्यासन सल्लागार समिती स्थापन करुन सल्लागार समितीच्या सल्ल्याने परस्पर सामंजस्य निवेदनपत्रिका (Memorandum of Understanding) करणे. पुणे विद्यापीठाला मा.व्यवस्थापन समितीचे ठरावानुसार श्रीसाईबाबा अध्यासनाचे कार्यासाठी प्रतिवर्षी दहा लक्ष रुपये याप्रमाणे सहा वर्षांसाठी एकूण ६० लक्ष रुपये अनुदान रक्कम अदा करणे आणि अध्यासनाचे कार्यावर देखरेख ठेवणे याबाबतीत मदत होईल.

तरी श्रीसाईबाबा अध्यासन सल्लागार समिती या समितीत समावेश करावयाच्या संस्थानच्या व्यवस्थापन समितीतील मा.श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव व मा.श्री अशोक भिमाशंकर खांबेकर यांची निवड करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-प्राचार्या,कन्या विद्या मंदिर)

**यानंतर आयत्या वेळेच्या विषयावर चर्चा सुरु करणेत आली.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१.** **शिर्डी ते साकुरी रस्त्याचे डांबरीकरण करणेबाबत.**
**निर्णय क्र.७६.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०२.** **जनसंपर्क कार्यालयाचे पश्चिम बाजूस ऑनींग शेडची व्यवस्था करणेबाबत.**
**निर्णय क्र.७७.** जनसंपर्क कार्यालयाचे पश्चिम बाजूसही साईभक्तांकरीता दक्षिण बाजूप्रमाणे वेटींगसाठी ऑनींग शेडची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

जनसंपर्क कार्यालयाचे खोली क्र.०५ व ०६ चे दक्षिण बाजूस सावलीसाठी ऑनींग शेडची व्यवस्था मे.डेकोर फ्लेक्स, मुंबई या कंपनीमार्फत करण्यात आलेली आहे. सदर ठेकेदार मागील मंजूर दर रुपये १२५/- प्रती चौ.फुटाप्रमाणे सदरचे काम करुन देण्यास तयार आहेत. जनसंपर्क कार्यालयाच्या पश्चिम बाजूस (२०'x १०') चे ऑनिंग शेड बनविण्यासाठी खालीलप्रमाणे अंदाजे रुपये ३१,५००.०० खर्च अपेक्षित असून सदरहू काम पूर्वीचे मान्य दरात मे.डेकोर फ्लेक्स, मुंबई यांचेकडून करुन घेणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

| Sr. | Description | Qty | Rate | Amount |
|---|---|---|---|---|
| 01. | Providing water Proof and washable fabrics including fastening with alluminium arms, front channel gear box system m.s. bracket etc. complete | 200 sq. ft. | 125/- | 25000.00 |
| | | | Transportation | 3,500.00 |
| | | | Fixing & Labour charges | 3,000.00 |
| | | | Total | 31,500.00 |

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३.** **सेल काऊंटर मशिनसाठी लागणारे केमिकल्स खरेदी करणेबाबत.**
**निर्णय क्र.७८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०४.** **विजय मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्टच्या रुग्णालयाचे सामान दान स्वरुपात घेणेबाबत.**
**निर्णय क्र.७९.** मे.विजय स्टील कार्पोरेशन, मुंबई तर्फे विजय मेमोरिअल चॅरिटेबल ट्रस्ट या नावाने अजमेर येथे चालविण्यात येणारे रुग्णालय माहे सप्टेंबर,२००५ पासून बंद करण्यात आले आहे. तेथील चांगल्या स्थितीत असलेले सामान ते संस्थानला मोफत देणेस तयार असलेबाबत त्यांनी पत्र दिलेले आहे. सदर साहित्याची प्रत्यक्ष पहाणी करुन अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०५.** **श्री सुरेश एस रुंअिया रा.युनायटेड किंगडम यांचे २० लाखापर्यन्त रक्कम रुग्णालयास देणगी बाबत.**
**निर्णय क्र.८०.** युनायटेड किंगडम मधील एक भारतीय रहिवाशी श्री सुरेश एस रुंअिया यांनी भारतीय रुपयात रुपये २० लाख पर्यन्त रक्कम श्री साईबाबा संस्थान रुग्णालयास देण्याचा मानस व्यक्त केला आहे. त्या रकमेतून गरजू व गरीब रुग्णांसाठी एखादी आवश्यक वस्तू घ्यावी व त्यावर त्यांचे "माता व पिता यांचे स्मृती प्रित्यर्थ" असे लिहीले जावे असे सूचविले आहे.

त्यास अनुसरुन त्यांच्या नांवे आर्थो किंवा युरो सर्जरीसाठी लागणारे C-arm X-ray machine घेण्यात यावे हे अंदाजे रुपये २० लाखापर्यन्त मिळू शकेल किंवा आपण या अधीच खरेदी केलेल्या कार्डियॅक सर्जरी टेबलवर (किंमत रुपये २० लाख) किंवा Endoscopy surgical set पी (किंमत रुपये २० लाख ) त्यांच्या पालकांचे नांव दान स्वरुपात टाकता येऊ शकेल ज्या योगे त्यांची इच्छा पूर्ण होण्यास मदत होईल असा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-वरिष्ठ प्रशासक,रुग्णालये)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६.** **श्री साईदास मंडळ, पुणे यांचेमार्फत श्रींची व्दारकामाई व इतर ठिकाणी पितळी बार बसविणेबाबत.**

**निर्णय क्र.८१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०७.** **वेबसाईट कक्षासाठी तज्ञ सल्लागार नेमणेबाबत.**

**निर्णय क्र.८२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०८.** **नवीन ट्रॅक्टर खरेदी करणेबाबत.**

**निर्णय क्र.८३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०९.** **श्री संत आसाराम बापू यांच्या सत्संग कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र.८४.** प.पू.संत श्री आसारामजी बापू प्रेरीत योग वेदांत सेवा समिती व साधक परिवार, राहाता (शिर्डी) यांचे दि.२९/१२/२००५ रोजीचे पत्रान्वये मा.अध्यक्ष यांचेशी झालेल्या चर्चेनुसार प्रातःस्मरणीय संत श्री आसारामजी बापू यांचा सत्संग कार्यक्रम शिर्डी येथे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या माध्यमातून आयोजित करायचा असून सदरचा सत्संग ३-४ दिवसाचा असून त्यास खालीलप्रमाणे साधारणपणे अंदाजे कमीत कमी रु. १५ लाख इतका खर्च अपेक्षित आहे. तसेच या कार्यक्रम काळात सर्व साधक परिवार संस्थानचे नियोजनाअंतर्गत सेवेस तत्पर असलेबाबतही त्यांनी कळविले आहे. तसेच सदर कार्यक्रमास समितीचे साधक परिवाराचे वतीने रु.४ ते ५ लाख त्यात योगदान देण्यास तयार आहेत. सत्संगाची तारीख आश्रमामार्फत साधारणपणे फेब्रुवारीच्या दुस-या किंवा तिस-या आठवड्यात मिळणार असून त्यास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता

| अ.नं. | तपशील | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|
| ०१. | मंडप व्यवस्था | रु, ०५,००,०००.०० |
| ०२. | साऊंड व लाइटींग | रु. ०१,००,०००.०० |
| ०३. | पोष्टर्स व प्रचार | रु. ०१,००,०००.०० |
| ०४. | भोजन व्यवस्था | रु. ०२,००,०००.०० |
| ०५. | निवास व्यवस्था | रु. ०२,००,०००.०० |
| ०६. | ट्रान्स्पोर्ट व ट्रॅव्हलींग | रु. ०२,००,०००.०० |
| ०७. | इतर खर्च | रु. ०२,००,०००.०० |
| | एकूण अपेक्षीत खर्च | **रु. १५,००,०००.००** |

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान,शिर्डी अधिनियम २००४ कलम १७ (ड) व (ण) नुसार श्री संत आसारामजी बापू यांचे सत्संग कार्यक्रम संस्थानमार्फत शिर्डी येथे आयोजित करणेस व त्याकामी येणारे अंदाजे रक्कम रुपये १५ लाख पर्यन्तचे खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१०.** **अ) श्री क्षेत्र डिग्रज मालुंजे येथे होणारे अखंड हरिनाम सप्ताहास शिधा स्वरुपात मदत देणेबाबत.**
**ब) श्रीक्षेत्र मुठे वाडगाव,ता.श्रीरामपूर येथे होणाऱ्या ज्ञानेश्वरी पारायण सप्ताहास देण्यात आलेल्या शिध्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**निर्णय क्र.८५.अ)** श्री क्षेत्र डिंग्रस मालुंजा येथे दिनांक दि.२३/०२/२००६ ते दि.२७/०२/२००६ अखेर होणाऱ्या महाशिवरात्रीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहास शिधा स्वरुपात मदत मिळणेबाबत आयोजकांनी केलेली विनंती अमान्य करण्यात आली (कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी ५)

**निर्णय क्र.८५. ब)** खालील संस्थेने मा.अध्यक्ष महोदय यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत अर्ज केलेला होता. मा.अध्यक्ष महोदय यांचे मान्यतेने रुपये २५,०००.०० पर्यन्त शिधा स्वरुपात मदत देण्यात आलेली असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्यात आली

| अ.नं. | नांव व पत्ता | तपशील | मदतीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| ०१. | श्री विश्वनाथ मुठे, सदस्य, पारायण कमिटी, मुठेवाडगांव, ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर, | श्री क्षेत्र मुठेवाडगांव, ता.श्रीरामपूर, येथे होणा-या ज्ञानेश्वरी पारायण सप्ताह ( दि.२९/०१/२००६ ते दि. ०५/०२/२००६) अखेर होणार आहे. (कालाकीर्तन-महाप्रसादासाठी) | गहु, हरबरा, तुप, गोडतेल, शेंगदाणे, गुळ, इ. प्रमाणे शिधा मिळणेबाबत पत्र. |

(कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी ५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.११.** **अ) श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**ब) मा.ना.मुख्यमंत्री महोदयांनी पंढरपूर येथे दिनांक १८.०७.२००५ रोजी दिलेल्या आश्वासनाच्या कार्यवाहीबाबत.**

**निर्णय क्र.८६.** **अ)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**निर्णय क्र.८६.** **ब)** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलणेत आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१२.** **महाराष्ट्रातील अपंगांना तीन चाकी सायकल देणेबाबत.**

**निर्णय क्र.८७.** दिनांक २९.०१.२००६ चे दैनिक लोकमत मध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीमध्ये "महाराष्ट्र राज्यातील सर्व अपंगांना श्री साईबाबा संस्थानतर्फे मोफत तीन चाकी सायकलचे वाटप करण्यात येणार आहे" असे नमूद केलेले आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी अधिनियम २००४ कलम १७(ण) "मानव जातीचे कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये सहाय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल तसेच अधिनियम २००४ (सुधारीत अधिनियम) कलम २१(२) (दोन)अन्वये छाननी समितीच्या शिफारसीनुसार व राज्य शासनाच्या मान्यतेने अनुदान देण्याची तरतूद आहे". मात्र अद्याप छाननी समितीची स्थापना राज्य शासनाकडून झालेली नाही.

अपंगांना सायकल देणेबाबत शासनाचे समाज कल्याण खात्याकडे खालीलप्रमाणे नियमावली ठरविण्यात आलेली आहे.

०१) उत्पन्नाची मर्यादा मासिक रुपये १५०० /-पर्यन्त — १००% मदत
रुपये १५०१ ते २०००/- — ५०% मदत

०२) अर्जदाराचे वय १८ वर्षे पूर्ण असेल तर तीन चाकी सायकल मिळू शकेल

०३) एका पायाने अधू असणाऱ्या व्यक्तीस तीन चाकी सायकल दिली जात नाही.

०४) दोन्ही पाय निकामी झाले आहेत अशा व्यक्तीसच तीन चाकी सायकल दिली जाते.

०५) वैद्यकीय दाखला स्पष्ट पाहिजे तसा नसेल तर तसा तो अर्जास जोडला पाहिजे, त्यातून अपंगत्व स्पष्ट होईल.

यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानमार्फत अहमदनगर जिल्हयातील अपंगांना ३००० तीन चाकी सायकली देणेकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी व त्यासाठीची नियमावली तयार करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-प्रशासनशाखा वशी-३)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१३.** **संस्थान आस्थापनेतील अधिकारी आणि कर्मचारी यांना देण्यात येत असलेल्या मनुष्यबळ विकास प्रशिक्षण कार्यक्रमाबाबत.**

**निर्णय क्र.८८.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१४.** **संस्थानला अकुशल, कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पध्दतीने पुरविणारे लेबर व सिक्युरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे ठेकेदारीस / करारास मुदतवाढ देणेबाबत.**

**निर्णय क्र.८९.** संस्थानला कंत्राटी पद्धतीने अकुशल, कुशल कामगार पुरविण्यासाठी श्री.महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्यूरिटी (इं) लिमीटेड, नाशिक तसेच सुरक्षा कर्मचारी पुरविणेसाठी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा. लि.,मुंबई यांची दिनांक १.८.२००३ पासून नेमणूक करण्यात आलेली आहे. सदर लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांचे कराराचा/ठेकेदारीचा कालावधी दिनांक ३१.०७.२००४ अखेर संपुष्टात आल्यानंतर त्यांचे कराराची/ठेकेदारीची मूदत आहे त्याच अटी व शर्तीवर दिनांक १.०८.२००४ पासून दिनांक ३१.०१.२००६ अखेर पर्यंत वेळोवेळी वाढविण्यात आलेली आहे. संबंधीत लेबर व सिक्यूरिटी कॉन्ट्रॅक्टर्स यांची वाढीव मूदत दिनांक ३१.१.२००६ अखेर संपुष्टात येत आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) यांना पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी लागणारे अकुशल, कुशल व सुरक्षा कामगार कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांची/ठेकेदारांची नेमणूक करणेसाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सिलबंद निविदा मागविण्यात आल्या होत्या. सिलबंद निविदा फॉर्मस् विक्रीची मूदत दिनांक ६.६.२००५ पासून ते दिनांक १८.६.२००५ अखेर पर्यंत अशी होती. तसेच सिलबंद निविदा स्वीकारण्याची अंतिम मूदत दिनांक २०.६.२००५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत अशी होती.

त्यास अनुसरुन संस्थानमध्ये लागणारे अकुशल,कुशल व सुरक्षा कर्मचारी कंत्राटी पद्धतीने पुरविणेकामी मान्यता प्राप्त कंत्राटदारांकडून/ठेकेदारांकडून एकूण ४२ सिलबंद निविदा प्राप्त झालेल्या आहेत. सदर ४२ सिलबंद निविदा मा.व्यवस्थापन समितीचे दि.९.७.२००५ रोजीचे सभेपुढे उघडणेत

येऊन, त्यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन, निविदासादरकर्त्यांना चर्चा/वाटाघाटीसाठी दिनांक १४.८.२००५ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे उपस्थित राहणेकामी कळविणेत आले होते. त्याप्रमाणे सदर सभेमध्ये उपस्थित निविदाधारकांशी/ ठेकेदारांशी त्यांचे निविदांसंदर्भात चर्चा/वाटाघाटी करणेत येऊन पुढील एक वर्षाचे कालावधीसाठी संस्थानला कंत्राटी पद्धतीने अकुशल,कुशल कामगार पुरविणेकामी मे.बी.व्ही.जी.इंडिया लि.,पुणे व क्रिस्टल ट्रेडकॉम प्रा.लि.,मुंबई तसेच संस्थानला कंत्राटी पद्धतीने सुरक्षा कर्मचारी पुरविणेकामी मे.सुपर प्रोटेक्शन सिक्यूरिटी सर्व्हिसेस प्रा.लि.,मुंबई व शिवा इंडस्ट्रियल सिक्यूरिटी एजन्सी (गुजरात) प्रा.लि.,मुंबई यांच्या निविदा निर्णय क्र.४७० अन्वये मंजूर करण्यात आलेल्या आहेत. संबंधीत चार एजन्सीज यांना वर्क ऑर्डर देणे, लेबर लायसेन्सची पूर्तता करुन घेणे, करारनामा करुन घेणे इ.कार्यवाहीस सुमारे एक महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

याकरीता श्री महेंद्र मोहनीराज गंधे, अहमदनगर व बॉम्बे इंटेलिजन्स सिक्युरिटी (इं) लिमिटेड, नाशिक यांचे मार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी अकुशल/कुशल कामगारांच्या ठेकेदारीस /करारास तसेच मे.सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. मुंबई यांचेमार्फत पुरविण्यात येणाऱ्या कंत्राटी सुरक्षा कर्मचाऱ्यांच्या ठेकेदारीस /करारास सध्याच्या कंत्राटासंबधातील करारातील अटी व शर्तीसच अनुसरुन व त्याच अटी शर्तीचे अधीन राहून दिनांक ०१.०२.२००६ पासून पुढे एक महिना मुदतवाढ देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

याचवेळी व्यवस्थापन समितीचे दिनांक १४.०८.२००५ चे सभेतील निर्णय क्र.४७० अन्वये खालीलप्रमाणे मान्य करण्यात आलेल्या एजन्सीजला दिनांक ०१.०३.२००६ पासून कंत्राटी कर्मचारी पुरविणेबाबत आदेश देण्यात यावा असे ठरले.

**(अ) कुशल व अकुशल कंत्राटी कामगार-**

०१. बीव्हीजी इंडिया लिमिटेड,शिवाजीनगर, पुणे-५

०२. क्रिस्टाल ट्रेडकॉम प्रा.लि.,सायन, मुंबई-४०००२२

**(ब) सुरक्षा कंत्राटी कामगार -**

०१. सुपर प्रोटेक्शन सिक्युरिटी सर्व्हीसेस प्रा.लि. विलेपार्ले (प)मुंबई-४०००५६

०२. शिवा इंडस्ट्रियल सिक्युरिटी एजन्सी (गुज.)प्रा.लि.,कुर्ला (वेस्ट),मुंबई-४०००७०

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.१५.** **निश्चित मासिक वेतन (Fixed Pay) मंजूर होणेबाबत**
**निर्णय क्र.९०.** श्री.अजय शिवराम पांडे व इतर ४ कॉन्ट्रॅक्ट मार्फत काम करणारे इंजिनिअर्स यांनी दि.१४/०१/२००६ रोजी अर्ज करुन त्यात"आम्ही खालील स्वाक्षरी करणार अभियंते (स्थापत्य अभियांत्रिकी (D.C.E.) पदविकाधारक, श्री साईबाबा संस्थानचे बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता पदावर प्रासंगिक (कॉन्ट्रॅक्ट) पध्दतीने रु.१००/- प्रति दिन वेतनावर काम करीत आहोत.

सन १९९९ मध्ये तत्कालीन व्यवस्थापन मंडळाने मंदिर परिसर, धर्मशाळा, कर्मचारी निवासस्थाने, जनरल वॉर्ड ब्लड बॅंक, मध्यवर्ती भांडार इमारत, इत्यादी बांधकाम प्रकल्पाचे वेळी प्रासंगिक निकड म्हणून केलेल्या या तात्पुरत्या नेमणूका आज सात वर्षानंतरही त्याच पध्दतीने व त्याच वेतनावर अन्यायकारक पध्दतीने चालू आहेत. आम्हाला मिळणारे वेतन हे आमचे शिक्षण कामाचे स्वरुप कामाच्या वेळा जबाबदारी इत्यादी बाबींचा विचार करता अत्यंत तुटपूंजे आहे.

सध्या श्री साईबाबा संस्थानमार्फत नगर-मनमाड रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे, जिल्हा परिषद शाळा इमारत, वर्ग-४ कर्मचारी निवासस्थान बांधकाम करणे, पालखी रस्ता कॉंक्रीटीकरण करणे असे माठे प्रकल्प चालू आहेत. तसेच मंगल कार्यालय,नवीन भक्तनिवासस्थान,प्रसादालय इमारत बांधकामे व सेवाधाम इमारत नूतनीकरण शिरडी गांवातील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, तसेच डांबरीकरण करणे, संस्थानने खरेदी केलेल्या शेती महामंडळाचे जमिनीत रस्ता व इतर विकास कामे करणे, मध्यवर्ती भांडार अंतर्गत रस्ते विकसीत करणे, नगरपंचायत दुकानकेंद्रासमोर सुशोभित कारंजा करणे,साईभक्तांसाठी डॉरमेटरी हॉल तयार करणे, संस्थान इमारतीचे रंगकाम करणे, अशा अनेक मोठ्या प्रकल्पांची कामे प्रस्तावीत आहेत.

श्री साईबाबांच्या श्रध्दा सबुरी या वचनावर आमचा विश्वास आहे. याच विश्वासावर गेली सात वर्षे आम्ही संस्थानचे हित होईल या पध्दतीने वेळेचा विचार न करता काम करण्याचा प्रामाणिक पणा केलेला आहे. मिळणाऱ्या तुटपूंज्या पगारात काटकसरीने तडजोडीने सध्याच्या महागाईच्या काळात आमच्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करीत आहोत. आमच्यातील सर्वांनीच वयाची पस्तीसी पूर्ण केलेली आहे. आमची माहिती खालीप्रमाणे आहे.

| अ.नं. | नांव व पत्ता | जन्मतारीख | शैक्षणिका | एकूण अनुभव | संस्थानकडील अनुभव |
|---|---|---|---|---|---|
| १) | श्री. अजय शिवराम पांडे, पुणतांबा | ११/११/१९७३ | D.C.E. | ८ वर्षे | ७ वर्षे संस्थानकडे |
| २) | श्री. गिरीष एकनाथ चोळके,पुणतांबा | ०३/०९/१९६४ | D.C.E | १३ वर्षे | ७ वर्षे संस्थानकडे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३) | श्री. मधुकर परशराम गव्हाणे डो-हाळे | ०१/०६/१९६५ | D.C.E | १८ वर्षे | ६ वर्षे संस्थानकडे |
| ४) | श्री. गंगाधर शंकर जाधव, रुई | २४/०६/१९६७ | D.C.E | १८ वर्षे ,९ वर्षे | १.५ वर्षे संस्थानकडे |
| ५) | श्री. स्वप्नील बाबासाो गायकवाड, येसगांव | ०२/०७/१९८२ | D.C.E | एकूण १.५ वर्षे | ६ महिने संस्थानकडे |

तरी आमची पात्रता व अनुभव संस्थान मध्ये केलेली प्रामाणिक सेवा यांचा विचार करुन संस्थान मध्ये उपरोक्त प्रकल्पांसाठी नेमणूक करावयाच्या अभियंता पदासाठी आमचा विचार व्हावा अथवा आम्हाला किमान रु.९०००/- इतके निश्चित मासिक वेतन मिळावे, " अशी विनंती केली आहे. सदर अर्जावर "डॉक्टर्सला संस्थानमध्ये निश्चीत वेतनावर घेण्यात येते, ब-याच वर्षापासून हे अभियंते रोजंदारीवर इतर सर्वसाधारण कामगारांप्रमाणे काम करीत आहेत. वास्तवीक टेक्नीकल साईड करण्यात येणारे कामाचे स्वरुप व जबाबदारी बघता त्यांना निश्चितपणे वेतन देणे आवश्यक आहे. " असे अभिप्राय प्रशासकिय अधिकारी बांधकाम यांनी दिलेले आहेत.

तसेच " श्री.मधुकर परशराम गव्हाणे व इतर ४ स्थापत्य अभियांत्रिकी पदवीधारक हे सन १९९९ पासून संस्थानच्या बांधकाम विभागात कनिष्ठ अभियंता पदावर (कॉन्ट्रॅक्टर मार्फत ) रु. १००/- प्रतिदिनी मानधनावर कार्यरत आहेत. या सर्व स्थापत्य पदवीधारकांनी फिक्स मानधन मिळावे म्हणून विनंती केलेली आहे. सदर स्थापत्य पदवीधरकांचा फिक्स मानधनावर नियुक्तीबाबतचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे ठेवावा" असे अभिप्राय मा.उपाध्यक्ष श्री कोल्हे यांनी दिलेले आहेत. "तसेच मा.विश्वस्त डॉ.एकनाथ गोंदकर यांनी याबाबत दि.२८/०१/२००६ रोजी पत्र सादर करुन त्यात," मी आपणांस यापूर्वी संस्थानकडे कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या अभियंत्यांना निश्चित मासिक वेतन ( Fixed pay) मंजूर करणेबाबत कळविलेले होते.परंतु त्यावर अद्याप कार्यवाही न होता, संस्थानने नवीन प्रकल्पांसाठी अभियंते भरणेबाबत जाहीरात दिलेली आहे. यापूर्वी अनेकवेळा सांगूनही सदर अभियंत्याचे वेतन न वाढविता नवीन अभियंता भरतीसाठी जाहिरात देणे योग्य नाही. त्यामुळे गेली ७ वर्षापासून आपल्या संस्थानकडे अहोरात्र कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या अभियंत्यावर अन्याय होत आहे.तरी आपण सर्व प्रथम आपल्याकडे काम करीत असलेले कंत्राटी बांधकाम व तत्सम मेकॅनिकल अभियंत्याना जाहिरातीत दर्शविल्याप्रमाणे रु.९०००/- मात्र मासिक वेतनावर कायम करावे व नंतरच उर्वरीत पदे भरावीत." असे नमूद केलेले आहे.

तथापि,मा.विश्वस्त डॉ.गोंदकर साो.यांचे अभिप्रायात दर्शविलेली दि.२५/०१/२००६ अभियंता या पदाची देण्यात आलेली जाहीरात नवीन प्रसादालय बांधकाम पूर्ण होईपर्यंतचे (१५ महिने ) विशिष्ट कालावधीसाठी कंत्राटी पध्दतीने नेमणेकामी देण्यात आलेली आहे.

बांधकाम विभाग यांनी दि.१८/०१/२००६ रोजी टिपणी सादर करुन त्यात ," बांधकाम विभागामार्फत सध्या संस्थान इमारती दुरुस्ती देखभाल,जि.प.शाळा,नगर मनमाड रस्ता व इतर प्रस्तावीत रस्ते, तसेच रथ पालखी रस्ता व स.नं.१०७ कम्पाउंड भिंत,वर्ग-४ कर्मचारी निवासस्थान,भक्तनिवास इमारत,तसेच प्रसादालय इत्यादी कामे चालू असून बांधकाम विभागाकडे असलेले दोन कायम शाखा अभियंता काम करीत आहेत.तसेच सध्या बांधकाम विभागाकडे कंत्राटी म्हणून कार्यरत असलेले पाच कनिष्ट अभियंते यांची मासिक वेतनावर नेमणूक करण्यास हरकत नाही." तसेच "अर्जदार अभियंत्यांची कनिष्ठ अभियंता पदासाठी प्रसादालय इमारतीचे बांधकामावर नेमणूक करता येईल." अशी शिफारस केलेली आहे.

सार्वजनीक बांधकाम विभाग महाराष्ट्र राज्य शासनाकडे शाखा अभियंता या पदासाठी रु.६५००-१०५०० ही वेतनश्रेणी असून त्यानुसार एकूण पगार रु.११७९८/-व कनिष्ठ अभियंता या पदासाठी रु.५५००-९००० अशी वेतनश्रेणी निर्धारीत केलेली असून,त्यानुसार एकूण पगार रु.९९८३/- इतका आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम नं.१३ (०४) मध्ये

" ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून असे पद शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत केली जाणार नाही." अशी तरतूद आहे.

तरी उपरोक्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ चे कलम नं.१३ (०४) मधील कर्मचारी नेमणूकीबाबत तरतूदीस अनुसरुन व मा.उपाध्यक्ष तसेच मा.विश्वस्त डॉ.गोंदकर यांची शिफारस व उपमुख्य अभियंता यांनी संस्थानची चालू असलेली कामे व करावयाची कामे यासाठी त्यांच्या अभिप्रायामध्ये दर्शविलेली अत्यावश्यकता व तसेच प्रशासकीय अधिकारी बांधकाम यांचे अभिप्राय विचारात घेऊन सध्या लेबर कॉन्ट्रॅक्टर मार्फत संस्थानचे बांधकाम विभागाकडे काम करीत असलेले श्री. अजय शिवराम पांडे व इतर ४ (स्थापत्य अभियांत्रिकी पदवीकाधारक) यांना लेबर कॉन्ट्रॅक्टर यांचेमार्फत मासिक एकत्रीत ठराविक मानधनावर नेमणूक देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता. सदरहू याचवेळी प्रसादालय विभागाकडे व वाहन विभागाकडे सध्या कंत्राटी पध्दतीने कार्यरत असलेले अनुक्रमे सर्वश्री अमृत गंगाधर जगताप व अतुल एकनाथ वाघ यांचेबाबतही चर्चा झाली.

उपरोक्त कंत्राटी कर्मचाऱ्यांचे बाबतीत सविस्तर चर्चा होऊन, सध्या लेबर कॉन्ट्रॅक्टर मार्फत संस्थानचे बांधकाम विभागाकडील श्री. अजय शिवराम पांडे व इतर ४ स्थापत्य अभियांत्रिकी पदवीकाधारक तसेच प्रसादालय विभागाकडे सात वर्षापासून असलेले श्री अमृत गंगाधर जगताप व वाहन विभागाकडे तीन वर्षापासून असलेले श्री अतुल एकनाथ वाघ या दोन मॅकेनिकल अभियांत्रिकी पदवीकाधारक यांची संस्थान सेवेसाठी आवश्यकता असल्याने त्यांची दरमहा एकत्रीत रुपये ७,०००.०० या एकत्रित मानधनावर एक वर्ष कालावधीसाठी नेमणूक करण्यात यावी, असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१६.** **मा.अध्यक्ष, छाननी समिती यांचे मानधनाबाबत.**

**निर्णय क्र.९१.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१७.** **संस्थान ॲडव्होकेट पॅनेलवर नियुक्ती होणेबाबत ॲड.संजय इं.सलालकर व ॲड.प्रसन्ना अ. बिंगी यांचे अर्जाबाबत.**

**निर्णय क्र.९२.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१८.** **माधुरी, सोसायटी ऑफ हेल्पर्स ऑफ मेरी, आनंद विहार,पो.टिळकनगर वसतीगृहातील ४० मुलींना वर्षाकरिता शिधा मिळणेबाबत.**

**निर्णय क्र.९३.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.१९.** **श्री संत कवी महीपती महाराज देवस्थान ट्रस्ट,तहाराबाद यांना आर्थिक मदत देणेबाबत.**

**निर्णय क्र.९४.** सदरहू विषयावरील चर्चा पुढे ढकलण्यात आली.

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२०.** **शिधा सामुग्री मिळणेबाबत. (ह.भ.प.श्री.तनपूरे बाबा जन्मशताब्दी, स्वामी सहजानंद भारती आश्रम नाऊर, लघुरुद्र दिक्षा समारंभ व डांग जिल्ह्यातील पंपासरोवर येथे चार राज्यांचा शबरीकुंभ मेळावा )**

**निर्णय क्र.९५.** खालील संस्थेने मा.अध्यक्ष महोदय यांना श्री साईबाबा संस्थानमार्फत शिधा मदत मिळणेबाबत केलेली विनंती अमान्य करण्यात आली.

| अ.नं | संस्थेचे नांव व पत्ता | तपशिल |
|---|---|---|
| ०१. | श्री शब्बीर देशमुख, राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मु.पो.ता.राहूरी जि.अहमदनगर | राष्ट्रसंत ह.भ.प.श्री.तनपूरे बाबा जन्मशताब्दीनिमित्त दिनांक २५.०२.२००६ ते दिनांक २७.०२.२००६ अखेर कार्यक्रम श्री रोकडेश्वर बा.नांदूर ता.राहूरी येथे होणार आहे-अन्नदान |
| ०२. | श्री गोपीनाथ गंगाधर शिंदे, अध्यक्ष श्री विठ्ठल रुक्मिणी देव गोदावरी आश्रम मु.पो.नाऊर ता.श्रीरामपूर जि.अहमदनगर | स्वामी सहजानंद भारती गोदावरी आश्रम नाऊर येथे दिनांक १९.०२.२००६ ते दिनांक २१.०२.२००६ अखेर त्रिविनात्मक लघुरुद्र दिक्षा समारंभ -महाप्रसादासाठी |
| ०३. | वनवासी कल्याण आश्रम, व्दारा डॉ.प्रबोध जोशी, जोशी हॉस्पीटल,शिर्डी | डांग जिल्हयातील पंपासरोवर येथे चार राज्याचा वनवासी कार्यकर्त्यांचा शबरीकुंभ मेळावा दिनांक ११.०२.२००६ ते दिनांक १३.०२.२००६ -वस्तूरुपाने भरीव मदत मिळणेबाबत |

(कार्यवाही-प्रशासनशाखा-वशी ५)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२१.** **श्रीरामनवमी उत्सव-२००६ मध्ये समाधी मंदीरावर हेलिकॅप्टरने पुष्पवृष्टी करणेबाबत.**

**निर्णय क्र.९६.** ओ.एस.एस.एव्हिअेशन प्रा.लि. भोपाळ यांनी श्री रामनवमी उत्सव २००६ मध्ये श्रींचे समाधीमंदिरावर व सभोवताली पुष्पवृष्टी करणेबाबत दिनांक ०२.०२.२००६ चे फॅक्स पत्रान्वये (सदर फॅक्समध्ये ४ एप्रिल,२००६ अशी नियोजित तारीख लिहीलेली आहे) परंतू श्री रामनवमी उत्सव-२००६ दिनांक ५ एप्रिल,२००६ ते ०७ एप्रिल,२००६ या कालावधीत साजरा करण्यात येणार असून गुरुवार दिनांक ६ एप्रिल,२००६ हा मुख्य दिवस असल्याने या दिवशी दुपारी समाधी मंदिराचे कळसावर व सभोवताली हेलिकॅप्टरमधून पुष्पवृष्टी करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-जनसंपर्क अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२२.** **दिनांक १.२.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या निमगाव गट नं.८०,८५ मधील नियोजित प्रसादालय बांधकामाचे ठेकेदारांचे निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्त**

**निर्णय क्र.९७.** दिनांक ०१.०२.२००६ रोजी शिर्डी येथे झालेल्या निमगांव गट नं.८०,८५ मधील नियोजित प्रसादालय बांधकामाचे ठेकेदारांचे निविदापूर्व बैठकीचे इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या त्याची नोंद घेण्यात आली. या सभेत संस्थानचे निमगाव गट नं.८०,८५ मधील नियोजित प्रसादालय इमारत बांधकामाच्या कोऱ्या निविदा खरेदी केलेल्या एकूण ०६ ठेकेदारांना निविदापूर्व बैठकीसाठी बोलविण्यात आले होते. या बैठकीस खालील ठेकेदार उपस्थित होते.

| अ.नं. | ठेकेदाराचे नाव |
|---|---|
| ०१ | युनिटी इन्फ्रास्ट्रक्चर्स लि, मुंबई |
| ०२. | आय व्ही आर सी एल इन्फ्रास्ट्रक्चर्स ॲण्ड प्रोजेक्टस् लि,पुणे |
| ०३. | बी.जी. शिर्के, पुणे |
| ०४. | बी.ई. बिलोमोरीया ॲण्ड कं. लि., पुणे |
| ०५. | नॅशनल प्रोजेक्टस् कन्स्ट्रक्शन्स कार्पोरेशन लि., परळी वैजनाथ (बीड) |
| ०६. | शापूरजी पालोनजी ॲण्ड कं.प्रा.लि., मुंबई |

उपरोक्त ठेकेदारांनी चर्चेमध्ये जे मुद्दे उपस्थित केले. त्याबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ. नं. | **ठेकेदाराने उपस्थित केलेले मुददे** | **चर्चेत ठरलेले निर्णय** |
|---|---|---|
| ०१ | ठेकेदार यांनी इ.एम.डी.रक्कम व निविदा मंजूर झाल्यानंतर भरावयाची सुरक्षा ठेव डी.डी. ऐवजी बँक गॅरंटीचे स्वरुपात स्विकारावी, अशी विनंती केली. | निविदा शर्तीमध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर रक्कम डी.डी.चे स्वरुपातच संस्थानकडे जमा करावी, असे ठरले. |
| ०२ | मोठया स्वरुपाचे काम असल्याने सदर कामाचे कार्यादेशासोबत मोबीलायझेशन ॲडव्हान्स १०% मिळावा, अशी विनंती ठेकेदारांनी केली. | निविदा शर्तीमध्ये नमुद केल्याप्रमाणे मोबीलायझेशन ॲडव्हान्स देण्यात येणार नाही, असे ठरले. |
| ०३ | निविदा शर्तीनुसार किमान एक कोटी इतक्या रकमेचे कामाचे बील सादर करणे आवश्यक आहे. त्यामध्ये पहिले ०३ बील झालेल्या कामानुसार देणेबाबत नमुद केले आहे. | पहिल्या रनिंग बिलापासून किमान एक कोटीचे बील सादर करणे आवश्यक राहिल, असे ठरले. |
| ०४ | निविदा सादर करणेसाठी दि.१०/०२/२००६ अखेर मुदत देण्यात आली आहे. उपस्थित ठेकेदारांनी सदरची मुदतीत वाढ करुन मिळणेस विनंती केली. | दि.२०/०२/२००६ रोजी निविदा सादर करणेसाठी मुदत देण्यात आली. |
| ०५ | VAT करांबाबत | VAT कर कायद्यातील तरतुदीनुसार ठेकेदार यांचे बीलातुन at sourcे वजा करण्यात येईल. |
| ०६ | निविदा शर्तीमध्ये एक्स्ट्रा आयटेम करीता over head profits १५% नमुद केला आहे. त्याऐवजी २०% ते २५% करण्यात यावा, अशी विनंती ठेकेदारांनी केली. | निविदा मध्ये नमुद केल्याप्रमाणे over head profit १५% प्रमाणेच देण्यात येईल, असे ठरले. |

ठेकेदारांनी उपस्थित केलेल्या तांत्रिक मुददयांबाबत आर्किटेक्ट यांचे सल्ल्याने व वरील ०६ मुद्यांबाबतचे निर्णय ठेकेदारांना कळविण्यात यावे, असे ठरले.

(कार्यवाही-बांधकाम विभागप्रमुख)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२३. शिरडी नगर पंचायत शिरडी विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर ( पथकर) बाबत..**

**निर्णय क्र.९८.** श्री साईबाबांच्या दर्शनासाठी शिरडी येथे दररोज हजारोंच्या संख्येनें भक्त येत असतात. त्यातील बरेचशे साईभक्त स्वत:चे खाजगी वाहनाने प्रवास करतात. मात्र शिरडी येथे प्रवेश करण्यापूर्वी शहरातील दोनही बाजूस असलेल्या नाक्यांवर नगरपंचायतीमार्फत भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर ( पथकर ) वसूल केला जातो. मात्र साईबाबा संस्थानकडूनच अशा प्रकारचा कर वसूल केला जातो. असा साईभक्तांचा गैरसमज होतो. त्यामुळे भक्तांच्या भावना दुखावतात.

उपरोक्त बाबी विचारांत घेऊन शिरडी येथे साईबाबांच्या भक्तांची वाहने थांबवून त्यांचेकडून पथकर वसूल करण्यांत येऊ नये,अशी विनंती नगरपंचायतीकडे संस्थानचे पत्र क्र एसएसएस/वशी/ ०२/ १३२१०/२००४ दिनांक ३१/१२/२००४ चे पत्रान्वये करण्यात आली आहे. याबाबत शिरडी नगर पंचायत यांनी दिनांक ११/०७/२००५ चे पत्राअन्वये टोल नाक्यापासून प्रती वर्षी मिळणाऱ्या रक्कमे एवढी रक्कम त्यांना मिळावी, सन २००४-२००५ साली रुपये ४५,६१,९९०/- एवढी रक्कम त्यांना मिळाली, तेवढी रक्कम त्यांना प्रतिवर्षी मिळावी व प्रतिवर्षी त्यांत २० % वाढ करण्यात यावी, ५ वर्षाची आगाऊ रक्कम भरावी अशा आशयाचे पत्र इकडेस पाठविले आहे. संस्थानकडून निश्चित धोरण त्यांना कळविल्यास मंजूरीसाठी शासनास त्यांनाही प्रस्ताव पाठविता येईल असेही त्यांनी कळविले आहे. सदर प्रकरणी मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०६/०८/२००५ व दिनाक १८/०९/२००५ चे सभेत निर्णय क्रमांक ४३८ झालेला आहे, शिरडी नगरपंचायतीस निव्वळ येणारे उत्पन्न हिशोबी धरून त्याबाबतची माहिती प्राप्त करून घेऊन त्या आधारे निव्वळ येणारे उत्पन्नाचे अनुसंधाने अनुदान ठरवावे लागेल. असा प्रस्ताव दिांक १८/०९/२००५ चे सभेत मांडण्यात आला होता. त्याबाबत सविस्तर चर्चा होऊन विशेष स्वच्छता कर व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर बंद करणेसाठी नगरपंचायत शिरडी यांना द्यावयाचे अंशदानाबाबत प्रस्तावास तत्वत: मान्यता देण्यात आली. याकामी शिरडी नगरपंचायत यांना द्यावयाचे रक्कमेबाबत मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर व स्थानिक विश्वस्त यांचे संमतीने याबाबत अंतिम निर्णय घ्यावा, असे ठरले आहे.

उपरोक्त ठरावांस अनुसरून दिनांक ०१/१०/२००५ रोजीचे सल्लागार परिषद सभेत सदरचा विषय सादर करण्यात आला होता. त्यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावास खालील प्रमाणे तत्वतः मान्यता देण्यात आली आहे.

शिरडी येथे श्री साईबाबांचे दर्शनासाठी येणारे साईभक्तांकडून शिरडी नगरपंचायत यांनी विशेष स्वच्छता व आरोग्य प्रदूषण नियंत्रण कर आकारू नये, याकरिता शिरडी नगरपंचायत यांनी मागणी केलेली रक्कम प्रतीवर्षी रुपये ३९,६१,९९०/- पुर्णांकित रक्कम रुपये ४०,००,०००/- ( अक्षरी रुपये चाळीस लाख मात्र ) प्रती तीन महिन्यास रुपये १०,००,०००/- ( अक्षरी रुपये - दहा लाख मात्र ) याप्रमाणे आगाऊ रक्कम शिरडी नगर पंचायतीस देण्यात यावी, असे मा. जिल्हाधिकारी अहमदनगर यांनी सांगितले. सर्वानुमते त्यास मान्यता देण्यात आली. सदरहू विषय मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निणयार्थ सादर करावा, त्यानंतर याकामी शासनाची मान्यता घेण्यात यावी. शासनाचे मान्यतेनंतर पुढील कार्यवाही करणेत येईल असे ठरले. यांस दि. ०५/११/२००५ च्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्रमाक ६५१ (६) अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था शिरडी अधिनियम - २००४ चे कलम २१ ( २ ) (सी ) चा विचार करता नगरपंचायत शिरडीस अनुदान देणेबाबत शासनाची पूर्व परवानगी घेणे जरुरीचे आहे. व त्याप्रमाणे संस्थानने जा. क्र १३०५४ दिनांक ०९/११/२००५ चे शासनाची परवानगी मिळणेबाबत प्रस्ताव सादर केला आहे. अद्याप सदर परवानगी प्राप्त होणेवर आहे.

दिनांक १०/१२/२००५ रोजी मा. श्री कैलास बापू कोते पाटील, अध्यक्ष , शिरडी - नगरपंचायत यांनी नगरपंचायतीचे टोलानाका बंद केला असून संस्थानने त्याबाबत रक्कम अदा करावी अशी तोंडी विनंती केलेली आहे. त्याबाबत शासनाकडे टोलनाका रक्कम नगरपालिकेस देणेबाबतचे मंजूरीसाठी प्रस्ताव सादर केला असल्याचे सांगितले आहे.

याबाबत

१) मा. अध्यक्ष साहेब यांनी शासनाची मंजूरी प्राप्त होणेबाबत ते प्रयत्न करीत आहेत. मंजूरी मिळेल. नगरपालिकेस रक्कम अदा करावी असे सूचित केले आहे. व याकामी मंजूरी पत्र त्यांचेकडे स्वाक्षरीसाठी सादर व्हावे असेही आदेशीत केलेले आहे.

२) शिर्डी नगर पंचायत यांनी टोलनाका कधी बंद केला तसेच रक्कम मिळणेबाबत तोंडी विनंती केली आहे. लेखी मागणी पत्र दि. १३/१२/२००५ चे पाठविले आहे.

३) शासनाची पूर्व परवानगी प्राप्त झालेनंतरच रक्कम अदा करावी असे मा. हुजूर यांचे यापूर्वी दि १७/१२/०५चे आदेश आहेत.

नगरपालिकेचे मागणीप्रमाणे रुपये १०,००,०००/- दहा लाख द्यावयाचे झाल्यास शासनाची प्रस्तावास मंजुरी प्राप्त झालेनंतर अडचण येणार नाही. तथापि शासनाची मंजूरी न मिळालेस नगर पालिकेस देय असलेल्या इतर कराचे वसूलीचे रकमेतून इतर देय रकमेतून सदर रक्कम वसूल करावी लागेल अशीही टिपणी दि. ९-१०/०१/२००६ रोजी सादर करणेत आली असून प्रस्तूतची टिपणी वर चर्चा झाली आहेच प्रकरणी चर्चा झालेप्रमाणे आदेशासाठी फेरसादर आहे.

तसेच व्यवस्थापन समितीचे पूर्वीचे ठरावानुसार शासनाचे मंजूरीनंतर रक्कम आदा करण्याचे ठरविण्यात आले होते. शासनाची मंजूरी प्रलंबित आहे. परंतु शिरडी नगरपंचायतीकडून रक्कम रुपये १० लाखाची वारंवार आग्रहाची मागणी होत आहे. शिरडी नगरपंचायत,शिरडी यांचे सा.प्र/कावि-०१/४४६/२००६ दि. ३१/०१/२००६ रोजीचे पत्रात त्यांनी वरील रक्कम महाराष्ट्र शासनाच्या निर्णयास अधीन राहून देणेत यावी, त्यांच्या मागणीचा विचार करता अशी विनंती केली आहे, या संबंधी झालेल्या पूर्व निर्णयाचा पुनर्विचार करुन संस्थानकडील घालून दिलेल्या अटी- शर्ती नुसार रक्कम - नगरपंचायत , शिर्डीला देणेसंबंधी उपरोक्त बाबींचा विचार होऊन शिरडी नगरपंचायत शिरडी यांना पथकर अनुदानाची तीन महिन्याची रक्कम रुपये १०,००,०००/- ( अक्षरी रुपये दहा लाख ) मात्र शासनाच्या मान्यतेच्या अटीस अधीन राहून देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२४.** **आरक्षण क्रमांक ३४ स.नं.१२५ जमीन खरेदी बाबत.**

**निर्णय क्र. ९९.** ०१) आरक्षण क्रमांक ३४ मधील ३ हेक्टर ८८ आर २७ चौ.मीटर जागेचा भू संपादनाचा प्रस्ताव मा. जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडे दिनांक १४/०३/२००५ रोजी पाठविलेला आहे.

०२) मा. व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८/०५/२००५ रोजी झालेल्या सभेत निर्णय क्रमांक २४२ अन्वये श्री. सुवालाल अमोलकचंद लोढा व इतर दोन यांच्या स.नं १२५ मधील जमीन प्रती आर रुपये १,५०,०००/- या दराने खरेदी करणेत यावी खरेदीखताचा खर्च संस्थानने करावा असा निर्णय झालेला आहे.

०३) श्रीमती उषा सुभाष शिदोडकर, नवनाथ बहिरु चौधरी, रामदास शंकर सोनवणे, आबासाहेब लहानू कांदळकर व हरिभाऊ गंगाधर चौधरी यांनी आरक्षण क्रमांक ३४ स.नं १२५ मध्ये असलेली त्यांची प्रत्येकी १ आर जागेबाबत मूळ मालकांपेक्षा जास्तीत जास्त मोबदला मिळावा असा अर्ज दिला आहे.

सर्वश्री लोढा व उपरोक्त अर्जदार यांची जमीन आरक्षण क्रमांक १२५ मध्येच आहे. त्यांची जमीन घेणे उचित होणार आहे. उपरोक्त नमूद केलेल्या अर्जदार श्रीमती उषा सुभाष शिदोडकर, नवनाथ बहिरु चौधरी, रामदास शंकर सोनवणे आबासाहेब लहानू कांदळकर व हरिभाऊ गंगाधर चौधरी यांची जागा प्रती आर रक्कम रुपये १,५०,०००/- या दराने खरेदी करणे व खरेदी खताचा खर्च संस्थानने करणे योग्य होणार आहे.

उपरोक्त अर्जदारांपैकी आबासाहेब लहानू कांदळकर व हरिभाऊ गंगाधर चौधरी यांनी बांधकाम केलेले आहे असे अर्जात नमूद केलेले आहे.

तरी श्रीमती उषा सुभाष शिदोडकर, नवनाथ बहिरु चौधरी, रामदास शंकर सोनवणे, आबासाहेब लहानू कांदळकर , हरिभाऊ गंगाधर चौधरी यांची मौजे शिर्डी येथील स.नं १२५/७ मधील प्रत्येकी एक आर असलेली जमीन रक्कम रुपये १,५०,०००/- प्रमाणे खरेदी करणेस व खरेदी खतास येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता, त्यास मान्यता देण्यात आली. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.२५.** **आरक्षण क्रमांक ३४ सर्वश्री सुवालाल अमोलकचंद लोढा व इतर दोन यांची जमीन खरेदी बाबत.**
**निर्णय क्र.१००.** १) आरक्षण क्रमांक ३४ दवाखाना विस्तारीकरणासाठी संस्थानला राखीव आहे. मा.उपविभागीय अधिकारी,श्रीरामपूर भाग,श्रीरामपूर यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कावि-/भूस/२४/२००५ दिनांक २५/०२/२००५ अन्वये मोजणी मध्ये फेर भू-संपादनाचा प्रस्ताव पाठविणेबाबद सुचविलेले आहे. त्यांच्या सुचनेप्रमाणे दिनांक १४/०३/२००५ अन्वये हेक्टर ०३-८८ आर २७ चौ.मीटर भू-संपादनाचा प्रस्ताव पाठविणेत आलेला आहे.

यामध्ये सदर आरक्षण क्रमांक -३४ मध्ये भू-संपादनात श्री पृथ्वीराज लोढा हेक्टर ०१-०८ आर, श्रीजसराज लोढा हेक्टर ०१-१२ आर श्री सुवालाल लोढा हेक्टर ०१-१७ आर व श्री.अमोलकचंद लोढा हेक्टर ००-०१ आर असे हेक्टर ०३-३८ आर क्षेत्र आहे.श्री लोढा कुटूंबियांचे व्यतिरिक्त इतर २३ लोकांचे क्षेत्र हेक्टर ००-५०आर २७ चौ.मी.चा समावेश आहे.

२) श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा ,श्री जसराज अमोलकचंद लोढा व श्री सुवालाल अमोलकचंद लोढा यांनी त्यांची आरक्षण क्रमांक ३४ मध्ये असलेली स.नं.१२५ मधील जमीन संस्थानने प्रत्येक आरला रक्कम रुपये- १,५०,०००/- या दराने खरेदी करावी असा अर्ज मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८/०५/२००५ रोजी झालेल्या सभेत दिला व श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा,श्री जसराज अमोलकचंद लोढा व श्री सुवालाल अमोलकचंद लोढा यांनी त्यांचे एकूण क्षेत्र हे. ०३-५०-०० हे रुपये- १,५०,०००/- प्रति आर याप्रमाणे विकत देण्यास तयार दर्शविली . तसेच या जमिनीत असणा-या विहीरीतून अर्धा इंची पिण्याचे पाण्याचे कनेक्शन घेण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केली.

भू-संपादनाचा निवाडा पूर्ण होऊन ताबा मिळणेसाठी किती कालावधी लागणार हे निश्चित नाही. खरेदी खतामुळे जमिनीचा ताबा लगेच मिळणार असून वाढीव रक्कम मिळणेसाठी जमीन मालक कोर्टात जाणार नाहीत.

याबाबद निर्णय क्रमांक २४२ खालील प्रमाणे झालेला आहे.

०१) "...श्री साईबाबा संस्थानला रुग्णालयाचे विस्तारीकरणासाठी सदर जमिनीची आवश्यकता असल्याने श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा ,श्री जसराज अमोलकचंद लोढा व श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा यांचे एकूण क्षेत्र हेक्टर ०३-५० आर रुपये-१,५०,०००/- प्रति आर याप्रमाणे विकत घेण्यात यावे.

०२) खरेदी खतासाठी स्टॅम्प डयुटी व इतर प्रासंगिक खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

०३) अर्जदार यांनी जमीन कसणाऱ्या विहीरीतून १/२ इंची पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मिळावे,म्हणून केलेल्या विनंतीबाबत संस्थानचे वकीलांचा अभिप्राय घेऊन मा.व्यवस्थापन समितीचे बैठकीत निर्णय घेण्यात यावा, असे ठरले .... "

३) उपरोक्त बाबींचा विचार करता खरेदी खत व त्यांचे मुल्यांकनाचे दृष्टीने खालील प्रमाणे माहिती संकलीत केलेली आहे.

१) उपरोक्त जमीनीच्या शेजारचे आरक्षण क्रमांक ३९ चा प्रारुप निवाडा.
२) सह. जिल्हा निबंधक वर्ग १ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडील बाजार मुल्य माहिती (सन २००६ बाजार मूल्य तक्त्या नुसार ).
३) आ.क्र.३४ चा प्रारुप निवाडा :-

उपरोक्त जमीनीचे शेजारचे आरक्षण क्रमांक ३९ व त्या बाबतचा प्रारुप निवाडा.

आरक्षण क्रमांक ३४ दवाखाना विस्तारीकरणासाठी स.नं. १२५ पैकी व १२६ पैकी क्षेत्र हे.३-८८ आर २७ चौ.मी. विकासआराखड्यात आरक्षीत आहे.याच आरक्षणाचे शेजारी आरक्षण क्र.३९ मध्ये

स.नं.१२४ पैकी ,१२५ पैकी व १२६ पैकी क्षेत्र हेक्टर ०४-७५ आर ८७ चौ.मीटर देखील शिरडी विकास आराखडयात संस्थानसाठीच आरक्षित आहे.व त्याची क्षेत्र भू-संपादीत होत आहे.

कार्यालयीन माहिती प्रमाणे आरक्षण क्रमांक ३९ च्या प्रारुप निवाडयामध्ये क्षेत्र हेक्टर ०४-७५ आर ८७ चौ.मीटर असून जमीनीची किंमत ४,२८,४८,३००/- धरण्यात आलेली आहे.त्याप्रमाणे प्रति आरला रक्कम रुपये- ९०,७४२/- हा दर येत आहे. त्यावर ३०% दिलासा व रक्कम रुपये- १२% अतिरिक्त घटकाची रक्कम +(अधिक ) आस्थापना चार्जेस धरुन प्रती आरला रक्कम रुपये- १,४८,३९४/- हा दर येत आहे.

मा.सह.जिल्हा निबंधक ,वर्ग-१ ,अहमदनगर यांचे मुल्यांकन :-

स.नं.१२५ चा दर प्रती आरला रक्कम रुपये- १,१८,१७०/- कळविलेला आहे.त्यात ३०% दिलासा रक्कम व आस्थापना चार्जेस धरुन दर आरला रक्कम रुपये- १,५७,१६६/- दर येत आहे.

आरक्षण ३४ चा निवाडा व आरक्षण ३९ निवाडा व सह.जिल्हा निबंधक वर्ग-१,अहमदनगर यांनी कळविलेला दर याबाबत तुलानात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| तपशिल | आरक्षण क्रं.३९ | आरक्षण क्रं.३४ | सह.जिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, अहमदनगर यांनी कळविलेला दर |
|---|---|---|---|
| प्रारुप निवाडा दिनांक | २४/०९/२००५ | १०/१०/२००४ | सन -२००६ |
| कलम ६ ची नोटिफिकेशनची तारीख | १९/०६/२००२ | २९/१२/२००० | ---- |
| जमीनीचे एकूण क्षेत्र | हेक्टर ०४-७५ -८७ | हेक्टर ०३-४४-०० | ---- |
| जमीनीची एकूण किंमत | ४,२८,४८,३००/- | २,११,५६,०००/- | ---- |
| प्रत्येक आरला येणारी किंमत (अ) | ९०,०४२/- | ६१,५००/- | १,१८,१७०/- |
| ३० % दिलासा रक्कम रुपये (ब ) | २७,०१५/- | १८,४५०/- | ३५,४४१/- |
| नोटिफिकेशनची तारीख दि.२४/०७/२००२ ते ३१/१२/२००४ पर्यंत १२ % इतर घटकासाठी (क ) | २७,०१५/- | ३३,२१०/- (दिनांक २९/१२/२००० ते दिनांक ००/०६/२००५ पर्यंत. | १२ % इतर घटकाची रक्कम हिशोबात धरली नाही. |
| एकूण किंमत :- | १,४४,०७२/- | १,१३,१६०/- | १,५३,६२१/- |
| ३ % आस्थापना चार्जे | ४,३२२/- | ३,३९५/- | ३,५४५/- |
| संस्थानला प्रत्येक आरला द्यावी लागणारी किंमत | १,४८,३९४/- | १,१६,५५५/- | १,५७,१६६/- |

वर नमूद केलेल्या तक्त्यामध्ये आरक्षण क्रमाक ३४ चा दर हा दिनांक २९/१२/२००० च्या नोटिफिकेशनच्या तारखेच्या वेळेचा असल्याने कमी आहे.आरक्षण क्रमांक ३४ चा सुधारीत प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना पाठविण्यात आलेला आहे.त्यामध्ये भू-संपादन कायदा १८९४ चे कलम ६ ची नोटिफिकेशन निघणार आहे.त्यामुळे प्रती आरच्या दरामध्ये निश्चित वाढ होणार आहे.

वर नमूद केलेल्या दर विचारात घेता मौजे शिरडी येथील स.नं.१२५ बाबत प्रती आरला रक्कम रुपये- १,५०,०००/- दर योग्य आहे.

सदरचा दर विचारांत घेऊन उपरोक्त खातेदारांचे एकूण क्षेत्र ७/१२ प्रमाणे हे.०३ व ५७ आर खरेदी करण्यात येणार आहे.मात्र प्रत्यक्ष ताबा हे.०३-४९ आर जमिनीचा मिळणार आहे.याबाबत सविस्तर तक्ता खालील प्रमाणे आहे.अ.नं.१ व २ चे क्षेत्र हे.००-०८ आर हे चारीत गेले असल्याने त्याचा ताबा मिळणार नाही. व त्याची रक्कमही अदा करण्यात येणार नाही.

| अ.नं. | खातेदाराचे नांव | स.नं. | विकत घ्यावयाचे क्षेत्र हेक्टर आर | प्रत्यक्ष ताब्यात येणारे क्षेत्र हेक्टर आर | रकाना ४ व ५ मध्ये फरक असण्याचे कारण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | ०६ |
| ०१ | श्री सुवालाल अ.लोढा | १२५/८ | ०१-२१ | ०१-१७ | ००-०४ हे क्षेत्र चारीकडे गेले आहे. ते ताब्यात येणार नाही. परंतू खरेदी खतात नोंद घेणे आवश्यक आहे. |
| ०२ | श्री जसराज अ.लोढा | १२५/७ | ०१-१६ | ०१-१२ | ००-०४ हे क्षेत्र चारीकडे गेले आहे. ती ताब्यात येणार नाही.परंतू खरेदी खतात नोंद घेणे आवश्यक आहे. |
| ०३ | श्री पृथ्वीराज अ.लोढा | १२५/६ | ०१-२० | ०१-२० | यात डी.पी.रोड कडे जाणारे क्षेत्र विकत घेतले आहे,व त्याचा ताबा घेण्यात येत आहे |
| | | एकूण | ०३-५७ | ०३-४९ | |

आरक्षण क्रमांक ३४ मध्ये श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा यांचे मालकीचे एकंदर हेक्टर ०१-२० आर क्षेत्रापैकी हेक्टर ०१-०८ आर समाविष्ट आहे. सदर स.नं.१२५/६ मधील हेक्टर ०१-०८ आर जमीन खरेदी केल्याने हेक्टर ००-१२ आर जमीनीचा तुकडा राहणार आहे.उर्वरीत हेक्टर ००-१२ आर क्षेत्र शिरडी विकास आराखडा अंतर्गत रस्त्यासाठी आरक्षित आहे.सदर क्षेत्रा लगत संस्थानने स.नं.१२४/१/अ खरेदी केलेला आहे.त्यामध्ये सध्या गोदाम बांधलेले आहे.सदर क्षेत्र खरेदी केले नाही,तर श्री पृथ्वीराज अमलोकचंद लोढा यांचे ताब्यात हेक्टर ००-१२ आर क्षेत्र राहून वहिवाटीस राहणार आहे.त्यासाठी रस्ता वगैरे प्रश्न उपस्थित होण्याची शक्यता आहे.याबाबीचा विचार करुन डी.पी.रोडमध्ये जाणारे हेक्टर ००-१२ आर क्षेत्रासह एंकदर हेक्टर ०१-२० आर जमीन खरेदी करण्यात येत आहे.

खालील प्रमाणे जमीन मालकांना देण्यात येणाऱ्या जमीनीच्या किंमतीची रक्कम, स्टॅम्प खर्च, व नोंदणी फी याबाबत संक्षिप्त तपशील आहे.सोबत खर्चाचा विस्तृत तपशील जोडला आहे.

०१) खरेदी जमीन मालकांना अदा करावयाची रक्कम रुपये- ५,२३,५०,०००/-(अक्षरी रुपये- पांच कोटी,तेविस लाख, पन्नास हजार ) फक्त आहे.

०२) खरेदी खताच्या स्टॅम्पसाठी रक्कम रुपये-२६,१७,५००/-(अक्षरी रुपये- सव्वीस लाख,सतरा हजार,पांचशे ) मात्र खर्च येणार आहे.

०३) खरेदी खतासाठी नोंदणी फी रक्कम रुपये- ५,२३,५००/-(अक्षरी रुपये- पांच लाख, तेविस हजार,पांचशे ) मात्र खर्च येणार आहे.,

०४) मा.व्यवस्थापन समितीच्या दि.०८/०५/२००५ रोजी झालेल्या सभेतील निर्णय क्र.२४२ मध्ये अर्जदार यांनी जमीन कसणाऱ्या विहीरीतून १/२ इंची पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मिळावे म्हणून केलेल्या विनंतीबाबत संस्थानचे वकीलाचा अभिप्राय घेऊन मा.व्यवस्थापन समितीच्या बैठकीत निर्णय घेण्यात यावे, असे ठरले.

याबाबत संस्थानचे वकील श्री जे.के.गोंदकर यांचा अभिप्राय घेण्यात आला आहे..त्यांनी खालील प्रमाणे अभिप्राय नमूद केला असलेबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

"... त्यामुळे असे परिस्थितीत आपणांस वरील मिळकती कोणताही हक्क राखून न ठेवता खरेदी घेणे आवश्यक आहे.त्यामुळे आता सदर मूळ मालकांना अशा प्रकारे पिण्याचे पाण्याचे कनेक्शन देऊन आपले मालकी हक्कात कोणाचाही कोणताही हक्क निर्माण करता येणार नाही.जर आपण त्यांना १/२ पिण्याचे पाण्याचे कनेक्शन दिले ,तर आपले मिळकतीतून त्यांना भविष्यात हक्क निर्माण होईल.इजमेटरी राईट निर्माण होईल.त्यामुळे त्यांना अशा परिस्थितीत आपण विकत घेणाऱ्या जमिनीतील विहीरीतून १/२ इंच पिण्याचे पाण्याचे कनेक्शन देणे योग्य नाही.सदर मालक मोबदलाही घेतात व पुन्हा पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मागतात हे कायद्यास अनुसरुन नाही.त्यामुळे अशा प्रकारे कायम स्वरुपी त्यांना पिण्याचे पाण्याचे नळ कनेक्शन कायम खरेदीखतानंतर देता येणार नाही,हा अभिप्राय असे ..."

संस्थानचे वकीलांचा वर नमूद केलेला अभिप्राय विचारांत घेता श्री पृथ्वीराज अमोलकचंद लोढा श्री जसराज अमोलकचंद लोढा,श्री सुंवालाल अमोलकचंद लोढा यांनी दि.०८/०५/२००५ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीच्या सभेत विहीरीतून १/२ इंच पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मिळावे,म्हणून केलेली मागणी मान्य करणे उचित नाही.मात्र साईनगर संस्थान कर्मचाऱ्यांना पाणी पुरवठा योजनेतून नळ पाणी पुरवठा होतो. त्याप्रमाणे त्यांना पाणी पुरवठा ३ नळ कनेक्शन देणेबाबत विचार करता येईल.

०५) श्री अमोलकचंद राजरुप लोढा यांची जमीन स.नं.१२५/५ क्षेत्र हेक्टर ००-०१ आर (विहीरीसह) खरेदी करावयाचे आहे.श्री अमोलकचंद राजरुप लोढा हे मयत असून त्यांचे वारसाची नोंद करणेबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.सदर नोंद मंजूर झाल्या नतंर प्रस्तुत जमीनीचे खरेदी खत करण्यात येणार आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले.

०१) जमीन मालकांना रुपये १.५० लाख आर प्रमाणे ३.४९ हेक्टची क्षेत्राची किंमत अदा करावयाची रक्कम रुपये- ५,२३,५०,०००/- किंवा प्रत्यक्ष ताबा घेतांना येणाऱ्या क्षेत्राप्रमाणे रक्कम आदा करण्यात यावी.

०२) खरेदी खताच्या स्टॅम्पसाठी रक्कम रुपये- २६,१७,५००/- मात्र खर्च येणार आहे.त्यांस मंजूरी देण्यात आली.

०३) खरेदीखतासाठी नोंदणी फी रक्कम रुपये- ५,२३,५००/- मात्र खर्च येणार आहे.,त्यांस मंजूरी देण्यात आली.

०४) श्री पृथ्वीराज अ.लोढा ,श्री जसराज अ.लोढा ,श्री सुवालाल अ.लोढा यांनी मा.व्यवस्थापन समितीच्या दिनांक ०८/०५/२००५ रोजी झालेल्या सभेपुढे विहीरीतून १/२ इंची पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मिळावे म्हणून, संस्थानचे वकील यांचा अभिप्राय विचारात घेता मान्य करता येणार नाही.परंतू संस्थान नोकरांचे क्वार्टर्स मधून ज्याप्रमाणे पाणी पुरवठा होतो ,त्या धर्तीवर ३ नळ कनेक्शन ने त्यांना पाणी पुरवठा करण्यात यावा.

०५)श्री अमोलकचंद राजरुप लोढा यांची वारसाची नोंद झाल्यानंतर स.नं.१२५/५ क्षेत्र हेक्टर ००-०१ आर जमीन विहीरीसह रक्कम रुपये- १,५०,०००/- या दराने खरेदी करणेत यावी व त्यासाठी खरेदीसाठी होणारा खर्च संस्थानने करावा, असे ठरले. (कार्यवाही-विधी अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२६.** **तक्रार (यु.एल.पी. )क्र. ४१/१९९४ (श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के विरुध्द श्री साईबाबा संस्थान,शिरडी) या कोर्ट केसमध्ये मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी दि.०५-०१-२००६ रोजी दिलेल्या आदेशाबाबत**

**निर्णय क्र.१०१.** श्री.ताराचंद्र विठ्ठलराव म्हस्के यांची जा.नं.एसएसएस/वशी-१/३६०१/१९९२ दि.२१-०४-१९९२ अन्वये संस्थानचे जनसंपर्क कार्यालयात जनसंपर्क अधिकारी या पदावर रु.१६४० - ६० - २६०० - ईबी - ७५- २९०० ( सुधारित ५५००-१५०-९०००) या वेतनश्रेणीत सर्व मिळून मासिक नियत वेतन रु.२००० ( रुपये दोन हजार मात्र ) वर नियुक्ती करण्यात आली. त्यानुसार श्री.म्हस्के हे दि.२१-०४-१९९२ रोजी संस्थान सेवेत कामावर हजर झाले. दि.२०-१०-१९९२ अखेर त्यांचा प्रारंभीक सहा महीन्यांचा परिविक्षाधीन कालावधी पुर्ण झाले नंतर त्यांची सहा महीन्याच्या टप्प्या-टप्प्याने तीन वेळा म्हणजे दि.२०-०४-१९९४ अखेर परिविक्षाधीन कालावधी वाढविण्यात आला. तथापि, मुळ व वाढीव परिविक्षाधीन कालावधीमध्ये श्री.म्हस्के यांचे काम समाधानकारक आढळून न आल्यामळे दि. २०-०४-१९९४ रोजी त्यांची सेवा संपुष्टात आणण्यात आली.

त्यामुळे श्री.ताराचंद म्हस्के यांनी त्यांचा दि.२०-०४-१९९४ रोजीचा सेवासमाप्ती आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द व्हावा व सलग नोकरी धरुन मागील काळातील वेतनासह पुर्ववत सेवेत घ्यावे या मागणीसाठी मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे संस्थान विरुध्द तक्रार (यु.एल.पी.) क्र. ४१/१९९४ दाखल केली.

श्री.म्हस्के यांचे तक्रार (यु.एल.पी. )क्र. ४१/१९९४ संदर्भात मा.कामगार न्यायालय अहमदनगर यांनी प्राथमिक मुद्द्यावर श्री.म्हस्के हे " वर्कमन " असलेबाबत दि.१८-१०-१९९४ रोजीचे आदेशान्वये निर्णय दिला. म्हणून संस्थानने सदर आदेशा विरुध्द सदर आदेशा संदर्भात मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन (यु.एल.पी.) क्र.४७/१९९४ चा अर्ज दाखल केला. त्यामध्ये मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांनी श्री.म्हस्के यांचे बाबतीत मा.कामगार न्यायालयाचा आदेश कायम करुन सदर रिव्हीजन दि.३१-०१-१९९५ रोजी डीसमीस करुन संस्थानचे विरुध्द निर्णय दिला.

मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर यांचे दि.३१-०१-१९९५ रोजीचे आदेशा विरुध्द संस्थानने मा.उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद येथे रिट पिटशन क्र.१७८४/१९९५ दाखल केले. सदर रिट पिटीशन पेंडींग असतांना श्री.म्हस्के यांनी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल केले होते. त्यामध्ये मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, औरंगाबाद यांनी श्री.म्हस्के यांचे संदर्भात मा.कामगार न्यायालय, अहमदनगर येथे न्यायप्रविष्ठ असलेल्या तक्रारीचे कामकाज सुरु करावे असा हुकूम केला. या हुकूमाविरुध्द संस्थानने पुन्हा मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठात रिव्हीव ॲप्लीकेशन दाखल केले. सदर रिव्हीव ॲप्लीकेशनमध्ये मा.उच्च न्यायालयाने " श्री.म्हस्के यांना पुढील आदेश होईपर्यंत लिपीक या पदावर कामावर हजर करुन घ्यावे.

तसेच ते जनसंपर्क अधिकारी म्हणून संस्थानकडे कार्यरत असतांना त्यांना दरमहा जे वेतन आदा करण्यात येत होते तेवढे वेतन श्री.म्हस्के यांना दरमहा देण्यात यावे " असा हुकुम मा.उच्च न्यायालय, खंडपीठ , औरंगाबाद यांनी दि.२६-०२-१९९७ रोजी दिला.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ , औरंगाबाद यांचे दि. २६-०२-१९९७ चे आदेशास अनुसरुन श्री.म्हस्के यांना दि.०२-०६-१९९७ पासून संस्थान सेवेत " लिपीक " यापदावर सेवेत हजर करुन घेण्यात आले. दि.०२-०६-१९९७ पासून श्री.म्हस्के यांना मा.उच्च न्यायालयाच्या हुकुमानुसार मासिक नियत वेतन रु.२०००/- व अंतरीम वाढ रु.१००/- असे एकूण रु.२१००/- दरमहा वेतन देण्यात येत आहे. श्री.ताराचंद म्हस्के हे दि.०१-०९-२००३ पासून कामावरुन गैरहजर असल्याने त्यांना ज़ा.नं.एसएसएस/वशी-७ए/१५२१/२००४ दि.२१-०५-२००४ अन्वये आरोपपत्र देण्यात आले असून त्यांचे खातेचौकशीचे कामकाज चालू आहे.

दरम्यान रिट पिटीशन क्र.१७८४/१९९५ मध्ये मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद यांनी श्री.म्हस्के हे " वर्कमन " आहेत असा निर्णय दि.२३-०४-२००४ रोजी देऊन सदर रिट पिटीशन डिसपोज्ड ऑफ करुन निकाली काढले. त्यानंतर मा. कामगार न्यायालय, अहमदनगर येथे तक्रार

(यु.एल.पी.)क्र.४१/१९९४ चे कामकाज चालू होवून मा.कामगार न्यायायाने खालीलप्रमाणे दि.०५-०१-२००६ रोजी जज्जमेंट/अंतिम आदेश श्री.ताराचंद म्हस्के यांचे बाजूने दिला आहे.

**ORDER**

1. The complaint at Exh.U/1 is hereby allowed.
2. It is hereby declared that the respondent is engaged in an unfair labour practice under Item 1 (b) of Schedule IV of MRTU & PULP.Act, 1971 while terminating the services of the complainant w.e.f.20 -04 -1994 not in good faith but in colourable exercise of the employers rights. The respondent do desist from the said unfair labour practice.
03. The respondent is directed to reinstate the complainant with continuity in service and full back wages from the date of termination, excluding the period of service by virtue of Court's order during the period from July 1996 to November 2002
4. Parties to bear therir own costs,
5. Order be complied within the period of two months from the date of order.

(V.P.KAREKAR)
JUDGE,
1 ST LABOUR COURT,
AHMEDNAGAR

AHMEDNAGR.
Dtd- 05-01-2006

उपरोक्तप्रमाणे मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार (यु.एल.पी.)क्र. ४१/१९९४ मध्ये दि.०५-०१-२००६ रोजी " श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना मागील काळातील वेतनासह /बॅकवेजेससह (माहे जुलै १९९६ ते माहे नार्व्हेबर २००२ हा कालावधी वगळून ) पुर्ववत कामावर हजर करुन घेणेसंदर्भात " दिलेले जज्जमेंट/अंतिम आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द होऊन मिळावा या करीता संस्थानचे वतीने मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे विरुध्द संस्थान ॲडव्होकेट श्री.अशोकराव पाटील, अहमदनगर यांचे मार्फत रिव्हीजन अर्ज दि.२८-०२-२००६ चे पुर्वी दाखल करावा लागेल. किंवा मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार (यु.एल.पी. )क्र. ४१/१९९४मध्ये दि.०५-०१-२००६ रोजी दिलेल्या जज्जमेंट/अंतिम आदेशास अनुसरुन श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना दि.२०-०४-१९९४ पासून ते दि.३०-०६-१९९६ अखेर व दि.०१-१२-२००२ ते कामावर हजर/रुजू करुन घेईपर्यंत या मागील काळातील वेतनासह (बॅक वेजेससह)दि.०५-०१-२००६ पासून दोन महीन्यांचे आंत पुर्ववत संस्थान सेवेत कामावर हजर करुन घ्यावे लागेल.

सबब, मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार (यु.एल.पी.)क्र. ४१/१९९४ मध्ये दि.०५-०१-२००६ रोजी दिलेल्या आदेशास अनुसरुन श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांना जनसंपर्क अधिकारी या पदावर मागील काळातील वेतनासह /बॅंक वेजेससह (दि.२०-०४-१९९४ ते दि.३०-०६-१९९६ व दि.०१-१२-२००२ ते कामावर हजर/रुजू करुन घेईपर्यंत या कालावधीतील ) पुर्ववत कामावर हजर करुन घ्यावयाचे किंवा कसे ?

अथवा, मा.कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी तक्रार (यु.एल.पी.) क्र. ४१/१९९४ मध्ये दि.०५-०१-२००६ रोजी दिलेला अंतिम आदेश बेकायदेशीर ठरवून रद्द व्हावा याकरीता श्री.ताराचंद विठ्ठलराव म्हस्के यांचे विरुध्द संस्थानचे वतीने मा.औद्योगिक न्यायालय, अहमदनगर येथे रिव्हीजन अर्ज दाखल करावयाचा किंवा कसे याबाबतचा प्रस्ताव मा.कार्यकारी अधिकारी यांनी सादर केला होता.

यावर सविस्तर चर्चा होऊन,मा.औद्योगिक न्यायालय,अहमदनगर यांचेशी रिव्हीजन अपील दाखल करण्यात यावे व तडजोडीबाबत नंतर विचार करणेत येईल असें ठरलें.

(कार्यवाही-कामगार अधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२७.** **आयकर कलम ३५AC कलमांतर्गत देणगी स्वीकारणेबाबत.**

**निर्णय क्र.१०२.** आयकर कलम ३५ AC अंतर्गत देणगी स्वीकारणेसाठी मा.सदस्य डॉ.पी.एल.तिवारी यांना लक्षवेधी असणारा श्री व्यास, मेरठ यांनी पाठविलेला फॅक्सवर चर्चा झाली. सदर फॅक्समध्ये समाविष्ट असलेल्या बाबी खालीलप्रमाणे-

01. Trust Deed /Bys-Laws of the Society/Trust
02. Registration Certificate of the Society /Trust
03. Approval Letter from Ministry of Finance Under Section 35AC 35(I)(II)
04. Copy of Gazette Notification
05. 80G /80GP (VI)
06. 12(A) Form of Registration of Certificate
07. Authorization of letter of Nogotiable Donation
08. Requisition Letter for Donation
09. Last Three Years Audited Balance Sheet.
10. PAN No at ITR for Last Three Years.
11. Copy of Approval Project Report U/S 35AC /35(I)(II)

12. Half Year & one year Progress Report Filed with National Commitee.
13. Three Years Balance Sheet Audited.
14. List of Movable & Immovable Assets of the Society.
15. Anjual Report /Activity Report.
16. List of Donation Received since Last Three Year
17. Six months Banks Statements.
18. Banker's Name Addrees & Account Number
19. Form 58(I)
20. Name & Address & Signature with Photographs of all the Executive Commitee Member to be Attested Notary /Gazetted Officer.
21. Name, Address & Signature Verification of the Signatory of the Bank Account on the Letter Head on the Bank by the concerned bank Authorities.
22. 50 Letter heads of the Trust or Society
23. Officialseal of the Trust or society
24. Passport Size photographs-6 Nos.
25. Receipt Book & Form 58A
26. Cheque Leafs (50Nos.)

यावर चर्चा होऊन श्री व्यास यांचेशी चर्चा करणेसाठी दिल्ली येथे मा.विश्वस्त कॅप्टन सुरेश वासुदेवा, मा.कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखाधिकारी यांनी जाऊन प्राथमिक चर्चा करावी. तदनंतर मा.सदस्य श्रीमती उर्मिला प्रदिप जाधव, मा.श्री शैलेश श्रीहरी कुटे, मा.कॅप्टन सुरेश वासूदेवा व मा.कार्यकारी अधिकारी यांनी चर्चा करुन अंतिम निर्णय घ्यावा असे ठरले.

(कार्यवाही-मुख्य लेखाधिकारी)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२८. श्री.गबाजी सखाराम वराळ, शिर्डी यांचा सर्व्हेअर म्हणून नेमणूकीबाबत अर्ज.**

**निर्णय क्र.१०३.** श्री गबाजी सखाराम वराळ, शिर्डी यांनी त्यांचे अर्जाने त्यांना सर्व्हे कामाचा अनुभव असून मोजणी काम चांगल्या प्रकारे करता येते. तसेच त्यांना जमीन मिळकतीच्या अभिलेखाचा अनुभव आहे. ते भूमी अभिलेख खात्यात ३६ वर्षे सेवा करुन सेवानिवृत्त झाले आहेत. तरी संस्थानमध्ये सर्व्हेअर म्हणून नेमणूक मिळावी अशी विनंती केली आहे.

सध्या संस्थानचे विकासकामाकरीता शेती जमीन खरेदीचे काम चालू आहे. सदर जमीनी मोजणेकामी सर्व्हेअरची आवश्यकता आहे. सदर कामाकरीता श्री गबाजी सखाराम वराळ यांनी याकामासाठी कंत्राटी पध्दतीने १ वर्ष मुदतीकरीता रुपये ५०००/- या मासिक मानधनावर नियुक्ती देण्यात यावी असे ठरले. (कार्यवाही-अधिक्षक,आस्थापना विभाग)

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.२९. श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट श्री साई ट्रस्ट,चेन्नई दरम्यान करावयाचे मेमोरॅण्डम ऑफ अण्डरस्टॅडींग बाबत**

**निर्णय क्र.१०४.श्री.** के व्ही. रमणी मॅनेजिंग ट्रस्टी शिर्डी साई ट्रस्ट नं १ साईनगर १०८,किष्णन करनाई व्हिलेज पटटीपुलम ( पी.ओ. ) इस्ट कांचीपुरम तामिळनाडू ६०३ १०४ हे शिर्डी येथे श्री साईबाबांचे दर्शनार्थ आले असता त्यांनी गर्दीचेवेळी धर्मशाळा, भक्तनिवास येथील खोल्या अपु-या पडतात. या अनुषंगाने शिर्डी साई ट्रस्ट हे खालील प्रकल्प देणगी स्वरुपात करुन देण्यास तयार असल्याबद्यल दि. १४/११/२०५ चे वरील पत्रावये कळविले आहे . खालील प्रकल्प राबविणेसाठी हाती घेणेसाठी त्याची इच्छा असल्याचे पत्रात नमूद आहे.

१) निवासस्थानाबाबत- साई भक्तांच्या सोईकरिता साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी यांनी बांधलेल्या धर्मशाळा व भक्तनिवासस्थान इमारतीसारख्या २ ते ३ धर्मशाळांचे बांधकाम करुन त्यास "साई आश्रम " नांव देण्यात यावे असे सुचविले आहे हा आश्रम बांधण्यासाठी जागा मोफत उपलब्ध करुन देण्यात यावी अशी अपेक्षा केलेली आहे.

२) वृध्दाश्रम व अनाथालय- ज्या व्यक्ती वृध्द व वयस्कर असतात त्यांची रहाण्याची व्यवस्था नसते, अशा व्यक्तींकरिता वृध्दाश्रम, तसेच जी मुले अनाथ आहेत. अशा मुलांकरिता अनाथालयाचे काम करुन त्यास " साई विश्राम " नांव देण्यात यावे असे त्यानी सुचविले आहे. तसेच या वृध्द व्यक्तिंना व अनाथ मुलाना मोफत वैद्यकीय सुविधा व प्रसादालयामध्ये मोफत जेवणाची व्यवस्था करण्यांत यावी अशी इच्छा त्यांन वरील पत्रात व्यक्त केली आहे.

३) ध्यान मंदीर - साईभक्तांकरिता शांततेने बसून ध्यान करणेकरिता एक हॉल बांधून त्यास " साईध्यान " असे संबोधण्यात यावे अशी त्यांची सूचना वरील पत्रांत केलेली आहे.

शिरडी साई ट्रस्ट चेन्नई तामिळनाडू यांनी वरील पत्रान्वये सदरचे प्रकल्प उभारण्यासाठी येणारा संपूर्ण खर्च त्यांचा शिर्डी साई ट्रस्ट करण्यास तयार असून प्रकल्पाकरिता लागणारे प्लॅन तयार असून प्रकल्पाकरिता लागणारे प्लॅन व एस्टिमेट तयार करण्यासाठी संस्थानने सहाय्य करावे असे कळविले आहे.

मा.अध्यक्ष श्री जयंवतराव ससाणे यांचेशी चर्चा झाली त्यावेळी मा. विश्वस्त सर्वश्री कैलास कोते, डॉ. एकनाथ गोंदकर उपस्थित होते.त्यावेळी शिर्डी साई ट्रस्ट तामीळनाडू यांना त्यांनी देऊ केलेल्या देणगीबाबत त्वरीत सहमती कळविण्यात यावी अशा सूचना दिल्या होत्या.

यानंतर श्री.के.व्ही रमणी यांनी त्यांचे फॅक्स नं ६०/टी टी /दि ०९/०१/२००६ रोजी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व शिर्डी साई ट्रस्ट यांचे दरम्यान करावयाच्या मेमोरॅण्डम ऑफ अण्डरस्टॅण्डिग चा प्रारुप मसूदा श्री साईबाबा संस्थान शिर्डीला पाठवून त्यावर संस्थनच्या कॉमेटस सजेशन्स मागविल्या. Sansthan will appoint architect in consultation with the trust for designing the building and the development monitoring the quality and schedule of the construction and sansthan will pay fees for the architects ही जबाबदारी संस्थानवर टाकण्यात आलेली आहे.

वरील मेमोरॅण्डम ऑफ अण्डरस्टॅडिंगचा प्रारुप मसूदा दिनांक ३१/०१/२००६ रोजी संस्थान ॲडव्होकेट यांचेकडे मार्गदर्शनासाठी पाठविला होता ॲडव्होकेट, श्री डी.डी कुलकर्णी यांचे ज्युनिअर श्री. एस.डी. कुलकर्णी, कोपरगांव यांनी सुचविलेल्या दुरुस्त्यासह त्यांचेकडून सोबत परिशिष्ट "अ" प्रमाणे M.O.U.प्राप्त झाला त्यावर मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त व श्री.रमणी यांचे समवेत सविस्तर चर्चा करणेत आली. मा.दुय्यम निबंधक, राहाता यांचे समोर नोंदवून घेण्यास मान्यता देण्यात आली. त्यावर सभेमध्ये चर्चा होऊन वरील प्रमाणे M.O.U. मसूद्यास व नोंदणीस मान्यता देणेबाबतचा मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला होता, त्यास मान्यता देणेत आली.

याकामी रजिस्ट्रेशन फी, स्टॅम्प खर्च व तत्सम इतर खर्च वेळोवेळी संस्थानमार्फत आदा करण्यात यावा, असे ठरले.

वरील निर्णय क्र.०१ ते १०४ सर्वानुमते घेण्यात आले आहेत.

यानंतर सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

स्वाक्षरीत/-
(भाऊसाहेब रा.वाकचौरे)
कार्यकारी अधिकारी
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )
*Saturday 11/02/2006*

स्वाक्षरीत/-
(जयंत मुरलीधर ससाणे)
अध्यक्ष
श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी )